# मराठी गद्यपराग

— संपादक —

एम्. ए.

म्. ए. एल् एल् बी.

UNIVERSAL LIBRARY
OU_192055
UNIVERSAL LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M88 M18M Accession No. M908

Author माडेकर, श. त्र.

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below.

मराठी

# गद्यपराग

Post Graduate Library
College of Arts & Commerce, O. U.

★

— संपादक —

प्रा. रा. ब. माढेकर, एम्. ए.

प्रा. भा. शं. कऱ्हाळेकर, एम्. ए. एल् एल् बी.

★

Post Graduate Library
College of Arts & Commerce, O. U.

प्रथमावृत्ति
१९५१

मूल्य
दीड रुपाया.

# प्रस्तावना—

विश्वविद्यालयीन अभ्यासक्रमांत प्रादेशिक भाषांना नुकताच वाव मिळाला आहे. अभ्यासाचें मान व विद्यार्थ्यांची आवश्यकता ध्यानांत घेतां नवीन पाठ्यपुस्तकांची आवश्यकता भासू लागतें.

'गद्यपराग' या संग्रहांत मराठी गद्यवाङ्मयांतील प्रमुख वाङ्मयप्रकार विद्यार्थ्यांपुढें ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक, राजकीय, वाङ्मयीन व विनोदी निबंध व त्याचप्रमाणे लघुकथा, रूपककथा, शब्दचित्र व्यक्तिचित्र इत्यादि वाङ्मयाची विद्यार्थ्यांना तोंडओळख व्हावी यासाठीं वेगवेगळ्या प्रकारचे गद्यवाङ्मय या संग्रहांत समाविष्ट केलें आहे. सर्व मराठी भाषिक प्रदेशांतील लेखकांचा अंतर्भाव करण्याचाहि प्रयत्न केला आहे. मराठी गद्यवाङ्मय विपुल व विविध प्रकारचें असल्यानें निवडीविषयीं एकवाक्यता होणें असंभवनीय आहे.

मार्गदर्शनासाठीं व रसग्रहणासाठीं शेवटीं थोड्या टीपा दिल्या आहेत.

ज्या लेखकांनीं व प्रकाशकांनीं उतारे घेण्यास मान्यता दिली त्यांचे संपादक आभारी आहेत.

प्रस्तुत संग्रहाचा योग्य पुरस्कार होईल अशी आशा आहे.

—संपादक.

## गद्यपराग—

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | पुढारी कसे असावे— | गोपाळराव आगरकर | १ |
| २. | मध्यमपदलोपी समास— | अ. ब. कोल्हटकर | ३ |
| ३. | मी कां लिहितों— | दिवाकर कृष्ण केळकर | ११ |
| ४. | एका नूतन अमूल्य ग्रंथावरील अभिप्राय— | पु. ल. देशपांडे | १६ |
| ५. | माझें निशाभ्रमण— | प्रा. भगवन्त देशमुख | २२ |
| ६. | स्वामिकार्याचें बक्षीस— | ऐतिहासिक पत्र | २९ |
| ७. | १३व्या १४व्या शतकांतील महाराष्ट्र— | डॉ. ना. गो. नांदापूरकर | ३१ |
| ८. | बहाणा— | सौ. कुसुमावती देशपांडे | ३३ |
| ९. | अब्दुर्रशीद— | र. मु. जोशी | ४० |
| १०. | नंदादीप आणि पणती— | बी. रघुनाथ | ४२ |
| ११. | रा. सा. र. लु. जोशी— | य. गो. जोशी. | ४५ |
| १२. | संगीत मूकनायक— | रा. ग. गडकरी | ५५ |
| १३. | यमुना राणी— | आचार्य कालेलकर | ६४ |
| १४. | प्रतिभा साधन— | प्रा. ना. सी. फडके | ६८ |
| १५. | भावपुष्प— | डॉ. शं. जा. पुरवार | ७३ |

# पुढारी कसे असावे?

**गोपाळ गणेश आगरकर.**

ज्यांत जुन्या पद्धतीचे सद्गुण पूर्णपणें भरले आहेत व जुन्या लोकांनीं निषिद्ध मानलेल्या गोष्टींपासून जे अत्यंत अलिप्त आहेत, अशा गृहस्थांनीच त्यांचें पुढारीपण पतकरल्यास जुन्या मतांस व जुन्या आचारांस कांहीं वर्षे टिकाव धरतां येणार आहे. ‘ कांहीं वर्षे ’ असें आम्ही जाणूनबूजून म्हणतों. कारण, जुन्या लोकांनीं आपले भीष्माचार्यासारखे योद्धे जरी पुढें घातले तरी अगोदरच मन्वंतर इतकें बदलून गेलें आहे, व इतउत्तर तें इतक्या झपाट्यानें बदलत जाणार आहे की, त्यापुढें भीष्मद्रोणकृपादिकांसारख्या पूर्वपद्धतीच्या योद्ध्यांचें कांहीं एक चालेनासें होऊन त्यांचा शस्त्रसंपात निष्फल होईल व कांहींवर तर प्रत्यक्ष डोळ्यासमोर प्रतिपक्ष्यांनी हस्तगत केलेली विजयश्री पहाण्याची पाळी येऊन, निराशेनें या जगद्रणांगणांतून खेद करीत परलोकास जाण्याचा प्रसंग गुदरेल. असा प्रसंग बराच टाळतां येण्यास एकच उपाय आहे, तो हा की पुढारी निवडतांना फार चांगली खबरदारी घेणें. यांत चुकी झाली कीं निवडणारे लोक जुने असोत किंवा नवे असोत, ते उपहास्यतेस पात्र होणारच. समाजाग्रणीत कोणत्याही प्रकारचा दुर्गुण असतां कामा नये इतकेंच नाही तर त्याचे अंगीं प्रशंसनीय सद्गुणाचा संकर असला पाहिजे. कित्येक लोकांची अशी समजूत असते की, ज्याच्या अंगी एक दोन चांगलें गुण आहेत त्याच्या अंगी पांच चार वाईट गुण असले तरी त्याला समाजाचे पुढारीपण देण्यास कांहीं हरकत नाही पण आमच्या मतें ही समजूत फार गैर आहे. ज्याचें सारें आयुष्य द्रव्यार्जनांत किंवा वरिष्ठांची हांजी हांजी करण्यांत गेलें, जो स्वहितासाठी लोकांचें हवेंतितकें नुकसान करण्यास भीत नाहीं; बाटलीबाई ज्याची सखी झाली आहे; खोटें बोलण्यांत कांही दोष आहे असें ज्यास वाटत नाही; जो सत्कृत्यासाठीं उदार हात कधींही पुढें करीत नाहीं; ज्ञान संपादण्याचा ज्याला पराकाष्ठेचा

तिटकारा आहे, खोटी मिजास व खोटी प्रतिष्ठा हीं ज्यास अत्यंत प्रिय आहेत, शुष्क वाचालता करण्यांत ज्यास पराकाष्ठेचा आनंद वाटतो; आपल्या थोड्या फायद्यासाठीं गांवाचें किंवा राष्ट्रांचें नुकसान करण्यास जो तयार असतो; ज्याला दुसऱ्याचें बोलणें ऐकून घ्यावेंसें वाटत नाहीं, दुष्कर्मांनीं संपादिलेल्या द्रव्यापासून उत्पन्न झालेल्या पापाचें क्षालन ब्राह्मणभोजनें घालून, देवालयें बांधून, किंवा व्रतवैकल्यें अथवा यात्रा करून होतें. असें जो समजतो; न्याय, सत्य शांति अनुकंपा वगैरे गुण ज्याच्या अंत:करणांत वसत नाहींत – सारांश ज्याचें नांव ऐकल्याबरोबर किंवा मूर्ति पाहिल्याबरोबर श्रोत्याच्या किंवा प्रेक्षकाच्या मनांत भीति, प्रेम व पूज्यबुद्धि उत्पन्न होत नाहींत – असा मनुष्य लोकाग्रणी होण्यास अगदीं उपयोगी नाहीं. जुन्या लोकांचा पक्ष पडता आहे. तेव्हां निदान त्यांनीं तरी अशा प्रकारच्या दुर्गुणांपासून जो अत्यंत अलिप्त असेल त्यासच आपला पुढारी नेमण्याबद्दल फार काळजी घेतली पाहिजे.

# मध्यमपदलोपी समास

## अच्युत बळवंत कोल्हटकर

रा. रा संदेशभावजी ह्यांस -

त्या अवन्तिका बाई बसल्या होत्या ना ? त्यांच्याच मागें कांही खुर्च्या सोडून मी बसलें होतें. गोविन्दरावजींच्या घरच्याही बायका जवळच होत्या. पलीकडच्याच ओळीला तिकडेही बसणं झालं. पहिल्यांदा यायचं मनांत नव्हतं. ह्मणायचं कीं पैसाफण्ड तो काय आणि त्याच्यावर टिळक बोलणार तरी काय ? पण भावजी, तुह्मी इतक्या आगत्यानं तिकिटें पाठवून दिलीं तेव्हां असं वाटलं कीं आतां सभेला न जावं तर तुमचं मन नाखूष होईल. कुणाचं मन मोडायचं ह्मणजे, भावजी, तिकडे अगदीं संकट वाटतं. भावजी, असा उदार स्वभाव आहे ह्मणून कुणाशी कधीं तंटे होत नाहींत. आमच्या घरीं, भावजी, कधीं कुणाचा अपमान व्हायचा नाही. सगळ्यांचं स्वागत, चहापाणी, होय नव्हे, सगळं अगदीं यथास्थित व्हायचं, मग तो नेमस्त असो नाहीतर राष्ट्रीय पक्षाचा असो. अन्ताजीपन्त काळ्यासारखी माणसं येऊन शिवराळपणा करायला लागली तरी कधीं 'गरम' व्हायचं नाही; वरं, देवधरांसारखीं माणसं येऊन, हें असं आहे नू तें तसं आहे, असं जरी सांगायला लागली तरी आपलं शान्तपणानं ऐकून घ्यायची तयारीच; त्यामुळ कसलाही मनुष्य आमचे घरीं आला तरी आपला नरमतोच. तिकडे कधीं सोंवळं नेसण्याचा परिपाठ नाहीं. रावजी होते तरी त्यांच्या देखतसुद्धां ओंवळ्यानंच बसायचं, पण असं आहे, तरी कुणी पांगारकरांसारखा सोंवळा ब्राह्मण पाहुणा आलाच तर त्याचीही बरदास्त जिथल्या तिथं ठेवायची ! ह्मणायचं कीं, आपली धार्मिक व सामाजिक मतें आपण जाहीर रीतीनं 'प्रीच' करावीं, पण तीं घरीं येणाऱ्या पाहुण्यांवर कधीं लादूं नयेत. त्यामुळं गृहस्थपणाला बट्टा लागतो. आमच्या सासूबाईंचं मीं तुह्मांला सांगितलंच आहे. सासूबाईंचं सोंवळं फारच कडकडीत,

पण थेट इकडच्याच प्रमाणं स्वभाव मिळता असल्यामुळं कधीं घरांत कटकट ह्मणून झाली नाहीं. आमच्या वन्संचासुद्धां स्वभाव अगदीं हाच मासला बरं ! आतां पुनर्विवाहाचं तेवढं नांव झालं, त्याला उपाय नाहीं, पण रहाणी भावजी, अगदीं बाळबोध ! 'पुनर्विवाहः' चा तरी नुसता आळच आहे ! भावजी, लग्नांत अश्शा अक्षता पडल्या आणि लगेच अस्सं झालं ! मागच्या जल्मीचं कांहीं पाप होतं ह्मणावं, दुसरं काय ? मंगळागौरीच्या पुजेंत कांहीं 'नून्य' राहिलं असेल !

भावजी, एवढं, कधीं नव्हतं, टिळकांच्या व्याख्यानाला जाणं झालं, पण गेल्यासारखं यशस्वी झालं, त्यामुळें, भावजी, माझा जीव हलकासा झाला. नाहींतर जर टिळकांच्या भाषणांत ह्मणा किंवा दुसऱ्या कांहीं गोष्टींत ह्मणा, कांहीं गैरवाजवी प्रकार झाला असता, तर मला मग पुढें जायलाच नको होतं. मग माझी अश्शी थट्टा चालावेली असती कीं, मला नको जन्म झाला असता. भावजी, मग तुमचा संदेशसुद्धां थट्टेतनं अगदींच वांचला असतां असं नका समजूं. अगोदर 'सन्देश'चा, पण 'संदेश'चाच कां ? मराठी वर्तमानपत्र ह्मटलें कीं त्याचाच, कण्टाळा आहे. इन्दुप्रकाश, ज्ञानप्रकाश घरीं येऊन पडतात, पण महिन्यामहिन्यांत उलगडणंसुद्धां होत नाहीं. अगदीं महिन्यानं पाह्यलं तरी वरचं 'गोखल्यांचं विश्रांतिगृह, किंवा 'विहिरीवरचं भाण्डण' कायम दिसायचं, पण मग मलाच दया येते व कोटांत जाणं झालं कीं तुमचा सन्देशन् प्रकाशन् इन्दुन्, ह्यांच्यावरची धूळ झाडून मी सगळीं सम्पवून टाकतें. अलीकडे 'सन्देश' कधीं कधीं बघायचा, पण तो कशाकरितां ? भावजी, राग नका बरं येऊं देऊं, पण तुमचं आर्टिकल अजून एकसुद्धां वाचलं नसेल. तुमच्याकडे कांहीं त्याबद्दल दोष नाहीं; तुह्मी उत्तम लेखक आहांत हें मला माहीत का नाहीं ? पण तिकडे मराठी लेखकांवर खप्पा मर्जी आहे त्याला माझा काय बरं उपाय ? मी तिकडे तुमची पुष्कळ तारीफ करतें. अमुक वाचायचंच, तमकं नाहीं का वाचलं ? अशी परोपरीनं टुमणी लावतें, पण तिकडे जणूं कांहीं हें खिजगणतींतच नाहीं. तिकडे संदेशवर नजर केव्हां फेंकायची ? तर जेव्हां जर्मनीवरचा लेख आला असेल, बेटा गुलाबच्या कानगोष्टी असतील अथवा, भावजी, इश्श पण मीच का तें आपल्या तोंडानं सांगूं ?

भावजी, टिळकांचं त्या दिवशींचं भाषण फारच उत्तम झालं ! भाषण होतं लहानच. मला वाटतं पुरं तासभरसुद्धां झालं नसेल. पण तें इतकं प्रसंगाला योग्य होतं कीं, एवढा समाज पण आनन्दानं नागासारखा डोलायला लागला. मीं टिळकांचीं भाषणं फारशीं कधीं ऐकलेलीं नाहीत. एकदा कांग्रेसमध्यें व एकदां मला वाटतं शिवाजीउत्सवांत, एवढींच त्यांचीं भाषणं मीं ऐकलेलीं होतीं. परवांही त्यांच्या भाषणांत उपमा, उत्प्रेक्षा, अलंकार, चढताउतरता आवाज, अंगविक्षेप, टेबलावर हात आपटणं, ह्यांपैकीं कांहींएक नव्हतं ते साधे उभे राहिले, साधी भाषा बोलले, व साध्याच गोष्टी त्यांनी सांगितल्या ! पण त्या साध्याच गोष्टी, भावजी, किती चांगल्या लागल्या ! टिळकांचा आवाज कांहीं प्रसिद्ध वक्त्यांप्रमाणें 'सिल्व्हरी' नाहीं. पुष्कळ वक्त्यांच्या शब्दांत जी एकप्रकारची 'रिंग' असते तीही त्यांच्या आवाजांत नाहीं. परन्तु पांच डिमॉस्थनीसांस आदळआपट करूनही जें करतां यायचं नाहीं तें त्यांनी केलं. भावजी, 'वक्ते' ह्मणून प्रसिद्धीला आलेले जे लोक आहेत त्यांना आरडल्याओरडल्यावांचून आणि इकडची टेबलं तिकडे केल्यावांचून गत्यंतरच नसतं; कारण श्रोतृसमूहाला सहज उचलून धरण्याइतकं त्यांच्या अंगांत अवसानच नसतं. त्यांना अंगाचा आळापिळा करावा लागतो, तेव्हांच कुठें श्रोतृसमूह त्यांना पेलतो. परंतु ज्यांचेजवळ विचाराचं मोठंच बळ आहे, त्यांना इतका त्रास हवा कशाला ? ते कुणीकडनंही आले, कसेही उभे राहिले, तरी सगळा समाज ते सहज खांद्यावर टाकूं शकतात. परवांच्या सभेंतल्या मुम्बईतील लोकांना, भावजी, असंच झालं. त्या सगळ्या समाजांत विचारांच्या योगानं टिळक इतके उंच दिसायला लागले कीं; प्रत्येकाला वाटलं, टिळक सहज आपल्याला उचलतील. भावजी, आह्मी लहान होतों ना, तेव्हां पिंपळखऱ्यांची वारी मला कडेवर घ्यायचा प्रयत्न करी. आमच्या आईला असं वाटे कीं, ही वारी हिला कोठेंतरी पाडणार ! इतका ती स्वतःचा व माझा लोंबाळा करीत असे. पण तिकडनं दामूकाका आले कीं, ते वारीला न् मला भर्रदिशी भिरकावून आपल्या खान्द्यावर टाकीत ! अन् मग आह्मी ज्या खिदळत असूं तें सांगायची सोय नाहीं. आणि तितक्यांत लेल्यांची सोनी, जोशांची मनी, महाशब्दयांची ठकी, गोडबोल्यांची सुभी ह्याही तिथें याव्या, अन् काकांनीं

त्यांनाही उचलून घ्यावें. मग आमच्या व त्यांच्या खिदळण्याला कांहीं सीमाच नाहीं ! सारें घर आम्ही डोक्यावर घ्यायच्या !

भावजी, टिळकांच्या लेक्चरांतलं एक वाक्य माझ्या भारीच ध्यानांत राहिलेलं आहे. आपल्या भाषणाच्या आरंभींच ते म्हणाले कीं, पैसाफण्ड हा मध्यमपदलोपी समास आहे. पैसा पैसा जमा करून उभा केलेला फण्ड अशी त्यांची पैसाफण्डाची व्याख्या केली. टिळक म्हणाले कीं, पैसा पैसा ह्यांत कांहीं विशेष नाहीं, कारण पैशानं कितीही मिशावर ताव दिला तरी त्याची किंमत पैशा इतकीच ! त्याला थोर कोण म्हणेल ? टिळक म्हणाले कीं, 'फण्ड' ह्यांतही कांहीं विशेष नाहीं, कारण असे फण्ड हजारों पडलेले आहेत. टिळकांच्या भाषणाला ना. मनमोहनदास रामजी अध्यक्ष होते. त्या अध्यक्षांचं उदाहरण घेऊन त्यांनीं सांगितलं कीं, नुसत्या ह्या अध्यक्षांनीं मनांत आणलं तर एका लग्नाला ते पन्नास साठ हजार रुपये खर्च करतील. पण एका श्रीमान् मनुष्यानं पन्नास हजार रुपये कमावले अथवा जमविले ह्यांत, भावजी, मौज नाहीं. कारण टिळकांनीं सांगितल्याप्रमाणं ह्यांत मध्यम पदाचा लोप आहे. राष्ट्र खरं जागं झालं असं केव्हां समजायचं ? तर प्रत्येकाच्यां अन्तः-करणाचा फोटो घेतला असतां त्यांत जेव्हां, स्वदेशप्रेमाचीच मूर्ति यायला लागेल तेव्हां ! आणि म्हणूनच समाजाचे जे पुढारी म्हणून असतात ते थोड्या श्रीमंत लोकांच्या नादीं लागायचे ऐवजीं पुष्कळ अशा बहुजनसमाजाच्या नादीं लाग-तात. बहुजनसमाजाच्या नादीं लागण्यांत, भावजी, सुख कां असतं ? त्या-पेक्षां चार श्रीमंत कुळं गांठलीं, त्यांच्यापासून वाटेल तेवढ्या मोठमोठ्या देणग्या काढल्या, त्यांच्याच मोटारींतनं हिंडलं, त्यांच्याच बंगल्यांतनं उतरलं, तर ते कितीतरी सुखाचं असतं ! पण भावजी, असं केल्यानं जरी कार्य लवकर व बिन श्रमानं झालं तरी त्यांत राष्ट्राचा फायदा नसतो. कारण राष्ट्र-भक्तीची जागती ज्योत प्रत्येक अंतःकरणांत उत्पन्न होणं ही जी राष्ट्राच्या अस्तित्वाला लागणारी पहिली मुद्याची गोष्ट ती त्यांत साधत नाहीं. राष्ट्राची खरी शाश्वती जी आहे ती राष्ट्रांतल्या चार माणसांनीं शहाणं असावं ह्यांत नाहीं, तर राष्ट्रांतल्या प्रत्येक माणसानं शहाणं व्हावं ह्यांत आहे. चार शहाणीं माणसं जर एखाद्या राष्ट्रांत एका ठिकाणीं जमलीं, तर भावजी, तीं काय करूं

शकणार नाहींत ? मला वाटतं, तीं इकडचा डोंगर तिकडे नेऊन ठेवतील, व तिकडचा सेतु इकडे आणतील. पण भावजी, अशीं चारच माणसं राष्ट्रांत उत्पन्न होणं ह्यांत कांहीं राष्ट्राचं खरं हित नाहीं. कारण मग राष्ट्राचं बरं वाईट त्या चार माणसांवरच येऊन बसतं. तीं चार माणसं आहेत तोंपर्यंत राष्ट्र आहे. तीं जर का नाहींशीं झालीं कीं राष्ट्र बसलंच! भावजी, आपल्या महाराष्ट्राचा इतिहासच नाही का हें सांगत! आपल्या राष्ट्राचा, इतिहास ह्मणजे तीन हिऱ्याची नथ! शिवाजी, बाजीराव आणि नाना फडणीस! ह्यांपैकीं शेवटचा हिरा ढांसळला आणि मराठशाहीचं नाक खालीं झालं!

ह्मणून भावजी, शहाणे लोक काय करतात कीं, ते चार शेटसावकारांच्याच नादीं लागत नाहीत, तर कुणी मार्गदर्शक नसल्यामुळें रानोमाळ भटकत फिरणारा जो बहुजनसमाज त्याला ते लगामीं लावायला पाहतात. ह्यांत त्रास फार असतो. एकाचं तोंड उत्तरेला असतं, एकाचं तोंड दक्षिणेला असतं, एकाला एक हवं असतं, दुसऱ्याला दुसर हवं असतं! त्यांना धड शिक्षण नसतं, धड समजूत नसते, परस्परांतही त्यांच्या लाथाळ्या असतातच! कोणाची शेजारकी असते, कोणाची भाऊबंदकी असते, कोणाचीं वांकडीं असतात, कुणी कुणाचा मत्सर करीत असतो. भावजी, साऱ्या लोकसमाजाला एकाच हेतूकडे वळवणं हे काय सवघड काम असतं का? अहो, वाऱ्याची मोट बान्धणं आणि हें सारखेंच! पण तें करावं लागतं! तें केलं तरच राष्ट्र जिवन्त राहतं! तें करायचा कंटाळा करून चालत नाहीं. भावजी, एवढा पैसाफण्ड जमा करून करायचं काय तर कांचशाळा चांगली चालवायची! पण कांचशाळा चालवायला श्रावणांतल्या पैशाची व भोजनदक्षिणेची काय गरज? टिळकांनींच समजा उद्यां आपलं पुण्य खर्चून एखाद्या धनाढ्य शेटजींच्या पुढें उपरणं पसरलं तर त्यांच्या उपरण्यांत पांचपन्नास हजार रुपये कुणीं टाकणार नाहीं का? टिळकांना अथवा यशवन्तराव नेन्यांना हें समजत नाहीं का? पण भावजी, असला पैसा घेऊन त्यांतून दहा कांचशाळा चालल्या तरी तें नको आहे. त्यांत कांहीं लोकजागृति नाहीं, त्यांत देशभक्ति नाहीं, भावजी, पैसा व फण्ड ह्यांतलं मधलं पद त्यांत नाहीं. आणि ह्मणून देशोर्जिताच्या दृष्टीनं हें असलं घबाड अगदीं कवडीमोल आहे.

मला अगदीं पक्कं आठवतं, भावजी, कीं एकदा आईनं मला काय सांगितलं की आज कांही घरात कुणी जेवायचं नाहीं, मेजवानीला जायचं आहे, तेव्हां तूं आज भात टाक. मी तेव्हां केवढी होतें हणाल—असेन फार झालं तर आठ वर्षांची. पण आईनं परवानगी देतांच माझा हर्ष त्रिभुवनांत मावेना! मला इतके दिवस चुलीशीं लुडबुड करण्याची हौस वाटत होतीच. आईच्या सेंपाकांत अवाडाव करून कित्ती वेळांतरी मी आपली बोटं भाजून घेतलीं होतीं! आज खुद्द आईनंच जेव्हां ही परवानगी दिली तेव्हां लागलीच मोटा आजीबाईचा पोक्तपणा आणून मी चुलीशीं फूं फूं करायचं अवसान घातलं. पहिल्या-पहिल्यांदा तांदुळ किती घ्यायचे, डाळ किती घ्यायची, तिखटमीट किती घालायचं, वगैरे माहिती विचारून विचारून मी आईला उमळवटी आणली. आई त्या दिवशीं अगदीं त्रासून गेली असेल!! शेवटीं एकदां मीं सेंपाकाला कशीतरी बसलें. पण काय? थोड्याच वेळांत धुरानं डोळे भरून गेले, नाक तांबडं लाल झालं, घामाच्या धारा सुरू झाल्या, हात बरबटले, सारी भाण्डीं बरबटलीं, पाटावर पाणी सांडलं, आणि चोहोंकडे सेंपाकघर जणूं कांही खायला आलें! इतक्या अवधींत सरासरी भातच कायतो उमासे घामासे देऊं लागलेला होता. आईनं तो प्रकार पाह्यला आणि तितक्यावरच माझी सुटका केलीन्! पण कर्मधर्मसंयोगानं झालं काय कीं मेजवानीचा बेत रहित झाल्यावरून बाबा घरींच जेवायला आले. मला वाटलं कीं सेंपाक बिघडल्याबद्दल बाबा आतां मला चांगलाच ठोक देणार! पण पहातें तों साराच चमत्कार दिसला! बाबांना आईनं मोठ्या प्रेमानं सांगितलं कीं आजचा सेंपाक 'बाळ' नं केलेला आहे आणि बाबांनीही तो बुडीं लागलेला भात इतका नांवाजून नांवाजून खाल्ला कीं मला वाटलं कीं मी कोणी अन्नपूर्णाच आहे!

हें जसं आईबापांचं. तसंच राष्ट्राच्या पुढाऱ्यांचं असतं! त्यांना किंमत वाटते ती जनसमाजांतल्या एका माणसानें आपल्या कनवटीतनं काढलेल्या एका पैशाची नव्हे, कारण किती झाला तरी तो पैसाच. पण त्याला आनन्द होतो तो ह्या गोष्टीचा कीं राष्ट्रांतल्या साधारण व्यक्तीलासुद्धां राष्ट्राची चिंता वाटायला लागली! पैसा आणि फण्ड ह्यांच्या दरम्यान लपून बसलेलं देशभक्तीचं मध्यम पद त्याला आढळायला लागल्यामुळं त्याला आनन्द होतो. जसं

एखाद्या कृपणाला मोहोरांचा पुरलेला हण्डा सांपडला म्हणजे हर्ष होतो त्याप्रमाणं देशभक्तीचं लुप्त झालेलं मध्यम पद देशांत पुन्हा दिसायला लागलं म्हणजे देशाचा पुढारी हर्षानं नाचायला लागतो. भावजी, देशभक्तीचं हें मध्यम पद देशांत दिसूं लागणं हाच कायतो देशाचा खरा भाग्योदय होय; देशाला स्वराज्य मिळणं हा कांहीं खरा भाग्योदय नव्हे. स्वराज्य काय! देशभक्तीचा प्रसार झालेला नसतांही पुष्कळ वेळां स्वराज्य मिळालेलं असतं! मराठी राज्यांत नव्हतं कां स्वराज्य? पण त्या वेळीं सर्व राष्ट्रभर देशभक्तीची कल्पना नव्हती आणि म्हणूनच स्वराज्य जसं आलं तसं गेलं! उद्यां एखाद्या यक्षिणीनं ऑस्क्विथ साहेबांना जर असं सांगितलं कीं मी कांडी फिरवून कैसरच्या सर्व सैन्याचा संहार करतें तर तेच तिला असं म्हणतील कीं नको; अशा प्रकारचा जादूगिरीचा विजय मला नको. मला असं पाहिजे कीं, देशांतल्या प्रत्येक मनुष्यानं आपला पैसा सरकारच्या हवालीं करावा, देशांतला प्रत्येक कारखानदार दारुगोळा उत्पन्न करण्यास तयार व्हावा, देशांतील प्रत्येक तरुण व्हालण्टियर होण्यास सज्ज व्हावा व देशांतील प्रत्येक बायको शिपायांच्या मलमपट्या बांधायला धांवत निघावी. जर्मनीवर असल्याच विजय मिळविण्यांत मि. ऑस्क्विथ ह्यांना भूषण वाटेल, कारण हाच विजय खऱ्या देशभक्तीचा विजय होईल. भावजी, राष्ट्रांत देशभक्ति उत्पन्न होणें ही कांहीं सोपी गोष्ट नाहीं. तिला फार प्रयास पडतात! एक वेळ स्वराज्य लवकर मिळवितां येईल, पण देशभक्ति उत्पन्न करणं अवघड पडेल. अव्यवस्थित रीतीनं चार चोहोंकडे विसकटलेलीं अंतःकरणं एका सूत्रांत बान्धणें हे कर्म काय लहान आहे? हेंच तर साधणं प्रयासाचं असतं, पण हेंच करायला झटावं लागत! भावजी दोन माणि एका दोऱ्यांत गोंवले म्हणजे माणिच तेवढे दिसतात, दोरा दिसेनासा होतो. अन्तःकरण जोडणारा हा जो अदृश्य धागा हीच, भावजी, देशभक्ति तीच राष्ट्रप्रीति तेंच, भावजी, टिळकांनीं वर्णन केलेलं लोपून गेलेलं मध्यमपद! ह्या मध्यमपदाला गवसणी घातली म्हणजे राष्ट्र सत्कार्याकडे वळतें. परवां माधवबागेतल्या अवाढव्य लोकसमूहाला पाहून टिळकांनीं पैसाफण्डाचं असंच वर्णन केलं. ते म्हणाले आजपर्यंत पैसाफण्डाचे जे चाळीस पन्नास हजार रुपये जमले त्यांची ' रुपये ' ह्या दृष्टीनें कांहींच किंमत नाहीं! इतका पैसा एखाद्या श्रीमंत मनुष्याच्या लग्नालाहि पुरत नाहीं. पण हा पैसा पाहून मला संतोष

वाटतो तो एवढ्याकरितां कीं ह्यांतील प्रत्येक रुपया हा त्याच्या मागें दडून बसलेलीं चौसष्ट अन्तःकरणं एकत्र झाल्याची साक्ष देत आहे. ह्या पन्नास हजार रुपयांची ‘ रुपया ’ ह्या नात्यानं कांहींच योग्यता नाहीं, पण ‘ साक्षीदार ’ ह्या नात्यानं त्यांतील प्रत्येक पैशाची योग्यता आहे. आणि हा साक्षीदार, भावजी, अमलातमला साक्षीदार नाहीं तर हा संकेतसाक्षीदार आहे. हा राष्ट्रांतली गुह्यें बाहेर काढतो. दडून बसलेल्या भावना, लपून बसलेली देशप्रीति, हा साक्षीदार बाहेर काढतो. समाजांतलं लुप्त झालेलं मध्यमपद हा व्यक्त करून दाखवितो. भावजी, टिळकांची ही कल्पना अजून माझ्या मनांत घुमते आहे. मला असं वाटतं आहे कीं आपलं सारं हिंदुस्थान हा एक खेळायचा चौक आहे व ह्यांत दसऱ्याच्या निमित्तानं म्हणा अथवा दिवाळीच्या निमित्तानं म्हणा आपण साऱ्या भाऊबहिणी लपालपी खेळतों आहोंत. आपल्यापैकीं ज्याच्यावर राज्य येतं त्यानं “ सुट्यो ” असं ऐकलं कीं त्याला टिळकांसारखे पुढारी सांगतात कीं तुला तुझ्या राष्ट्रबन्धूचें अथवा भगिनीचें अन्तःकरण सांपडत नसेल तर पैसाफण्डासारख्या राष्ट्रीय संस्थेस विचार म्हणजे ती त्याची नेमकी खूण सांगेल.

आपली

**सौ. वत्सलावहिनी**

# मी कां लिहितों?

## दिवाकर कृष्ण केळकर

अनेक नामवंत साहित्यिकांचीं 'तुम्ही कां लिहितां?' या प्रश्नाचीं वेगवेगळीं उत्तरें या नभोवाणीवरून यापूर्वी आपण ऐकलीं असतीलच. ही या ध्वनिकेन्द्राची कल्पना अभिनव आणि अभिनंदनीय आहे, यांत संशय नाहीं. साहित्याच्या क्षेत्रांत प्रत्येक लेखकाची मनोभूमिका स्वतःची अगदीं स्वतंत्र असल्यामुळें लेखकाचा साहित्याकडे आणि समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन जसा असेल, तसें उत्तर त्याच्याकडून दिलें जाईल, हें स्वाभाविक आहे. पैशासाठीं लिहितों, कीर्तीसाठीं लिहितों, स्वतःच्या समाधानासाठीं लिहितों, अशीं अनेक कारणें सांगितलीं जाऊं शकतील.

सकृद्दर्शनीं हा प्रश्न अगदीं सोपा, साधा असा दिसला, तरी त्याचें समर्पक आणि प्रामाणिक असें उत्तर देणें तितकें सोपें आहे, असें मात्र मला वाटत नाहीं. 'विवाह' या विषयावर लेखन करण्याची जगांतील कांहीं थोर व्यक्तींना काऊंट केसरलिंग यांनीं जेव्हां विनंति केली, तेव्हां बर्नार्ड शॉ यांनीं ती नाकारली; आणि कळविलें कीं, "पत्नीच्या हयातींत याविषयीं खरेपणानें मी कांहींहि लिहूं शकणार नाहीं; आणि अप्रामाणिक वाङ्मयनिर्मिति करण्याची माझी इच्छा नाहीं!' हें त्यांचें उत्तर विक्षिप्तपणाचें नव्हतें, असें आज या प्रसंगानें माझ्या प्रत्ययास येत आहे. व्यवसायांत असणाऱ्या माणसाला आपले व्यवसायांतील रहस्य सांगा, असं म्हणण्यासारखेंच हें आहे!

आजवर ज्यांनीं या प्रश्नाचीं उत्तरें या नभोवाणीवरून दिलीं, ते सर्व मान्यवर आहेत. अर्थात् त्यांच्या वचनांना प्रामाण्यहि आहेच. पण मला या प्रश्नाचें उत्तर देणें कसें कठीण आहे, हेंहि सांगितलें पाहिजेच.

'स्वतःच्या समाधानासाठीं मी लिहितों; त्यांत मला पैशाची किंवा कीर्तीची अपेक्षा नाहीं' असें मी प्रामाणिकपणें म्हणूं शकत नाहीं. आपल्या

लिहिण्यानें दुसऱ्याचा मानासिक आनंद वाढवावयाचा हा हेतु नाहीं, तर लिहावयाचेंच कशाला? वाङ्मयनिर्मितीपेक्षां मग योगसाधन जास्त चांगलें! आपल्या लेखनानें दुसऱ्याला बरें वाटावें, त्यानें तें सौख्य व्यक्त करून दाखवावें; यांतच लेखकाचा खरा आनंद. त्यामागें आपोआप पैसा आणि कीर्ति येतेच. पैसा आणि कीर्ति यांच्यामागें आपणाला धांवण्याची गरज नाहीं, अशी माझी दृढमूल समजूत असल्यामुळें पैशासाठीं किंवा कीर्तिसाठीं म्हणून लेखन करण्याची कल्पना कधींहि माझ्या मनाला शिवली नाहीं. 'आपलें लिखाण दुसऱ्यांनीं वाचून त्याचा रसास्वाद घ्यावा, अशी अपेक्षा मी धरीत नाहीं' असें म्हणणें म्हणजे वेळेचा आणि शक्तीचा अपव्यय करतों असें सांगण्यासारखें आहे! आध्यात्मिक लोक मात्र याला अपवाद आहेत. कारण ते काय वाटेल तें करूं शकतील! – आणि खरोखरच जर कुणी असें अट्टाहासानें सांगत असेल, तर त्याचें लेखन इतरांनीं पसंत केलें नाहीं, इतरांना त्यांत आनंद नाहीं, असें समजावयाला काय हरकत आहे?

निव्वळ पैशासाठीं लिहितों, असें खरेपणानें म्हणूं शकणारे भाग्यशाली लेखक या महाराष्ट्रांत अनेक आहेत. ते तसें म्हणतीलच, असें नाहीं. केवळ पैशासाटीं ते आपलें लेखन चालवूं शकतात, याचा अर्थच हा कीं, त्यांच्या लिहिण्यांत चमक आहे. ते वाचकांना इतका आनंद देऊं शकतात कीं, त्याच्या मोबदल्यांत भरपूर पैसे देणें वाचकांना जड वाटूं नये! हें लेखन किती प्रमाणांत उपकारक होईल, याचा विचार करण्याची गरज नाहीं. कदाचित् ते अपकारकहि असूं शकेल. पण वाचकांना तें प्रिय होत असलेंच पाहिजे.

आणि, केवळ कीर्तीसाठीं लिहितों, असें म्हणणें जरासें धाष्ट्यांचें नाहीं कां? एखाद्या लेखनानें कीर्ति मिळावी, पैसा नाहीं मिळाला तरी चालेल. अशी अपेक्षा करणें याचा अर्थ हाच कीं, त्यासाठीं भरपूर पैसा खर्च करावा, इतकी आसक्ति अशा वाङ्मयाबद्दल वाचकाला वाटणें अपेक्षित नाहीं. अशा लेखनावर वाचकांनीं लोभून पडूं नये, किंवा त्याचा अनादरहि करूं नये, नुसती कीर्तीची बिदागी लेखकांच्या पदरांत टाकावी! असें लेखन हें अर्थातच वाचकांच्या समजाच्या बाहेर असलें पाहिजे. जें आपल्याला कळलेंच नाहीं,

त्याबद्दलच कुणीहि अशी स्थितप्रज्ञवृत्ति धारण करूं शकेल ! मग अशा वाङ्मयाचा समाजाला उपयोग तरी काय? वाचकाला रसास्वादाचा आनंद नाहीं. लेखकाला दुसऱ्याला सुख दिल्याचें समाधान नाहीं. लाभ काय, तर कोरडी कीर्ति!

लेखक होणें, विशेषतः लघुकथा लिहिणें यासारखें सोपें काम दुसरें नाहीं, अशी सर्वसाधारण समजूत दिसून येते. पण माझा स्वतःचा अनुभव, यासारखें कठीण दुसरें कांहीं नाहीं, असाच आहे! आपलें लिखाण छापून येतें एवढी चेतना ज्यांना पुरते, पाहतां पाहतां जे भराभर वाङ्मय निर्माण करूं शकतात, त्यांचा मला हेवा वाटतो! 'स्नॅपशॉट' घ्यावेत तशा वेगानें शब्दचित्रें निर्माण झालेलीं पाहून कौतुक वाटतें! मला स्वतःला मात्र लेखनासाठीं एखादी कल्पना मिळाली तरी रसानुकूल भावनांची भरती यावयाला कालावधी लागतो. भावनांना उपकारक स्वभावविशेष लवकर सांपडत नाहीं; आणि, त्यांच्या चित्रणाला समर्पक शब्दसंपत्ति जुळून यावयाला मनस्वी दिरंगाई होते! आणि हें सर्व लाभल्यानंतरहि स्वतःच्याच पसंतीचें शिक्कामोर्तब मिळवणें राहतेंच! आणि, लोक मात्र सारखे विचारतात 'तुम्ही कां लिहीत नाहीं? कोणतीं साधनें अनुकूल नाहींत? कां तुमच्या प्रतिभेनेंच रुसवा धरला आहे?' न लिहिण्याबद्दल इतका बदनाम झालेला साहित्य सेवक कदाचित् नसेलहि!

पण या दोन्ही प्रश्नांचें माझें उत्तर एकच आहे. वाचकांना आनंद होईल, निश्चित आनंद होईल, अगदीं आंतल्याआंत गुदगुल्या होतील—अशी स्वतःची पूर्ण खात्री होईपर्यंत मी लेखन करीत नाहीं. असा बाणा बाळगणें हें गैरसोईचें, नुकसानीचें, धारिष्टाचें, जबाबदारीचें आणि कांहींसें अविचाराचें आहे, याची मला पुरेपूर जाणीव आहे. यासाठीं समाजाचें अभ्यसन हवें, लोकांच्या मनःप्रवृत्तींचें ज्ञान हवें, प्रतिदिनीं बदलणाऱ्या परिस्थितीचें निरीक्षण हवें, नवीनतेसाठीं संशोधन हवें; आणि, वाचकांशीं समरस होणारें पण लोण्यासारखें मऊ आणि बलवान, लवचीक आणि कणखर असें पोलादी मन हवें, हेंहि समजतें. हें एकदां कळलें म्हणजे लेखनासारखें कठीण काम दुसरें नाहीं, असें कां वाटतें, याचा सहज उलगडा होईल.

कोणतीहि गोष्ट खरेपणानें सांगितली, म्हणजे त्यावर विश्वास बसतोच असें नाहीं. सत्य हें कधीं नावडतें, कधीं अनपेक्षित आणि कधीं असाधारण असूं शकतें. वाल्मीकीला क्रौंचवधाचा प्रसंग पाहून जशी काव्यस्फूर्ति झाली, तशी शेजारच्या एखादा सुखदुःखाचा प्रसंग पाहून, मला स्फूर्ति होतें, शरीर अविश्रांत होतें, पांढऱ्यावर काळें केल्याशिवाय अगदीं राहवत नाहीं आणि 'अविदितगतयामा' अशा रात्री वाङ्मयनिर्मिति करतात, असें जर मी सांगितलें, तर तें खरें वाटेल; आणि कदाचित् बरेंहि वाटेल. पण मला तसें सांगतां येत नाहीं, याला नाइलाज आहे!

या विषयाकडे पाहण्याची माझी दृष्टि इतरांहून भिन्न असेल, म्हणूनहि कदाचित् असें होत असेल. एखादी लघुकथा किंवा कादंबरी म्हणजे नुसता रंजनाचा विषय नव्हे, नुसतें शब्दचित्र नव्हें, नुसतें जागरण तर नव्हेंच नव्हें, अशी माझी समजूत असल्यामुळें फक्त कलाकृति तेवढ्या निर्माण कराव्यात, उगीच लिहीत सुटूं नये, असा माझा स्वभाव झाला आहे. आपला 'कॅमेरा' सुंदर असला आणि आपले 'स्नॅपशार्ट' सुबक येऊं लागले, कीं भराभर फोटो घेण्याची प्रवृत्ति होणें अगदीं साहजिक आहे. सुंदर विषयांचे फोटो घेतले म्हणजे ते सुंदर दिसतात. त्यांत विशेष असें काय आहे! साहजिकपणें लोकांना आवडतील अशा गोष्टी हुबेहूब शब्दांनीं चित्रित करणें यांत लेखकाचें कांहीं जर कौशल्य असेल, तर तें फोटोग्राफीचें आहे; नकलेचें आहे; चित्रकाराच्या अस्सल कलाकृतींत त्याहून विशेष असें कांहीं तरी हवें. लेखकाच्या वाङ्मयनिर्मितींतहि असेंच कांहींतरी विशेष – विधात्याच्या सृष्टींत दिसून येणाऱ्या सौंदर्याहूनहि अतिशयित – असें अलौकिक सौंदर्यप्रतीत झालें पाहिजे–ती त्याची इतरांना दिपविणारी कविमनाची प्रतिसृष्टि पाहिजे. तरच तिला 'सारस्वत' कलाकृति, असें म्हणतां येईल. नारायणऋषीला फजीत करण्यासाठीं रंभा – मेनकादि रूपवतींना विधात्यानें पाठविलें असतां, निसर्गातील सर्वोत्कृष्ट सौंदर्यालाहि लाजविणारें, त्या महान् प्रतिभावान् आद्य कलावंतानें–आपल्या मांडीच्या चित्रफलकावर गंधानें जें सुंदर रूपनिधान निर्माण केलें, तें विधात्याला त्यापूर्वी कधींहि करतां आलें नव्हतें. तिलाच 'उर्वशी' असें नांव

देऊन आपल्या स्त्रीसौंदर्याचें 'मॉडेल' म्हणून विधात्यानें मान्य केलें. म्हणजे आहे, 'जें न देखे रवि तें देखे कवि!' सौंदर्य आणि आनंद या बाबतींत कवीची कलाकृति म्हणजे सृष्टिकर्त्याच्याहि पुढचें पाऊल पाहिजे, असा संकेत मनाशीं बाळगून आपल्या स्वल्पशा सामर्थ्याची पराकाष्ठा करणें, हें मी आपलें वाङ्मविषयक कार्य मानतों. मग तें इतरांच्या बुद्धीला कसेंहि भासो! समाज आपलें कौतुक करावयाला तयार आहे, एवढ्यासाठीं या भूमिकेवरून खालीं कोसळण्याची माझी तयारी नाहीं! आणि, आपल्या वाङ्मयकृतीनें इतरांना आनंद होतो, असें कळणें, यासारखें दुसरें समाधान नाहीं. पण नुसतें सुख इतर लोक एकमेकांना सहज देऊं शकतात. आपल्या वाङ्मयामुळें होणारें सुख हें इतरांहून विशेष, केवळ आपलें स्वतःचें खास असें असावें, हें आपल्या कलाकृतीचें उद्दिष्ट मी मनांत बाळगलें आहे. 'मी कां लिहितों' या प्रश्नाचें हें माझें उत्तर आपणाला पटेल आणि रुचेल, अशी मला आशा आहेच. निदान आपलें लक्ष त्याकडे सहानुभूतीनें, आपलेपणानें आणि प्रेमळपणानें वेधलें, म्हणजे झालें.

# एका नूतन अमूल्य ग्रंथावरील अभिप्राय

## पु. व. देशपांडे

**केल्यानें देशाटन पंडितमैत्री सभेंत संचार,**
**शास्त्रग्रंथविलोकन मनुजा चातुर्य येतसें फार**

**" ट्रॅव्हल् व्हेन यू मस्ट "**

– जी. आय. पी. चा मॅनेजर.

महाराष्ट्र साहित्यभांडार अमूप आहे. ज्ञानदेवांच्या ' इये मराठीचिये नगरीं ' त सर्व विद्यांचा आज सुकाळ आहे. नवसाहित्य जनतासन्मुख झाल्यापासून कुठल्याहि गर्दीत दिलेला चार धक्क्यांपैकी पावणेचार धक्के साहित्यिकांना लागतात. किंबहुना मध्यां मराठी पुस्तकांपेक्षां साहित्यिकांचीच संख्या अधिक आहे असें म्हणणें वावगें होणार नाहीं. आज आपल्या मायबोलीचा वाङ्मयवृक्ष विपुल पर्णभारानें डंवरला आहे. मराठीच्या राज्यांत सर्वत्र वाङ्मय–वाङ्मय–वाङ्मय हा बोल दुमदुमतो आहे. किरकिरें पोर काव्याचा हट्ट धरूं लागलें आहे, रुसलेला जांवई महाराष्ट्र शब्दकोशाचे सर्व खंड सासूनें डोक्यावरून आपल्यापाशीं आणून दिले पाहिजेत असला सखोल–व्यासंगी रुसवा धरूं लागला आहे, तर एक महिना झाला तरी नवी रूपककथा वाचायला दिली नाहीं म्हणून पत्नीनें पतीशीं अबोला धरला आहे. साहित्य अगदीं नसानसांतून वाहूं लागलें आहे. वाङ्मयाचे सर्व प्रकार समृद्ध होऊं लागले आहेत. इसापाला गुलाम बनवणारे लघुकथा लेखक, एक एक फडताळ भरेल इतकीं खंडकाव्यें लिहिणारे कवि, डिकन्स, थॅकरे (सोमरशेट मोघम) वगैरे पाश्चिमात्यांना खालीं पाहूं लावणाऱ्या प्रभावी, प्रमाथी, तेजाळ इत्यादि प्रकारच्या–कादंबऱ्या, शेक्सपिअरला सुद्धां तो जिवंत असता तर ' टु बी ऑर नॉट टु बी ' च्या शृंगापत्तींत लोटणारीं नाटकें, आत्मचरित्रें, लघुकथा, लघुत्तमकथा, तमकथा, कथा सर्व कांहीं वाङ्मयप्रकारांची फुटकळ तथा जथाबंद पैदास

जोरांत चालू आहे. नाहीं म्हणायला मराठींत प्रवासवर्णनें मात्र विशेष नाहींत. आज आपल्या रांगड्या मायबोलीच्या झोंपडींतल्या इतर कणग्या भरून वहात असतांना प्रवासाची कणगी मात्र बरीच रिकामी आहे. ह्याला कारणें अनेक आहेत. महाराष्ट्र देशच विविधतेनें इतका नटला आहे कीं, आम्हां मराठ्यांना इतर ठिकाणीं कांहीं विशेष असेलसें वाटतच नाहीं. आणि हें योग्यच आहे. प्रवासाचे मुख्य फायदे काय? पंडितमैत्री! पुण्याच्या एका बोळांत फेरी मारली कीं, डझनभर पंडित हाताला लागतात. 'सभेंत संचार' हा दुसरा फायदा. सभा, व्याख्यान आणि अध्यक्ष महाराष्ट्राइतके पृथ्वीच्याच काय पण मंगळ-शनीवर वस्ती असल्यास त्याच्याहि पाठीवर पिकत नसतील. तैत्तिरीय उपनिषदांतील वादस्थळांपासून ते 'कोंबड्याची पैदास' या विषयापर्यंत सगळ्या विषयांवर अहोरात्र व्याख्यानें झडत असतात. शास्त्रग्रंथविलोकनाला, पोलिसचौकीसारखी नाक्यानाक्याला प्राच्य–पुराण–इतिहास–संशोधनमंदिरें आहेत. रहातां राहिलें चातुर्य. कांहींहि न करतां फळ पदरांत पाडून घेणें याला चातुर्य म्हणतात. तें महाराष्ट्रांत किती आहे हें नव्यानें काय लिहा-वयाचें? तात्पर्य, एवंगुणविशिष्ट कारणामुळें महाराष्ट्रांत प्रवासवाङ्मय कमी. परंतु प्रस्तुत लेखांत ज्या एका प्रवासपर ग्रंथाचा आम्ही परामर्श घेणार आहो त्या ग्रंथानें ही उणीव पूर्णांशानें भरून काढली आहे.

आजवर आम्हीं अनेक प्रवासविषयक ग्रंथ वाचले. मराठी वाचले–इंग्रजीहि वाचले. 'गल्लीवरचा प्रवास' हा इंग्रजी आणि 'शिंदबादच्या सफरी' हा मराठी ग्रंथ आम्ही आजवर आदर्शभूत मानीत आलों होतों. परंतु प्रस्तुत ग्रंथानें प्रवासवाङ्मयांत एक नवा आदर्श निर्माण केला आहे यांत संदेह नाहीं. देशी भाषेंत आम्ही हा ग्रंथ प्रथमच पाहिला आणि त्याच्या सम्यग् परिशीलना-नंतर आम्हांस त्या ग्रंथाचा पुरस्कार करणें अत्यावश्यक वाटले म्हणून करीत आहों.

ग्रंथपरीक्षणापूर्वी ग्रंथकाराचें नांव आणि त्याचा परिचय करून देण्याचा प्रघात आहे. परंतु प्रस्तुत ग्रंथ हा एका दृष्टीनें वेदांसारखाच अपौरुषेय आहे. वेदांचा मुद्दाम उल्लेख करण्यांत आमचा तसाच कांहीं हेतु आहे. अलीकडे नायकाच्या जात्यांवरच्या ओव्यांनाहि 'अपौरुषेय' वाङ्मय म्हणत असल्याचा

गवगवा आमचे कानीं आला. येथें दूर अदलापुरास आमचें वास्तव्य असल्यामुळें पुण्यामुंबईकडील नवीन वाक्प्रचार वा शब्द आम्हांपर्यंत पोहोंचण्यास उशीर लागतो परंतु सध्यां 'जैनधर्मातील दिगंबर पंथाचा शिवणशास्त्रावर परिणाम' या धर्मशास्त्रविषयावर आमचें संशोधन चालू आहे. तन्निमित्त आम्ही आमच्या गांवचे शिवणशास्त्रविशारद सहदेव पतंगे यांजकडे गेलों असतां 'अपौरुषेय कपडे शिवण्याचें दुकान' असा फलक वाचला. त्यावर पृच्छा केली असतां त्यांनीं आम्हांस ब्लाऊज (चोळीचा एक प्रकार), पोलकीं वगैरे शिवणकलेची अपौरुषेय बाजू समजावून दिली. सारांश, ह्या अर्थानें नव्हे, तर वेदांतील अपौरुषेयत्वाच्याच अर्थानें आम्हीं हा शब्दप्रयोग करीत आहों. असो. हें कांहींसे विषयांतर झालें.

कुठल्याहि ग्रंथाविषयीं लिहितांना ग्रंथाच्या विषयासंबंधीं परीक्षकानें आपले चार शब्द लिहिणें हें विद्वत्सांप्रदायास फारसें सोडून नाहीं, असें म्हटले तर फारसें वावगें होणार नाहीं, असें म्हणावेंसें वाटतें. प्रस्तुत ग्रंथाचा विषय प्रारंभीं निवेदिल्यावरून 'प्रवास' हा आहे हें सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

प्रवास हा शब्द प्र आणि वास ह्यावरूनच आला आहे. वास म्हणजे राहणे-असणें प्र+वास=प्रयत्नांनीं जो वास जे रहाणें–जे असणें (अस्मि-स्वः-स्मः) घडतें तें. समजा, आपण पुण्यांत रहातां. हा आपला पुण्यांतला वास झाला. परंतु पुण्याहून भांबुर्ड्याला गाडींतून जावयास निघालां कीं, तो प्रवास झाला. प्रवास हा शब्द वापरतांना दोन स्थळांतील अंतराची किमान मर्यादा हा ह्यांतील कितपत महत्वाचा घटक आहे हा वादग्रस्त प्रश्न आहे. यावर 'सारे प्रवासी घडीचे' या सुप्रसिद्ध संतवचनाच्या आधारावर आम्ही असें सुचवितों कीं घडी हा प्रवासास किमान काल असावा. परंतु कांहींच्या मतें अंतर हा महत्वाचा घटक आहे. आमचें मत यापैकीं कोणाशींच जुळत नाहीं. सुप्रसिद्ध आंग्ल प्रवासी जॉन पेड्लर यांचें मत आमच्या सारखेंच आहे. 'प्रवास हा त्यांत होणाऱ्या दगदगीवर अवलंबून असतो.' (पहा ट्रॅव्हल लाईट इबिड) ह्या दृष्टीनें विचार करूं गेल्यास विमानांतला प्रवास हा प्रवासच नव्हे. हं! आतां विमान खूप उड्या घेत घेत गेलें व उतारूंच्या (कीं उडाऊंच्या) पोटांत

खूप गलबलले तर तो प्रवास होईल. तात्पर्य काय कीं मराठीमध्यें प्रवास-वाङ्मयाची फारच वाण आहे. परंतु प्रस्तुत पुस्तकानें ती बव्हंशानें भरून काढली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

पुस्तकाचें बहिरंग फारच आकर्षक आहे. गंगेच्या घाटावरील एक देखावा आहे. कुठल्याहि कार्याच्या मुळाशीं असेंच भगवंताचें आधिष्ठान पाहिजे. आतां आधुनिकतेच्या वेडानें खुळावलेल्यांना हें कदाचित पटणार नाहीं. त्यांना मांगल्य वा पावित्र्य यांचें काय होय ? परंतु आम्हांस मात्र सदरहु ग्रंथ-कर्त्याचें कौतुक करावेसें वाटतें.

गंगामातेचें बाह्य पृष्ठावर चित्र आणि आंत ठिकठिकाणीं पवित्र क्षेत्रें पाहण्याचा आवर्जून केलेला प्रयत्न आहे. ह्यामुळें ग्रंथाला एक प्रकारचा भारदस्तपणा प्राप्त झालेला आहे.

बुद्धिवादाच्या भ्रामक पायावर आधारलेली समाजरचना केव्हांहि टिकणें शक्य नाहीं. त्याला श्रद्धावादाचा भक्कम पायाच हवा. आमची क्षेत्रें–तीर्थें देवळें म्हणजे शिल्पमय श्रद्धाच ! परंतु नवविचारांधांना त्याचें काय होय ?

ह्या ग्रंथामध्यें दुसरी नजरेंत भरण्यासारखी गोष्ट असेल तर त्यांतला बिनचूकपणा. काळ, स्थळ आणि गति यांचा इतका सुंदर मिलाफ अन्यत्र कुठ-ल्याहि ग्रंथांत दिसून येणार नाहीं, उदाहरणार्थ, मुंबईहून बारा वाजून त्रेपन्न मिनिटांनीं निघालेला प्रवासी कुडाप्पा स्टेशनवर शून्य वाजूनएक मिनिटांनीं पोहोंचतो हें ह्या ग्रथांतले एकच विधान ग्रंथाकर्त्याच्या प्रवासविषयक सखोल अभ्यासाचें द्योतक आहे. असलीं शेंकडों उदाहरणें देतां येतील.

ह्या ग्रंथांतिल दुसरें वैशिष्टय म्हणजे त्यातला नाटयगुण. 'युनिट ऑफ टाईम, युनिटी ऑफ प्लेस आणि युनिटी ऑफ ॲक्शन.' (पहा ॲरिस्टॉटल) प्रस्तुत ग्रंथाच्या कुठल्याहि पानावर ह्या तिन्ही युनिटीज् सुंदर साधलेल्या आहेत. उदाहरणार्थ, डेक्कन क्वीन सात वाजून तीस मिनिटांनीं पुण्याहून

निघून अकरा वाजतां बोरीबंदरला पोहोंचते. लोणावळयास दीड मिनीट थांबते ह्याशिवाय पुणें ते लोणावळा हें अंतर; लोणावळा ते मुंबई हें अंतर, पोहोंचण्यास लागणारा काळ आणि गाडीची गति ह्या तिन्ही गोष्टी देऊन काळ, स्थळ आणि गतिमानता ही नाटयाला आवश्यक असलेली त्रयी फारच उत्कटतेनें साधली आहे.

ललित वाङ्मयाला आवश्यक अशी सूचकता हें तर ह्या ग्रंथाचें वैशिष्टय आहे. हें उदाहरण पहा. "बडनेरा स्टेशनवर हिंदु आणि मुसलमान दोन्ही पद्धतीच्या खाणावळी आहेत. परंतु ही गोष्ट ह्या पुस्तकांत नुसती हिं. हॉ. आणि मु. हॉ. एवढ्याच सूचक अक्षरांत मांडली आहे. शब्दांचा मितव्यय हें उत्कृष्ट वाङमयशैलीचें महत्वाचें अंग आहे. प्रस्तुत ग्रंथांत त्याचा पानोपानी प्रत्यय येतो. हा मजकूर पहा. "तळेगांव:समुद्रसपाटीपेक्षां बावीसशें सात फूट उंच" एवढेंच म्हटले आहे. सूज्ञ वाचक लगेच समजतो कीं येथें क्षयरोग्यांना हवा उत्तम असली पाहिजे. परंतु हे केवळ उंचीच्या आंकडयानें सूचित केलें आहे.

'परिश्रम' हे तर ह्या पुस्तकाचें महत्वाचे अंग आहे. जागोजागी नकाशे आहेत, तक्ते आहेत, परिशिष्टेंहि आहेत, त्यामुळें पुस्तकाला एक प्रकारच्या शास्त्रीय ग्रंथाचें स्वरूप आले आहे. तसें पाहूं गेल्यास हा ग्रंथ शास्त्रीयच म्हटला पाहिजे. कारण भूगोल–इतिहास (पहा : मळवली–येथून तीन मैलांवर बुद्धकालीन गुंफा), धार्मिकता, आहारशास्त्र ह्याचा सखोल अभ्यास केल्याशिवाय इतकी उत्तम ग्रंथनिर्मिति होणें अशक्य आहे. इतकेंच काय, परंतु "प्रवासात जरूर तेवढेंच सामान घ्या गाडीच्या फळीवर उभे राहून प्रवास करूं नका, गाडीत थुंकूं नका, तिकिटें रांगेत उभें राहून घ्या" वगैरे वगैरे इशारे जागोजागी देऊन या अज्ञात ग्रंथकर्त्यांनी आपल्या सुप्रजाजननशास्त्र ज्ञानाचीहि छोटीशी चुणूक दाखवली आहे.

इतक्या मोलाचा हा ग्रंथ निर्माण करून मराठी जनतेला त्यांनीं कायमचें ऋणी केलें आहे. ह्या ग्रंथाला आम्ही आधुनिक प्रवासकोशच म्हणूं.

पुस्तकाची छपाई आणि बांधणीही सुबक आहे. इतके असून ग्रंथाची किंमत अवघी बारा आणे आहे.

सदरहू ग्रंथ प्रत्येक रेल्वे स्टेशनवर मिळण्याची ग्रंथकर्त्यांनें सोय केलेली आहे. जिज्ञासूंनी आणि प्रवासप्रिय वाचकांनीं हे "बी. बी., जी. आय. पी. व सदर्न मराठा रेल्वेचें मराठी जॉइंट टाइमटेबल" जरूर वाचावें अशी शिफारस करून आणि सदरहू ग्रंथाच्या लेखकाकडून महाराष्ट्रसाहित्याची अशीच भरीव सेवा घडो, अशी, त्या जीवितयात्रेच्या सूत्रधार जगन्नियंत्याच्या चरणारविंदीं प्रार्थना करून संत कवि सखदेवाच्या अमृतमधुर ओवीनें हे कांहींसें लांबलेलें परीक्षण संपवितो.

**इयें संसाराचे ठायीं। प्रवासाचें दुःख पाही॥**
**सुख नाहीं ऐसें नाहीं। वोखुटांचीच दाटी पैं॥**

# माझें निशाभ्रमण

भगवन्त देशमुख

माझ्या घरापासून जवळच रेल्वेचें स्टेशन आहे आणि त्यामुळें माझ्या रात्रीं भटकण्याच्या छन्दांत खूपच भर पडलेली आहे. सकाळीं अथवा सायंकाळीं येणाऱ्या मेलगाड्यांच्या वेळीं मी कधीं स्टेशनवर जात नाहीं असें नव्हे; पण त्यावेळीं माझें मन स्टेशनवरील स्टॉलमध्यें असलेल्या नियतकालिकांत किंवा मेलच्या डिनरकॅरेज मधील उत्तम पेयांत रमत असतें. किंवा येणाऱ्या अथवा जाणाऱ्या पाहुण्यांचें निमित्त तर असतें. रात्रीच्या एक्सप्रेसच्या वेळीं मात्र मी स्टेशनवर या कारणासाठीं जात नसतो. रात्रीच्या वेळीं स्टेशनवर येण्यांत मात्र एक निराळाच आनन्द लाभतो. रात्रीं एकाच्या नंतर एका गाडीची घंटा होते. ती ऐकली कीं मी घरून निघतों. सर्वत्र अगदीं शांत असतें. पांच मिनिटांत मी स्टेशनवर येतों. तिथेंहि गडबड, घाई, गर्दी मुळींच नसतें, चार सहा प्रवासी झोपेनें पेंगळून कुठें तरी पडलेले असतात. पान, विडी, सिगरेट व फळें इत्यादि विकणाऱ्या गाड्यांचा नि हमालांचा गजबजाट शांत झालेला असतो. दूरवर सिग्नलचा हिरवा दिवा अंधाराच्या आवरणांत रंगीत ताऱ्या प्रमाणें प्रकाशत असतो. थोड्याच वेळांत लांब कुठें तरी गाडीच्या दिव्याचा प्रकाश दिसूं लागतो व लवकरच गाडीचा आवाज कानीं पडतो. असें वाटतें त्यावेळीं कीं जणूं काय एखाद्या दुसऱ्या ग्रहावरून अंतराळांतील अदृश्य मार्गानें गाडी पृथ्वीवर उतरत आहे. गाडी येऊन थांबते. दोनचार माणसें चढतात नि दोनचार उतरतात. थोड्या वेळानें गाडी शीळ देते नि अंधारांत कुठें तरी अदृश्य होऊन जाते. दिवसाच्या स्टेशन पेक्षां नि गाड्या पेक्षां रात्रीचें हें दृश्य, ही शांतता मला फार आवडते. या कारणामुळें मी केवळ स्टेशनवरच नव्हे तर इतर अनेक ठिकाणींहि रात्रीं भटकत असतो.

कुणीं तरी म्हटलंय कीं, " जो रात के समय जागता है वह अगर योगी नहीं तो भोगी जरूर होगा. " भगवद्गीतेंतहि सांगितलेलें आहे कीं,

‘ या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी ’ पण मी मात्र या अर्थानें योगी अथवा भोगी कुणीहि नाहीं नि तरीहि रात्रीच्या वेळीं भटकण्याची मल मनापासून आवड आहे. एका निराळया अर्थानें मात्र माझें हें निशाभ्रमण मला योग आणि भोग या दोहोंचाहि अनुभव आणून देतें. रात्रीचा सहवास-मध्यरात्रीची शांतता, उत्तर रात्रीचा नीरव एकांत आणि तिच्या विविध सौंदर्याचा अनुभव हाहि एक भोगच नव्हे कां ? या भोगासाठीं तर मी अनेक रात्रीं जागविल्या आहेत.

माझ्या गांवाकडे, तेथील नदीकांठीं अनुभवलेल्या अनेक रात्रींच्या स्मृति माझ्या मनांत सदैव जागृत आहेत. रात्रीच्या वेळीं नदीचा प्रवाह किती शांत असतो. डोळयांत खुपणारा, डोळे दिपविणारा सूर्य प्रकाश लोप पावलेला असतो. रात्रीं अंधार असला तरी तो प्रकाशाहून डोळस असतो. दिवसाच्या प्रकाशांत जें दिसत नाहीं, जें दिसू शकत नाहीं तें रात्रीच्या अंधारांत दिसूं लागतें. दिवसानें आभाळ कसें भकास, उजाड वाटतें, रात्रीं अनेक तारे आपल्या तेजानें तें आभाळ जणूं जिवन्त करतात. नदीकांटच्या वाळूंत पडावें नि आकाशांतील तारका न्याहळाव्या हा माझा एक आवडता छन्द होता त्यावेळीं.

नदीच्या शांत प्रवाहाचे सौंदर्यहि या रत्नखचित आकाशानें फारच खुलून दिसतें. कारण हें सर्व आकाश त्यांत प्रतिबिंबित झालेलें असतें. पाण्याच्या प्रवाहांत उभे राहिलों कीं वाटतें आपण यक्ष नगरींतील एखाद्या क्रीडासरोवरांत उभे आहों. याच्या तळाला इंद्रनीलाचे पुट चढविलेलें आहे नि त्यावर अनेक रत्नें बसविलेलीं आहेत. चांदण्या रात्रीं अशा प्रवाहांत स्नान करीत आहों कीं चांदण्याच्या रसांत तेंच कळेनासें होतें.

एका पावसाळयाच्या रात्रीं मी असाच नदीकांठीं गेलों होतों. चार सहा दिवस भरपूर पाऊस पडून आभाळ निवळलें होतें. पश्चिमेच्या क्षितिजावर कामिनीकपोलाप्रमाणें गौरवर्ण चंद्र प्रकाशत होता. थोडेसे ढग इतस्ततः विखुरलेले होते. नदी दुथडी भरून वहात होती. तिच्या ताम्बुस पिवळसर अशा पाण्याच्या प्रवाहाला सुवर्णरसाची कांति आलेली होती, नि त्यावर

चंद्राच्या प्रतिबिंबांचा एक पट्टा या कडेपासून त्याकडेपर्यंत नदीच्या मेखले-प्रमाणें उठून दिसत होता. हें सुंदर दृश्य आजहि माझ्या डोळयापुढें आहे. चंद्र प्रकाशाची जादू मला त्या दिवशीं खरी जाणवली. प्रणयिनीच्या भाव-नांची उन्मादकता होती त्यांत, आणि भोंवतालचा नवप्रदेश या चांदण्यानें अस्पष्ट पण अधिक आकर्षक वाटत होता. एखाद्या झिरझिरीत आवरणांत सुंदर चित्र ठेवलें असतां वाटावें तसा. चांदण्याचें सौंदर्य तरी काय एक प्रकारचें थोडेंच असतें ?

हिवाळयांतील चांदणें व पावसाळयांतील ओल्या ढगांतून झिरपणारे चांदणें, अभिसारिकेच्या उत्कट प्रणयाप्रमाणें ओसंडून वाहणारें पूर्ण चंद्राचें चांदणें, व नवोढेच्या लाजाळू भावनांप्रमाणें बुजणारें बिचकणारें चतुर्थीचें चांदणें. किती तऱ्हा आहेत चांदण्याच्या नि त्याच्या सौंदर्याच्या ! चांदण्याचें हें अनेकविध सौंदर्य तर कवींनीं किती तरी वर्णिलें आहे. पण रात्रीच्या अंधारां-तहि कांहीं कमी सौंदर्य असतें असें नव्हें.

अंधाऱ्या रात्रांतील विविध सौंदर्य देखील मनोहर असतें. पण सामा-न्यतः आपण त्याकडे दुर्लक्ष करतों आमची सौंदर्यदृष्टि देखील बऱ्याच अंशी पारंपारिक कल्पनांचीच चौकट वापरीत असते. स्त्रीसौंदर्यांतहि वधाना गौरवर्ण आम्ही आवश्यक व गृहीत धरूनच चालतों. पण एखाद्या बाणभ-ट्टाला मात्र काळया रंगांतहि सौंदर्य आढळूं शकते. अंधाराचेंहि तसेंच आहे. पण अंधाराला दुष्टतेचें, मलिनतेचें, पापाचें प्रतिक मानतों पण वस्तुतः यांत पारंपारिकताच अधिक आहे. मला तर वाटते कीं, अंधाराइतकें निर्मळ, निर्लेप, अव्याज व सुंदर असें कांहीं असूं शकणार नाहीं. याला कृत्रिमतेचा कलंक नाहीं. अन्धार म्हणजे प्रकृतीचें मूळरूप. विश्वाच्या आरंभी जेव्हां प्रकाश नव्हता तेव्हांपासून अन्धार आहे नि प्रकाशानंतरहि तो राहील. प्रकाशाला आपण सर्व व्यापक म्हणतों पण खरें पाहिलें असतां अंधारच सर्व व्यापक होय. अंधार हा कालासारखा आहे. अनादि, अनंत व निर्लेप. कालाची अथांगता व भव्यता अंधाराच्या कृष्णतेंतहि दडलेली आहे नि म्हणून त्याच्या सौंदर्यांतहि गूढरम्यता आहे. उदार मेघांची कृष्णता व सांवळया नन्दकुमा-राची कृष्णछटा यांचें मांगल्य अंधाराच्या पाठीशीं आहे.

अंधारांत देखील किती तरी विविधता असते. कधीं तो महाराष्ट्रीय सांवळया ग्रामीण रमणी प्रमाणें उजळ असतो तर कधीं आंध्र रमणीच्या कृष्णवर्णाप्रमाणें स्निग्ध असतो. कधीं त्यांत इन्द्रनीलमण्याची निळसर झांक असते तर कधीं तपस्व्याच्या जटेंतील रूक्ष पिंगट वर्णाची आणि कधीं त्यांत कामिनीच्या घन केशकलापांतील कृष्ण सांद्रता भरलेली असते. रात्रौ भटक-तांना अंधाराचीं हीं भिन्न भिन्न रूपें मला नेहमीच लोभनीय वाटत आलीं आहेत. रात्रीच्या या विविध सौन्दर्याचें वर्णन कुठवर करणार! त्याचा अनु-भवच घेतला पाहिजे. मला स्वतःला रात्रीचें कोणतेंहि रूप रम्यच वाटतें. चंद्रानें उधळलेला मोतीचूर अंगावर घेतांना असो कीं, कस्तुरींतून विहरतांना असो, मी सारखाच तन्मय होतों. गांवाबाहेर कुठेंतरी रात्री भटकत जावें नि मग आकाशाकडे बघत बसावें हा तर माझा नेहमीचा खेळ आहे. मृगशीर्ष नक्षत्रांतील मृगा मागें लागलेल्या लुब्धकाचें लकाकणारें तेज, गुरूच्या पिवळ सर तेजांतील मार्दव, आकाश गंगेचा तेजोमय खळाळ, मंगळाच्या लाल डोळयांतील धुन्दी, सप्तर्षींचें तपोतेज आणि शुक्राच्या नीलवर्ण प्रकाशांतील अल्हाददायकता या सर्वांचा अनुभव मात्र माझ्या या संवयी मुळेंच मनसोक्त घेतां आला आहे.

रात्रीचें वातावरण, रात्रीचा निसर्ग, त्या प्रमाणेंच रात्रीचें जगहि निराळें असतें, गजबजलेल्या नगरांतील कोलाहल रात्रीं शांत झालेला असतो. रस्त्यानें भटकतांना कसं अगदीं मोकळं मोकळं वाटतं. विशाल सडकेच्या मधून चालावें अंगावर एखादें वाहन येण्याची भीति नसतें, दिवसामात्र साऱ्या नियमांची बंधनें पाळावी लागतात. इकडून चला, तिकडून चला जरा चूक झाली कीं जिवावर बेतण्याचा संभव. रात्रीं वाटतें, कीं ही सडक, हा रस्ता आपला आहे. कुणीकडूनहि कसेंहि चालावें, कुठेंहि उभें रहावें, पोलिसाची शिटी वाजणार नाहीं की कुणी धक्का देणार नाहीं. हा अनुभव मोठा सुखद असतो. शिवाय दिवसा सहसा नजरेस न पडणारी गुपितेंहि या अंधारांतील उजेडांत उघड होतात.

कित्येक अनिकेतांनीं अवकाशाचा अडोसा करून पथाऱ्या पसरल्याचें दिसेल, तर एखाद्या दुकानाच्या लहानशा फटींतून कांहीं आंकडेबाज ये जा

करतांना दिसून येतील. दिवसाच्या वेळीं या सर्व घटनांवर शिष्टाचार, सभ्यतेचें दडपण असतें तें रात्रीं उरत नाहीं. यांपैकीं अनेकांनीं दिवसा सभ्यतेचें सोंग आणलेलें असतें. दिवसांच्या प्रकाशांत तें खपून जातें पण रात्रीच्या अंधारांत मात्र पितळ उघडें पडतें. मानवी जीवनाचें हें वास्तवदर्शन अंधारांतच शक्य असतें. ज्यांना हें सत्य मानवत नाहीं, सहन होत नाहीं ते अंधाराला दोष देतील. पण त्यांचा काय दोष? तो जें आहे तें दाखवितो, दडवीत नाहीं. त्याला आंत एक बाहेर एक माहित नाहीं. तो निष्कपट आहे, सरळ आहे. दिवसा दिसणारें जग यथार्थ म्हणजे सम्पूर्ण सत्य नव्हें .रात्रीं दिसणारें जग बघूनच त्याची कल्पना येणें शक्य आहे, हें मला माझ्या भटकेगिरीनें अनेकदां शिकविलें आहे. भोंवतालच्या जगाचेंच केवळ नव्हें तर माझ्या मनाचें वास्तवदर्शनहि मला माझ्या या' निशाचरणांतच अनेकदां झालेलें आहे. यामुळेंहि रात्रीं भटकण्याची मला पुन्हां पुन्हां उत्कट इच्छा होत असतें.

विशेषतः हैद्राबादी असतांना, एखाद्या चित्रपटग्रहांतील दुसरा खेळ बघितल्यानंतर, तेथील सडकांवरून भटकतांना, मला हें अल्प दर्शन अनेकदां झालेलें आहे. त्यावेळीं मध्यरात्र उलटून गेलेली असतें. सडकेवर एकादेंच हॉटेल उघडें असतें. चित्रपट संपल्यानंतरची गर्दी ओसंडेपर्यंत मी प्रथम या एखाद्या हॉटेल मध्यें जातों. इथेंहि चार सहाच माणसें असतात नि म्हणून इथें थांबणें सुखावह असतें. रस्त्यावरील हॉटेल मधील सर्व रेडिओ बन्द असतात. हॉटेल मधील नौकरहि 'दो आदमी छे आना' अशा कर्कश आरोळ्या मारीत असतात. झोपेनें यांची प्रत्येक हालचाल मंदगति (Slow Motion) चित्रपटांतील हालचालीप्रमाणें संथ होत असतें. त्या वेळचाच चहा खरें सुख देतो. चहाचा एक एक घोंट समोरच्या आरशांतील आपल्या प्रतिबिंबाच्या सोबतीनें घेत असतांना चहाची खरी लज्जत कळतें. चहा संपवून व कांऊंटरवर झोपेनें पेंगू लागलेल्या माणसापुढें पैसे सारून मी नंतर रिकाम्या सडकेवरून चालू लागतों. कुठें जायचं तें माझं मलाच माहित नसतं माझ्या पावलांचा आवाज माझ्या संथ गतीला ताल धरूं लागतो, मागें टाकलेल्या वीज दिव्यांच्या प्रकाशानें पुढें एक सांवली पडलेली असतें, व

पुढें आलेल्या खाम्बावरील वीज दिव्यानें मागें एक सांवली पडलेली असतें, माझी दोन भिन्न व्यक्तित्वेंच जणूं या छाया रूपानें साकार होतात. एक दिवसाचें, दुसरे रात्रीचें. एक नेहमींच्या व्यवहारानें बद्ध दुसरें त्यांतून मुक्त होऊं इच्छिणारे. एक दैनंदिन जीवनांत रमणारें व दुसरें त्यांतून बाहेर पडूं इच्छिणारें. आणि कसल्या तरी निराळ्या, उच्चतर जीवनाची हाव बाळगणारें विस्मइतपणें या दोन सांवल्याकडे, माझ्या दोन व्यक्तित्वाकडे मग मी बघूं लागतों. एखाद्याच उघड्या खिडकींतून येणारा प्रकाशझोत माझ्यावर सुप्त जगाचें रेशमी पाश टाकीत असतो, तर मधूनच एखाद्या बंगल्यांतून येणारी रातराणी किंवा आकाशमोगरीची गन्धलहर जिवाला एका निराळ्या जगांत घेऊन जात असतें. मी पुन्हां पुढें चालूं लागतों. माझें मन विचार करूं लागतें. वाटेंत कुणी भेटत नाहीं. भेटलें तरी ओळखीचें असत नाहीं व असलें तरी ओळखूं शकत नाहीं. बस् मी एकटा असतों. खरा एकांत लाभतो. आशा वेळीं दिवसाचा एकांत अपूर्ण असतो. भोंवतालचें सारें वातावरण त्या वेळीं इतर गोष्टींचा विचार करायला भाग पाडीत असतें. रात्रीं या वाटा बंद होतात नि मग मी माझा विचार करूं लागतों. मी अंतर्मुख होतों, माझ्याशीं बोलूं लागतों. अशा वेळीं वाटूं लागतं, आपलं जीवन आपणांस गुदमरवून टाकीत आहे. त्यांत कांहीं दम नाहीं, नाविन्य नाहीं. जें काल तेंच आज नि तेंच उद्याहि कदाचित्. तीच घराच्या चौकटींतील वैयक्तिक सुखदुःखें नि त्याच रडकथा. सारी कंटाळवाणी पुनरावृत्ति. त्यांत कुठें बदल नाहीं; पराक्रम नाहीं. या जीवनाची कोंडी फोडली पाहिजे. अशा रीतीनें अनेक दिवसांची सुप्त महत्वाकांक्षा जागी होते नि मन तिनें भरून जातें. मग एक प्रकारची हुरहूर, खिन्नता, उदासीनता जाणवूं लागतें, बालकवीनें म्हटलंय तशी.

"कोठुनि येतें मला कळेना उदासीनता ही हृदयाला"
"काय बोचतें ते समजेना हृदयाच्या अंतरहृदया"

असें कांहीं तरी वाटूं लागतें. एक तऱ्हेचें असमाधान, उबग जाणवूं लागतें. मला वाटतें ही उबग, हें असमाधान, ही उदासीनता तर फार प्रभावी स्वरूप धारण करूं शकतें. जीवनाची घडी विस्कटूं शकते, नवीन घडी बसवूं

शकते. तुकारामाच्या मनांतील असल्याच्च समाधानांतून त्याचे वैराग्य निपजलें असणें संम्भवनीय आहे. तसेंच सानेगुरुजी जीवनांतून उठलें त्याचें मूळहि या प्रकारच्या उदासीनतेंत, जें आहे त्या विषयींच्या असंतुष्टतेंतून असणें असंभवनीय नाहीं. वैराग्य नि निराशा याप्रमाणेंच्च अनेकांच्या जीवनांत या प्राप्त परिस्थितीच्या असमाधानानेंच महान् सामर्थ्य ओतलें आहे हेंहि खरें. माझ्या जीवनावर मात्र तसा प्रभाव पडलेला नाहीं. पडेलच असेंहि मात्र निश्चित सांगतां येणार नाहीं, नि पडलाच्च तर तो कसा पडेल हेंहि सांगणें अशक्य आहे. आज मला एवढेंच कळतें कीं, हा अनुभवहि सुखद असतो. माझ्या मनांच्या अज्ञात कप्याचें मला दर्शन घडतें. दैनंदिन व्यवहारांत वावरत असतां कांहीं काळ तरी त्यापासून अलिप्तता अनुभवाला येते. एका निराळ्या (अर्थानें) उच्च वातावरणांत गेल्यासारखं वाटतं नि याच अर्थानें मी म्हणतों कीं, एका अर्थानें हें योगसाधनच होय. माझ्या विचारांच्या व नव्या अनुभवाच्या तंद्रींत, मी भटकत भटकत कुठें तरी जाऊन पोंचतों. मग रात्र सरल्याच्या खुणा हळूंहळूं दिसूं लागतात. पूर्वीचें क्षितिज धवळूं लागतें अंधार असेल तर विरल होऊं लागतो, चांदणें असेल तर फिकटूं लागतें पण मला मात्र वाटतच असतें रात्र संपू नये. ती विचारतन्द्री तशीच टिकावी आणि म्हणूनच मी परत फिरतों. हे निशे! माझ्या सखे! तुझे हात माझ्या गळ्यांतून काढ आतां. ते पहा क्षितिजाच्या पलिकडे दिवसाचे दूत उभे आहेत.

# स्वामिकार्याचें बक्षीस

[ शिवाजीचा सुप्रसिद्ध सरदार येसाजी कंक व त्याचा पुत्र यांस लढाईत जखमा लागल्या, सबब संभाजी महाराजांनीं त्यांस बक्षीस दोन हजार होन (एक होन = ३॥ रुपये ) दिले. त्याचें हें नेमणुकीचें पत्र सहीशिक्यानिशीं लिहून दिलेलें स्मरणीय आहे. संभाजीचा शिक्का आरंभीं व शेवटीं लेखनालंकार हीं त्याचीं स्वतःचीं अक्षरें होत. त्या कालीं हल्लीप्रमाणें सही करीत नसत. शेवटचें मोर्तब त्याचेंच. दतरीं पत्र दाखल झाल्याचा उल्लेख शेवटीं आहे. नीलकंठ मोरेश्वर पिंगळे संभाजीचा प्रधान होता त्याचाही शिक्का पत्रावर आहे. ]

श्री

श्रीशंभोःशिवजातस्य मुद्रा द्यौरिव राजते ॥
यदंकसेविनो लेखा वर्तते कस्य नोपरि

पत्र नियत पारतोषिक मा॥ येसाजी कंक सरनोबत व कृष्णाजी येसाजी कंक पदातिनायक शक १२ क्रोधन नाम संवत्सरे आषाढ शुद्ध द्वितिया भोमवासर सु॥ सीत समानीन अलफ. मा॥ निलेनी व कृष्णाजी कंक मा॥ निलेचे पुत्र या दोघानी फोंडाचे स्वारीस फिरंगी यांनी गाटी पाडिली तेव्हां बहुत कस्त केली आणि गनीम मारून काढिला. ते वख्तीं दोघालाही जखमा लागोन चकाचूर जाले. कठिण जखमा राजश्री स्वामीनी दृष्टीने पाहिल्या, आणि घरासी जावया आज्ञा दिल्ही. त्यावरी कृष्णाजी कंक याच्या जखमा फुटोन घरी मयत जाला. हालीं येसाजी कंक हे हुजूर येऊन आपले वर्तमान विदित केले, त्यावरून स्वामी कृपाळु होऊन हे कामाचे मर्दाने स्वामिकार्यावरी तत्पर आणि यांचा पुत्रही स्वामिकार्यावरी मयत जाला. फोंडाचे बकसीस द्यावयाचे होते म्हणौन छ मजकुरी पारितोषिकाची मोईन केली होन पादशाही बेरीज २००० दोनी सहस्र होन रास, पा॥

खासा येसाजी कंक सरनोबत होन १०००

कृष्णाजी कंक मा। निलेचे पुत्र
स्वकार्यावरी पडिले ह्मणोन
दिल्हे होन पा। १०००

येणेप्रमाणे एक साला ये वर्षी पारितोसिक द्यावयाचा नियत केला असे. लेखनालंकार.

श्री शंभु नरपति हर्षनिदान मोरेश्वरसुत नीळकंठ मुख्य प्रधान

मर्या
देयं विज
यते

तेरीख ३० रजब
सुा सीत
बार

सुरू सुद बार

# १३ व्या १४ व्या शतकांतील महाराष्ट्र

## डॉ. ना. गो. नांदापूरकर

यारे जीवींच्या जिवलगांनो, महाराष्ट्राच्या मुलांनो मराठीच्या लालांनो मी आज तुम्हांला ज्ञानेश्वरानंतरच्या महाराष्ट्राची कहाणी सांगतें. ऐका.

यादवांचें राज्य गेलें. शांतीचें आसन डळमळलें. महाराष्ट्राचें अन्तःकरण तळमळलें. वरून आभाळ आलें. सोसाट्याचे वारे सुटले. झाडांचे मूळ उपटलें प्रासादाचे तोल सुटले. गारांचा सडा पडला, महाराष्ट्राला तडा पडला, कधीं न घडायचा चमत्कार घडला. धैर्याचें बांध फुटले. प्रेमाचे दोर तुटले. शौर्याचे बुरुज ढासळले. गडचे गड गडबडले. नगरांनीं लोळण फुगडी घेतली. गावा-गांवाचें गोत्र तुटलें. भावाचें भावाशीं मन विटलें. वैराचें रोप उठलें. वाऱ्याचा वेग वाढत चालला. दैवाला भर चढत चालला. देश उध्वस्त झाला. जनलोक त्रस्त झाला. महाराष्ट्राला नष्टचर्य आलें. सुखाचें स्वप्न झालें. होत्याचें नव्हतें झालें. रावाचे रंक झाले. फुलावर पहुडणारे चिखलांत लोळूं लागले. एके काळचे जेते आतां हरता डाव खेळूं लागले. शत्रूला खडे चारणारे आतां स्वतःच खडे खाऊं लागले.

लाकांचें स्वातंत्र्यप्रेम टायींच निरवलें अन् पारतंत्र्यांतील दुर्गुण मात्र तरारून उठले. ब्राह्मणांनीं अध्ययन–अध्यापनादि षड्कर्में सोडलीं, सेवावृत्ति जोडली. क्षत्रियांचें तेज लोपलें. त्यांनीं शासकांपुढें हात जोडले. भल्यांचीही क्षात्रवृत्ति मालवली. त्यानीं सेवावृत्ति पत्करिली. कित्येकांनीं वैश्यवृत्ति स्वीका-रली. क्षत्रियत्वाचें वारें गेलें. पैक्याचे ऐकूं लागले. दास्याला सोकूं लागले. वृत्ति पालटली. मन पांगळलें. बुद्धि चारगळली. कर्तृत्व ठेंचाळलें. दृष्टीला भुरळ पडली. ती आपल्या कर्तव्यांत आडली. दुसऱ्याच्या पायावर जडली. स्वार्था-पलीकडे दिसेनासें झालें. आपल्यांचा अभिमान गेला. दुसऱ्यांचा अपमान वाटेनासा झाला. धनीपण विसरले. ... घसरले. पाहायचं पाहिलं नाहीं. करायचं केलं नाही. भलतंच ... ... ंच झालं. पाहिलं त्यांनीं सांगि-

तलं नाहीं. सांगितलं त्यांनीं केलं नाहीं. केलं त्यांचं वठलं नाहीं. ज्यांनीं नीट-पणें पाहिलं त्यांनीं धीटपणें सांगितलं नाहीं. सांगितलं त्याचं कोणी ऐकलं नाहीं ऐकलं त्यांनीं केलं नाहीं. पाहणाराला तोंड नव्हते. बोलणाराला हात नव्हते. हात असणारांचे पाय जड होते.

क्षात्रवृत्तीचें दिवाळें निघालें, ब्रह्मविद्येनें आपलें आसन गुंडाळलें. ब्राह्मणक्षत्रिय दास झाले. लोक उदास झाले. चारीवर्ण एक झाले. सर्वच सेवक झाले. सर्वांनीं आचार विचार सोडला, अविचार जोडला. घरचा गाडा मोडला अन् दुसऱ्याचा जोडा डोईवर धरला. सर्व समाज परधार्जिणा बनला. आशा आकांक्षा धरली नाहीं. नेटानें रेटारेटी केली नाहीं. डोकें धड तर पगडया रगड, असा विचार केला. पगडीपायीं डोकें गमावून बसला. रगडून खावं बिघडून रहावं हे त्याला साधलं नाहीं. स्वतःचं रांधण रांधलं नाहीं. पोटाला देईल तो धनी मानला. उष्टावळीला भाव चढला. स्वतःचा अभिमान गेला. सेवेमध्यें मान वाटला. कोण होतो कोण झालों? चालणारेहि रांगूं लागले, आधाराला दुसऱ्याकडे बघूं लागले. फुलाच्या पायघडयांवरून ध्येयाचें मनोराज्य करूं लागले.

धर्माला अवकळा आली. सदाचार लोपला. अनाचार वाढला. ढोंगधतुरा माजला. लोकांना वर्णधर्म सोडला आश्रमधर्म सोडला. 'स्वधर्मे निधनं श्रेयः' ही गीतेची शिकवण मानली नाही. त्यांना परधर्म भयावह वाटला नाहीं. अशी धार्मिक आचारविचारांत चलबिचल झाली. स्वधर्मावरील श्रद्धा उडाली. धर्माचा अभिमान गेला. कुळाचा अभिमान गेला. वेदविद्येचा कंटाळा केला. उज्ज्वलतेचा विसर पडला.

धार्मिक आणि सामाजिक आंदोलन झालें. त्याचे भाषेवरहि परिणाम झाले. यादवांचे कर्णाधिप 'हेमाडपंत' यांनीं मोडी लिपि काढली. ती नित्याच्या लेखनाला सुगम केली. अक्षरांची धाटणी किंचित वेगळी केली. ही लिहिण्याला फार सोपी झाली. व्यवहाराच्या उपयोगी आली. तिचा प्रचार वाढला. असा लिपीनें नवा पायंडा पाडला. मोडीची घडण पाहिली, देवनागरीनेंहि आपली रूढी सोडली. अक्षरवाटिकांना आतां निराळा आकार मिळूं लागला. तीन शून्यांची 'ई' गेली. आतां डोक्यावर नागफणा धारण करणारी 'ई' आली.

△ त्रिकोणी ' ए ' दडला, कानाकोपऱ्यांत पडला. तीन उभ्या रेघांचा ' ण ' अगदीं दिसेनासा झाला आणि पृष्ठमात्रा अक्षरांच्या डोक्यावर बसल्या. अशी लिपींत क्रांति आधीपासूनच होऊं लागली.

लिपींत पालट झाला; पण भाषेचा ओघ अखंड चालत राहिला. मात्र तिलाहि या काळाचे धक्के बसले. ते तिनें हंसून सोसले. तिला कधीं वळण घ्यावें लागलें. कधीं दगडांतून आपला मार्ग काढावा लागला. कधीं तिजवर शेवाळ चढलें. कधीं डगरी उलथून तिचें पाणी गढूळ झालें. कधीं सूर्यतापानें तापून पाणी उणें झालें आणि भोंवतालच्या खरखीत वाळवंटानें पात्र निरुंद झालें. पण पाणी वाहात राहिलें. महाराष्ट्रीय लोक तें पीत राहिले. तिच्यांतून कांहीं शब्द गेले, कांहीं रूपें लोपलीं, कांहीं वाक्प्रचार मागासले. या सर्वांच्या ठायीं निराळेंच आलें ' राजसत्ते ' चें ' सरकार ' झालें, ' राजसभे ' चा ' दर-बार ' झाला. ' न्यायधीशा ' चें आसन ' काजी ' नें बळकावलें; ' अग्रवादी ' ' पश्चिमवादी ' पळून गेले. ' पत्रा ' पालट ' कागद ' आला. ' अधिकारी ' चा अधिकार गेला. ' वार्षिक देवा ' ला ' सालीना मुशाहिरा ' मिळाला; असा ' क्रम ' जाऊन ' सिलसिला ' पडला. ' बाळापूर प्रगणा ' जाऊन ' प्रगणें बाळापूर. ' (' परगना-इ-बाळापूर. ') लिहिण्याची पद्धत निघाली. लोक दिग्विजयी निघाले. पित्याचें नांव बुडविलें, ' कामभट पिता दामभट ' जाऊन ' कामभट बिन दामभट ' आले. राईक, पाईक, मांडलिक, मावळले; अन् नव्या काळाचे ' जमादार, हवालदार, सरदार ' उदयाला आले. ' राव ऐसे बोलतीजे...जाऊन ' राव ऐसे बोलती कीं...' अशी पद्धत पडली. त्याच ' प्रती ' ची सर्वेपा नक्कल झाली. अशी आरंभाची ' सुरवात ' झाली.

जी गति यादवा तीच गति माधवा. राजव्यवहाराप्रमाणेंच नित्याच्या व्यवहारांतही पालट ' वर्षा ' चें रूपांतर ' सालां ' त झालें; ' दिवसा ' चें वेषांतर ' रोजां ' त झालें. ' मिति ' ची ' तारीख ' झाली. अशी ' प्रत्येक वस्तू ' ला ' हरजिन्नस ' मिळूं लागली. भाषेप्रमाणें वेष-भूषाही पालटली. अन् लोक ' नागराचे ' ' शहरी ' बनले. पुरुषांनीं असे ढंग केले, रंग पालटले

पण स्त्रियांनीं मात्र आपली पूर्व परंपरा राखली. त्यांनी आपली भाषा आणि भूषा पहिलीच ठेवली.

या काळच्या विद्वानांनीं अन् साधुसंतांनीं मात्र बहुमोल काम केलें. धार्मिकतेचा पाया भरला. आचारांचें खांब केले. विचाराच्या तुळया केल्या. वाङ्मयाच्या भिंती उभारल्या. समाजाचा डुलता कळस सावरून धरला. धर्माचें रक्षण केलें, संवर्धन केलें अन् समाजांत जीव ओतला.

जा आतां निजा बरें बाळांनो, मी उद्यां तुम्हांला पुढली कहाणी सांगेन.

# वहाणा

## कुसुमावती देशपांडे

दादाजी चांभार रहात होता तें गांव होतें वऱ्हाडच्या एका कोपऱ्यांत पण तिथेंदेखील 'अखिल भारतीय चहावर्धन मंडळा'च्या जाहिरातखात्याचे हात पोचल्याला दीड-दोन-वर्षे होऊन गेलीं होतीं. दादाजीच्या दारावर एका घड्याळाचा छाप उमटला गेला होता. व त्यांत नित्य सात वाजलेले असायचे नझारतीच्या पहाऱ्याचे तहसीलींतलें साताचे ठोके पडले कीं त्या मंडळाचा माणूस आपली चकचकीत, बंद झाकणाची चहाची भट्टी व रंगीत टिनच्या बिनबशांच्या कपांची टोपली घेऊन दादाजीच्या दाराशीं हजर व्हायचा बिनपैशांनीं मिळणारें तें गरम पेय किती मिष्ठास लागायचें. व त्या चहावाल्याची वाणी तर त्याहून मिष्ठास ! तो किती गांवें हिंडून आलेला होता. किती शहरें त्यानें पालथीं घातलीं होतीं. व त्याचा आव तर असा होता कीं त्या चहाच्या लक्षाधीश मालकांचा जणू तो उजवा हातच. मग त्याला इतकी माहिती अन् अशी वाणी असली तर नवल काय ? उमगांवच्या बायाबाप्यांना सकाळच्या प्रहरीं इतक्या चैतन्यमय पेयाचे पेले पाजणारी त्याची मूर्ति म्हणजे एखाद्या देवदूतासारखी वाटूं लागली होती. धन्य त्याची व दूरदेशाच्या गरिबांचा कळवळा बाळगून त्यांच्या सुखसोयींची काळजी वहाणाऱ्या त्याच्या नवकोट नारायण मालकांची ! तो चहावाला नाहीं का सांगायचा हें अमृतासारखें पेय की जें थंडींत गरम व गरमींत थंड असतें, असें हातीं लागल्यावर त्याच्या मालकांना असें झालें होतें कीं अलम दुनियेंत त्या कष्टकऱ्यांना हें केव्हां पाजूं! व म्हणूनच तर त्यांनीं एवढी कचेरी स्थापून, हजारों माणसें जमवून, त्यांना हिंदुस्थानच्या कोनाकोपऱ्यांत ते पिवळ्या लेबलाचे पुडे घेऊन पाठविलें होतें. इतकेंच नव्हे, दीनवत्सल लक्ष्मीपति गरिबांना सहासहा महिने फुकटहि तें पेय पुरवीत होते. उमगांवचा त्यांचा जासूद किती रसाळपणें हें सर्व सांगायचा! त्याचा वर्षाच्या कार्यानंतर पहिल्या चार महिन्यांतच किराणेवाल्या शेटजीच्या दुकानांतल्या पिवळ्या लेबलाच्या पावडरीच्या पुड्यांचा खप दुप्पट

झाला होता. व दादाजीच्या घरीं तर दादाजीपासून त्याच्या पांच वर्षांच्या नातीपर्यंत सर्वांना न्याहारीच्या आधीं चहाचा कप लागूं लागला होता.

तेवढा गरम कप मिळाला व चिलमीचे दोन आकंठ झुरके मारले कीं मग मात्र दादाजी एक क्षणहि वांया घालवीत नसे. हिंवाळा असो, उन्हाळा असो, तो चट्दिशीं उठायचा व आपली कातड्याच्या तुकड्यांची पोतडी, सारीं अवजारें व पाण्याचें डबरें घेऊन कामाला सुरुवात करायचा. ऋतुमानाप्रमाणें फार झालें तर त्याच्या बसायच्या जागेंत बदल होई, एवढेंच. बाजारआळींतल्या आपल्या दुकानावर सकाळपासून जाऊन बसणें त्यानें अलीकडे सोडून दिलें होतें. त्या दुकानाच्या तिन्ही भिंती खिळ्यांवर अडकवलेल्या वहाणांच्या एकजात उत्तम जोडांनीं भरगच्च भरलेल्या असत. मध्यभागीं जमिनीवर तीन चार ठिये अलगसलग मारलेले असावयाचे व त्याच्या देखरेखीखालीं काम करणाऱ्या त्याच्या मुलाला व एकाददुसऱ्या नवाशिक्या चांभाराच्या पोराला बसायला जेमतेम जागा पुरे. पण त्या एकखणी जागेंतच दादाजीच्या कसबानें वैभवाचे पाट वाहवले होते. साऱ्या उमगांवांत त्याच्यासारखा वहाणा बनवण्यांत तरबेज कोणी नव्हता, प्रत्येक गवळ्या–गुराख्याला वाटे, थोडी घासाघीस करून जर आपल्याला परवडेल एवढ्या किंमतींत दादाजीच्या हातचा जोड मिळाला तर कितीहि रानें पालथीं घालावीं लागलीं तरी दीडदोन वर्षें आपल्याला पायताणांची फिकीर करायला नको. उमगांवच्या जवळपासचे पाटील लोक त्याच्याच हातच्या वहाणा वापरीत व त्यांच्या मजबुतीची खात्री पटेल असा 'कर्रकर्रर' आवाज करीत गांवांत हिंडत. आपल्या एकखणी दुकानाच्या जोरावरच तर दादाजीनें तो गांवच्या शिवेवरचा लहानसा मळा घेतला होता. व त्यांतलें चारखणीं घर, भाजीपाल्याची लागवड, भरलेला गोठा, हेंहि त्यांतून उत्पन्नच झालें होतें. मग त्या एकखणी दुकानाची मातब्बरी दादाजीला अजूनहि वाटणारच. पण दादाजी समाधानी, विचारी, कांहींसा विरक्तच. वानप्रस्थाश्रमाच्या संस्थेची, आजाणतेपणीं का होईना, पण बूज राखणारा हजारांतला एक म्हातारा. अलीकडे त्यानें आपला तो वैभवाचा झरा पूर्णपणें आपल्या सोमाच्या सुप्रत करून दिला होता, व तो स्वतः सकाळच्या प्रहरीं सोयीची वाटेल अशा जागीं एकादा वहाणांचा जोड तयार करीत

व एकीकडे गाई–गोऱ्ह्याची, भाजीच्या वाफ्यांतल्या पाण्याच्या पाटाची चौकशी करीत बसे. हिंवाळ्याच्या दिवसांत सकाळच्या सोनेरी उन्हाचा पुरेपूर फायदा घ्यायचा, ही त्याची नित्याची पद्धत. चहाच्या गरम पाण्यावर चिलमीचा झुरका मारला कीं साठीजवळ आलेला तो म्हातारा घरच्या भिंतीलगतच्या उन्हांत आपले ठाण मांडून देई, तो सोमा मधल्या जेवणासाठीं दुकानावरून परत आला म्हणजेच उठे. त्याचे हात इतके सरावले होते कीं त्यांना आतां त्याच्या डोळ्यांच्या साथीचीहि फारशी गरज राहिली नव्हती. त्याचे डोळे कित्येकदां समोर बागडणाऱ्या आपल्या नातीच्या खेळाचें दृष्टिसुख अनुभवण्यांत गर्क होत. त्याच्या कामाच्या पसाऱ्याभोंवतींच सोनी आपल्या भातुकलीचा पसारा मांडी. भुलाईला दागिनें चढवी, कडब्याच्या धाटयाचे कुणाजवळून तरी तयार करून घेतलेले गाडे फिरवी, बंदुका उडवी.

त्या दिवशीं, कां कोण जाणे, तिला आपला आजाचा पेशाच पुढें चालवायची लहर आली. ती कुठूनशी धांवत दादाजी जवळ आली व म्हणाली, ‘दादा वो–मी बि बनवीन वायणा मल्ये दाव ना....’ त्याच्या पोतड्यांत ती मनाजोगा चामड्याचा तुकडा शोधूं लागली.

“ कां वो बय–आज अशी काऊन सय आली....”

“आली अशीच...”

“तुह्या भुलाईचं लगीन सरलं...” दादाजी तिच्याकडे डोळे भरून पहात म्हणाला. तेवढ्यांतच त्याच्या मनांत विचार चमकून गेला, ‘हिच्या पाठीवर आतां सोमाला मुलगा होईल. त्याला तर शिकवीन ना मी... हो तर...केवढ्या अभिमानानें... पण ही पोरीची जात. चांभाराची नात असली तरी काय झालं....तिला नाहीं हातीं टोंच्या घ्यायची वेळ येऊं देणार.... आतां दोन तीन सालांत असं धडाक्यानी लगीन लावून देईन हिचं.’ व त्याच विचाराला व्यक्त रूप देऊन त्यानें म्हटलें,

“आतां आपण तुझंच लगीन लावून देऊं हं सोने....’

“हो दादा”

"हो धडाक्यानं...."

"अन् मंग मल्ये हिवऱ्या चुडया भरशील...."

"हं-हं...."

सोनी आपले गोंडस हात पुढें करीत म्हणाली.

"हो तर-अन् सोन्याच्या पाटल्या....मुंडावळी....अन् पिवळी साडी..."

"अन् बारूद उडवायची दादा....लई धमाक्यानं...."

त्या बिचाऱ्या नवऱ्याचा पत्ताच नव्हता! पण लग्नांतल्या थाटावरचें आजोबा-नातीचें संभाषण रंगत चाललें. सोनी आपल्या चिमकुल्या अनुभवांतल्या लग्नांच्या-गांवांतल्या मुलींच्या बाहुल्यांच्या लग्नांच्या-आठवणी रंगवून नाचून, हावभाव करून दादाजीला सांगूं लागली व दादाजी तिला म्हणे,

"तुहं लगीन तर याहून थाटदार करीन, माझे बये....."

त्याच सुमारास उमगांवांत आणखी एक नवीन व्यक्ति उगवली. चहावाल्यांच्या जामूदाचे व या व्यक्तीचे काय लागेबांधे होते कोण जाणे, पण त्या दोघांच्या बोलण्याचालण्यांत खूप साम्य वाटे खरें. जसे कांहीं ते एका जातीचे, एका संस्कृतीचे, एका सांच्यातले. नाहींतरी साऱ्या टांगेवाल्यांचा एक छाप, साऱ्या तिकिट क्लेक्टरांचा, साऱ्या हमालांचा, साऱ्या मास्तरांचा देखील. अलीकडेच वाढलेल्या रिक्षावाल्यांच्या धंद्यांत शिरणारी माणसें देखील सारीं जणूं एका सांच्यांत ठोकून तयार होतात. मग कारखान्याच्या सुरुवातीपासून उत्पन्न झालेल्या कारखानदारांच्या एजंटांच्या जातीचा एक विशिष्ट छाप असणारच. 'नाग' कंपनीचा एजंट रामलाल उमगांवांत येऊन दोन-तीन दिवसच झाले होते. पण तेवढ्यांत त्यानें उमगांवच्या लोकांच्या पादत्राणांची बारीक पाहणी करून टाकली होती. सकाळ-संध्याकाळ तो बाजारच्या एका आमरस्त्यावरच्या पुलावर जाऊन बसे, व येणाऱ्याजाणाऱ्यांच्या पायाकडे निरखून पाहीं; मग आपल्या हातांतल्या टिपणवहींत कांहीं टिपणें करी व पुनः पाहत बसे. दोन-तीन दिवसांतच त्यानें उमगांवांतल्या चलनी जोडयांचा आडाखा

बांधला, व त्यावरून त्यानें हेंहि ओळखलें कीं त्याला खरा लढा लढवावा लागणार तो दादाजींचे कसब व चामड्याची पारख यांच्याशीं. तो आपल्या वहींत करीत असलेलें एकेक टिपण दादाजींच्या कौशल्याची साक्ष पटवीत होते. पण तसेंच ते एकेक टिपण म्हणजे दादाजीच्या वैभवावर हाणला जाणारा जणूं एकेक घावच होता.

व एक दिवस सकाळीं रामलालनें आपला सर्वांत मोटा घाव हाणला. दादाजी नित्याप्रमाणें दिवस डोईवर येईतों भिंतीलगत वहाणांचा एक खास जोड करीत बसला होता. सोनीनें नित्याप्रमाणें त्याच्याभोंवतीं भातुकलींचें रंगण धरलें होतें व तिची मेजवानी आटपत आली होती. तितक्यांत सोमा दुकानावरून परत आला, व त्याच्याबरोबर रामलालहि.

"दादा हे पाव्हणं आल्याती...."

"कोणं गा?"

"नाग कंपनी नव्हं का ती बुटाइची, त्याइचे एजंट रामलालजी," सोमा सतरंजी पसरत म्हणाला—पण दादाजीनें चमकून हातांतलें काम थांबवून रामलालकडे पाहिलें. "बसा, कसे आल्याती...."

"कांहीं नाहीं, बाबाजी...म्हटलं गांवोगांवचे नमुने पाहावे जरा पायताणांचे. एकाद्या लहान गांवांतहि पायाला आरामशीर नमुना मिळून जातो एकादा. अन् गांवचीहि कांहीं अडचण असली तर दूर करावी म्हटलं. पण तुमच्या गांवांत तर कशाची कमी नाहीं, बाबाजी. तुमच्यासारखं कसबगार माणूस आल्यावर पायताणाची काय वाण?"

दादाजीनें पुन्हा त्याच्याकडे निरखून पाहिलें. स्पष्टपणें काहीं कळलें नसून देखील त्याचे मन आशंकेनें भरून गेलें होतें.

रामलालनें सोनीशीं खेळायला आरंभ केला होता. 'या ताई, तुमची भुलाई तर मोठी गोड आहे. तुमच्या भुलाईला मडमीसारखे जोडे हवेत कां ताई...मी देईन आणून उद्यां.'

दादाजीचें अनुभाविक मन, धंद्याला जिवासारखें जपणारें मन, आशं-कानीं भरून गेलें. त्यानें सोमाजवळ आपल्या मनांतील काळजी नंतर चारदां बोलूनहि दाखविली. 'पण तरुण सोमा रामलालजवळच्या चामडयाच्या नव्या दुनियेनें मोहून गेला होता. त्याला वाटे, आपणहि बनवूं असे चकचकीत नमुने, असे नरम लपकचपक करणारे जोड, असे रंगीबेरंगी जोड. आपल्या बापानें एका प्रकारांत नांव कमावलें; रामलालच्या मदतीनें आपण वेगळया प्रकारांत नांव कमावूं.' रामलालनें त्याच्या अंगची कसबाची पिढीजाद आवड केव्हांच ओळखली होती व त्याच गळावर तो सोमाला झुलवीत होता. तो त्याला अशी जाणीव कशाला देईल कीं 'नाग'च्या प्रचंड कारखान्याचीं यंत्रें केव्हांच फिरूं लागलीं होतीं व उमगांवच्या नांवाचे कित्येक जोड तयारहि होऊं लागले होते? तो त्याला अशी जाणीव कशाला देईल कीं चार दोन वर्षांत आपलें कसब व चलाखी गुंडाळून ठेवून कदाचित् 'नाग' दुकानांत कामिशन साठीं किंवा रिपेरिसाठीं नोकरी करण्याचा आपल्यावर प्रसंग येईल...

तीं चार दोन वर्षें गेलीं...

बाजार आळींतल्या दादाजीच्या दुकानावर मोठी टिनाची पाटी लागली होती. पण ती सोमाच्या नांवाची नव्हती. तिच्यावर ठराविक ठशांचीं 'नाग' अशीं नागमोडी अक्षरें होतीं. त्या दुकानांत सोमा दिसत असे-पण तो माल-काच्या ऐटीनें हिंडतांना नव्हे. कधींकधीं कांहीं दुरुस्तीचें काम मिळाल्यास घेऊन जायला येत असे. त्या लपकचपक करणाऱ्या पायताणांची चमक आतां त्याच्या डोळयांत मुळींच भरत नव्हती. पण त्याच्या गांवकऱ्यांच्या पायांत मात्र त्याला तींच दिसत होतीं. व दुरुस्तीसाठीं त्यांचे जोड त्याच्याकडे आले, की त्यांच्या तळव्याचा वासलेला 'आ' व मध्यें जिभेसारखा लोंबणारा पुठ्याचा तुकडा पाहून तो विपण्णपणें हंसे, व टांचे घालूं लागे!

गांवच्या शिवेवरच्या दादाजीच्या घरावरचें चहावाल्याचें घडयाळ आतां सात वाजलेले दाखवत नव्हते. आपलें कार्य करून तें नामशेष झालें होतें. आतां घरांतल्या चुलीवर मात्र नेमानें सात वाजतां पिवळया चहाची

पूड पडत होती, व तिच्या बरोबर ‘ मंमई ’ च्या त्या जासूदाच्या व त्याच्या मालकांच्या खिशांत पैसा पडत होता.

थंडीच्या दिवसांत सकाळीं दादाजी आपल्या भिंतीलगत बसलेला दिसे त्याची नजर भोंवताली फिरे; पण त्याला गोठ्यांत जनावरें दिसत नसत. त्यानें आपल्या हतातल्या कामाकडे डोळे वळवले. कीं त्याला आपल्या नांवा-जलेल्या पद्धतीची वहाण दिसत नसे; कुणीतरी बनवलेली, दुरुस्तीसाठीं आलेली बाजारू वहाण दिसे.

त्याच्याजवळ सोनी कांहीतरी काम काढून बसलेली दिसे. तिच्याकडे नजर जातांच दादाजीच्या मनांत येई... “ आवंदा चार पैशांत कां होईना... हिचं लगीन व्हायाच हवं ना... ! ”

# अब्दुर् रशीद

## रघुनाथ मुरलीधर जोशी

हैद्राबादेंतील उस्मानिया हॉस्पिटलमध्यें मी अकौंट्स क्लार्क होतों. हैद्राबादचें हें हॉस्पिटल म्हणजे सबंध हिंदुस्थानांत नांवाजण्यासारखें आहे. तें सर्व प्रकारच्या अद्ययावत् उपकरणांनीं व निरनिराळ्या तज्ज्ञ, युरोपीय पदवीधर डॉक्टरांनीं भरलेलें होतें. या हॉस्पिटलला मुख्य प्रवेशद्वार जरी एकच होतें तरी डॉक्टर्सना व इतर अधिकाऱ्यांना जाण्यासाठीं लहान लहान अशीं आणखीहि फाटकें होतीं, अशाच फाटकावर अब्दुर् रशीद नांवाचा म्हातारा शिपाई चौकीदार म्हणून नोकर होता.

सर्व शिपायांप्रमाणें या म्हाताऱ्यासहि बारा रुपये पगार असे. याचें काम एवढेंच कीं अधिकारी वर्गाशिवाय इतरांस तेथून आंत येऊं द्यावयाचें नाहीं. रशीद हा साठ-एक वर्षांचा म्हातारा असून मोठा इमानदार आणि आज्ञाधारक माणूस असावा-असें वाटे, परंतु अधिकारी जाण्याच्या फाटकानें साधारण माणसाला अडी-अडचणीच्या वेळीं चिरीमिरी घेऊन सोडणें वगैरें गोष्टी त्याच्या नित्याच्या सरावांतल्या होत्या! त्याच्या या गैर वर्तनाबद्दल त्याला धमकावलें तर वाटेल ती शपथ घेऊन तो या गोष्टीचा साफ इन्कार करी.

एके दिवशीं एक कागद घेऊन तो मजकडे आला. येतांना तो लंगडत होता. चेहऱ्यावरून जेवढा केविलवाणेपणा व्यक्त करणें शक्य होतें तेवढा व्यक्त करून त्यानें आपली कहाणी निवेदन केली.

" मला तीन आठवड्यांची रजा पाहिजे, साहेब ".

" अरे, तुला इतकी रजा कशी मिळेल? तुझें तर येथें चोवीस तास काम असतें, शिवाय पगारहि नाहीं मिळणार या दिवसाचा ".

" साहेब, गरिबावर दया करणें आपल्या हातीं आहे, माझी स्थिति पाहा. मी रजा घेतली नसती, कांहीं कारण नसतें तर. हा पाहिलात माझा

पाय? मला नारू झाला आहे आठ दिवस त्याची ठणक सहन करीत आहें, पण आतां शक्य नाहीं. आमच्या कंदकुर्तीला जाऊन इलाज करवून येतों ".

" मूर्खा, एवढया मोठया हॉस्पिटलमध्यें राहतोस व औषधाचा इलाज करण्यासाठीं तुझ्या खेडयाला जातोस? लोक हंसतील आणि बडा डॉक्टर तुला या कारणानें रजा तरी देईल कां?".

" छे! छे!! साहेब या तुमच्या बडया दवाखान्यांतील औषधें आमच्या सारख्या गरीबांच्या कामाला येत नाहींत. मी पडलों मोंगलाई पुराणा माणूस मला हीं नवीं इंग्रजी औषधें काय व्हावींत? आम्हाला त्यांचा काय गुण येणार? परवां त्या रामलिंगम म्हाताऱ्याला प्लेग टोंचला आणि पंधरा दिवसांच्या आंत त्याचा मुडदा पडला. मी टोंचून घेतलें नाहीं तर पाहा कसा तगडा आहें! आमच्या गांवीं एक म्हातारा न्हावी आहे. असा उत्तम इलाज करतो नारूवरती. एक औषध बत्ताश्यांत देतो. विषासरखें कडू असतें, काय करावें, घ्यावें लागतें. पण नारूमात्र बियाला राहात नाहीं ".

रशीदचा अर्ज व म्हणणें मोठया डॉक्टर साहेबाला सांगितलें. डॉक्टर साहेब मोठे हुषार, आपल्या विषयांत पारंगत आणि ध्येयवादी होते. मानव-जातीचीं दुःखें हलकीं करण्याचा आपण प्रयत्न करीत आहेत असा त्यांचा अभिमान होता. त्यांचा अभिमान त्यांच्याच ठिकाणीं जिरला. त्यांनीं रशीदला बोलावून समजावण्याचा प्रयत्न केला. ते म्हणाले, " तुला उपचार करतों, तूं बरा हो आणि मग त्या कंदकुर्तीच्या न्हाव्याला भेटून गांवीं जाऊन ये. त्याला सांग, तुझ्या औषधावांचून नारू बरा झाला ".

रशीदनं अगदीं काकुळतीला येऊन विनंति केली, " साहेब, रजा देतां येत नसेल तर देऊं नका. पण आपलें औषध माझ्यावर लादण्याची शिक्षा करूं नका. तुमच्या पायां पडतों ".

# नंदादीप आणि पणती

**वी. रघुनाथ**

ग्रीष्माच्या अखेरीची ती संध्याकाळ ढग आणि वारं वाहून आणीत होती. अंधाराच्या लाटा दृश्यविषयांचा संहार करूं पहात होत्या. युगाचं पहिलंच चरण या विध्वंसक शक्तींच्या साहाय्यानं सृष्टींत मोठा प्रक्षोभ करून टाकणार हें अगदीं स्पष्टच दिसत होतं !

नंदादीपाच्या प्रकाशांत त्या देवळाचा गाभारा मात्र प्रशान्त आणि प्रसन्न दिसत होता. धूपाचा आणि पुष्पांचा परिमल देवस्थानाचं पावित्र्य सूचित करीत होता. अन् ज्यासाठीं धूप आणि दीप जळत होतें, ती ईश्वरी अंशाचा आभास निर्माण करणारी प्रस्तरमूर्ति स्मितयुक्त गंभीर आणि निश्चल दिसत होती. कालाच्या अनिरुद्ध प्रवाहावरलं युगानुयुगांचं आपलं वर्चस्व जणूं ती जाहीर करीत होती ! श्रद्धाळू जीव आपल्या आध्यात्मिक भुकेच्या समाधानासाठीं त्या मूर्तीपुढं नम्र होत आले होते. पण एखाद्याच्या तरी आत्मिक तृषेचं शांतवन झालं होतं किंवा नाहीं याची शंकाच होती. कारण देवळांतून बाहेर पडल्यावर प्रत्येकाच्या मुखावर जें चिंतेचं पटल, असमाधान आणि अतृप्ति दिसत होती ती ईश्वराइतकीच अनादि असावी असं वाटत होतं. अन् एवढ्यावरहि देवदर्शनासाठीं झुंडींच्या झुंडी येत होत्याच !

बाहेर वादळाचीच काय पण प्रलयकाळाची जरी रात्र असती तरी त्या मूर्तीची निश्चलता ढळणं शक्य नव्हतं. अन् अशा अढळपदाशेजारीं अखंड दीप्तीचा लाभ झाला असं समजून नंदादीपाच्या ज्योती मोठ्या अभिमानानं झरत आणि स्फुरत होत्या ! अंधार असलेल्या प्रवेशद्वारांत एक कोनाडा होता. अन् कोनाड्यांत तेजोजीवनाची एक अत्युत्कट प्रेरणा धगधगत होती. दाराच्या कोपऱ्यांतून सरसावणारा अंधार क्वचित् स्तिमित होऊन कोनाड्याभोंवती रेंगाळत होता. पणतीच्या चिमुकल्याच अंतःकरणाचं तें ज्वलत् प्रस्फुरण पाहून अंधाराचे डोळे दिपून जावे यांत नवल नव्हतं.

बाहेरचं वारं दाराशीं धडका घेऊं लागलं. अन् आपल्या तेजो-जीवनाचं आतांच खरं कार्य आहे म्हणून पणतीची ज्योत अंधाराशीं टकरा घेऊं लागली. नंदादीपाला वाटलं पणतीची ज्योत बाहेरच्या वादळाला भिऊन आंत येण्याची इच्छा करते आहे तो म्हणाला – " हं, सांभाळ ! उगीच फार मोठ्या स्थानाची हाव धरूं नकोस ! वाऱ्याचा एखादाच फटकारा बसला की, आहे नाहीं तेवढंहि खलास होऊन जाईल ! अन् अशा क्षणजीवी दिवट्या देवाजवळ शोभतील तरी कशा ? रखवालदारांनी दारावर पहारा करायचा असतो. सिंहासनं भूपवायचीं नसतात. आंत असं डोकावून पाहूं लागलीस तर माझ्या आजवरच्या तपाच्या तेजानं उज्ज्वल झालेलं हें स्थान भ्रष्ट होऊन जाईल ! ईश्वराच्या मूर्तीशेजारीं राहण्याचा हक्क माझा आहे. दारांतलीं पादत्राणं सांभाळणं तुझं काम ! ........ "

पणतीची ज्योत बेफिकीरीनं हंसली. कोनाड्याभोंतीच्या अंधारावर ईवल्या तेजस पुष्पांच्या कळ्याच ओसंडल्याचा भास झाला. अन् क्षणानंतर किंचित् स्थिर होऊन ती म्हणाली –

" मला माहित आहे, वैभव आणि अहंकार यांनी उन्मत्त झालेलीं माणसं असंच बोलतात नेहमीं ! कुणी सांगितलं तुला मला आंत यायचं आहे म्हणून ? निर्जीव फत्तराशेजारीं जळण्यांत एवढा अभिमान बाळगण्यासारखं आहे तरी काय ? केवळ अनृत आणि अंधश्रद्धा यांना साक्ष राहण्याशिवाय जीवनांत जळून तूं अधिक काय केलं आहेस ? अशा रीतीनं लोकांची दिशाभूल करण्यापेक्षां दिशांतून कोंदून उरणारा अंधार नाहींसा करण्याच्या हेतूनं जळण्यांत अधिक स्वारस्य नाहीं काय ? बाहेर वादळ उसळलं आहे याची तुला न् तुझ्या देवाला कल्पनाहि नाहीं ! थोडासा वाऱ्यांत आला असतास म्हणजे तुझ्या अखंड दीप्तीचा झोक तरी कळला असता ! तुझं निरंतदीपनाचं स्वप्न मला मोह घालूं शकत नाहीं ! माझ्या डोळ्यापुढं या वेळीं काळा डोंब अंधार भरला आहे. अन् या अंधारांतून देवळाकडं येणाऱ्या प्रवाश्यांची मला वाट उजळायची आहे. वादळांत सांपडलेला एखादा तरी वाटसरू माझ्या प्रकाशाच्या रोखानं देवळाच्या आसऱ्याला आला तरी पुरे आहे ! माझ्या जीवनाचं सार्थक होईल ! उच्चतर जीविताचा ध्यास घेऊनच जळत राहण्याचा आनंद मोठा

अलौकिक असतो. निष्क्रिय ज्वलनानं तो कधींच लाभत नाहीं. त्यासाठीं वादळाशीं अंन् अंधाराशीं धडका घ्याव्या लागतात ! ”

ज्योतीला वाऱ्याचे झटके बसूं लागले. बेफाम होऊन अंधारावर हिंदकळणाऱ्या तिच्या प्रकाशरेखा आपल्या अंतःप्रेरणेच्या पूर्तीसाठीं धडपड करूं लागल्या. अंधारच नव्हे तर दिशांचं पटल भेदून पणतीची ज्योत आकाशाच्या पलीकडचा भाग आपल्या प्रकाशानं व्यापून टाकणार असं क्षणभर वाटलं. इतक्यांत वाऱ्याची एक जोराची झडप बसली. उन्मत्त आणि बभान होऊन ज्योतीच्या इवल्याच पण प्रभावी दीप्तीनं वाऱ्याच्या लहरीवर इतका जोराचा प्रहार केला कीं, अंधाराचा उफाळता प्रवाह एकदम दुभंगल्यासारखा झाला. अन् क्षणानंतर सारं निष्प्रभ होऊन गेलं !

रात्र संपत आली तसा वादळाचा जोर कमी कमी होत गेला. ज्वलनाची शेवटची धग ज्योतीच्या मुखावर अद्याप कायम होती. एखाद्या हुतात्म्याच्या आठवणीइतकी ती प्रभावी आणि प्रेरक वाटली. हळूहळू आभाळांतून तांबडं फुटूं लागलं आकाशांतून निसटलेल्या प्रकाशाच्या पहिल्याच रेखेनं पण तिच्या दीप्तिहीन ज्योतीवरली तडतडत असलेली ठिणगी पाहिली मात्र. जिवंत प्रेरणेनं अभियुक्त झालेल्या असंख्य प्रकाशरेखा धांवत येऊन चहूंकडं तेजाचा पाऊस पाडूं लागल्या, लक्षावधि विरल शकलं होऊन गेलेल्या अंधाराला ओसरण्याशिवाय अन्य गतीच नव्हती ! पणतीच्या ज्योतीचं जीवनकार्य विश्वा इतकं व्यापक झालं !

देवळांत मात्र अद्याप मंद अंधार होता. अन् त्या अंधारांत एखाद्या भ्रष्ट झालेल्या माणसासारखा, नंदादीप आपलं तोंड लपविण्याचा प्रयत्न करीत होता !

*

# रावसाहेब र. लु. जोशी

### य. गो. जोशी

"म्हातारा" आणि "पेन्शनर" हे दोन शब्द विनोदाची खसखस पिकवायला हल्ली खासे उपयोगी पडत असतात. पण मी आज अशा म्हाताऱ्याची आणि पेन्शनराची मुलाखत घेतों आहे कीं त्या म्हाताऱ्याकडे पाहून-केवळ आपल्याला जन्मल्याला थोडे दिवस झाले म्हणून स्वतःला तरुण म्हणवून घेणाऱ्या विदूषकांना रावसाहेब र. लु. जोश्यांसारखा प्रामाणिक म्हातारा होण्याची तळमळ लागावी!

तो माझ्या दृष्टीनें "आदर्श म्हातारा" म्हणजे रावसाहेब र. लु. जोशी हे होत. होतां होईल तों कोणत्याहि संस्थेचा सभासद व्हायचें नाहीं असें माझ्या आयुष्याचें एक बारकेंसें ध्येय होतें. पण रावसाहेब र. लु. जोशी या म्हाताऱ्यापुढें मला "यशस्वी माघार" घ्यावी लागून "साहित्य-परिषदे"चा मी सभासद झालों आणि त्याच जोरावर, माझ्या "अनौपचारिक मुलाखतीं"तून निसटूं पाहाणाऱ्या या म्हाताऱ्याला-

"अरे, काय जोशीबुवा, आमच्यावर कां धाड तुमची,-अरे मला सोडवाना तुमच्या मुलाखतींतून! आम्ही असं काय केलं आहे तुमचं?" रावसाहेब अत्यंत केविलवाणेपणानें म्हणाले.

"काय केलं आहेत?" मीहि जरा चढया स्वरांतच विचारलें. "मला साहित्य परिषदेचा सभासद कोणी करून घेतलं? बरं, घेतलंत तें घेतलंत आणि वर्गणीहि वसूल करतां? भोगा आतां त्याचें प्रायश्चित?" मी सूडाच्या समाधानाने म्हटलें.

"अरे, पण आम्ही नाहीं मुलाखत दिली तर!"

"रावसाहेब-माझ्या घरीं येऊन मुलाखत द्याल! फक्त साहित्य परिषदे-करिता चार नवीन सभासद मिळणें शक्य आहे असें तुम्हांला आमिष दाख-

वायला पाहिजे! आणि खरं सांगू का, रावसाहेब, तुमची मुलाखत लिहिण्याकरितां मला तुमच्याकडून कांहींहि माहिती नको आहे! माझ्या कांहीं मुलाखतींचें हेंच वैशिष्ट्य राहणार आहे की मुलाखतीकरितां "मुलाखित" व्यक्तीला फारच थोडें विचारणार आहें-आणि त्याची माहिती मी आजूबाजूला चौकशी करूनच जास्त काढणार आहें! आता माझ्या या विचित्रपणामुळें "मुलाखित व्यक्तीवर क्वचितच आश्चर्यानें पाहण्याचा प्रसंग येणार आहे! पण मुलाखत म्हणजे धक्के देणारी-मुलखित व्यक्तीला सामान्य माणसांतून बाजूला काढणारी असायलाच पाहिजे! तेव्हां रावसाहेब, मला तुमच्याबद्दलची सर्व माहिती मिळाली आहे-मला फक्त परवानगी पाहिजे!"

माझें हें भाषण ऐकून रावसाहेब एकदम चिंतातुर झाले. त्यांनी आपल्या हातांतील छत्री एकदम जमिनीवर उभी करून त्यावर आपल्या दोनहि हातांच्या पंजांचें पाखें तयार केलें आणि त्यावर आपलें डोकें स्थिरावलें आणि एकदोन मिनिटांतच एकदम मनमोकळे हंसत ते म्हणाले, "आलें जोशीबुवा लक्षांत-माझी माहिती तुम्हांला कोणी सांगितली ती!-आमच्या विठ्ठलराव घाट्यांनी सांगितली असेल! अरे, ते काय माहिती सांगणार?" रावसाहेबांना आपलें स्वतःचेंच हंसणें आवरेना.

"अहो, जोशीबुवा-विठ्ठलराव घाटे फार मिस्किल माणूस आहे-त्यांच्यावर भरवसा ठेवूं नका तुम्ही! त्यांची मुलाखत घेणार असलां तर मग त्यांची माहिती मी सांगेन तुम्हांला-बरं, माझ्या मुलाखतीबद्दल त्यांनीं काय काय सांगितलं तुम्हांला?" रावसाहेबांनी साळसूदपणानें विचारलें.

"तें आतां तुमची मुलाखत छापून आली म्हणजे वाचा तुम्ही!" मी गंभीरपणानें म्हटलें.

"हं-मी सांगतों तुम्हांला, मी कविता करतों आणि फाडून टाकतों-हें सांगितलं का त्यांनी तुम्हाला?- हें सांगितल्याशिवाय राहायचे नाहींत ते! जोशीबुवा, मला लहानपणापासून कवितेची खूप आवड, मुक्तेश्वर, श्रीधर-वाः वाः तुम्हांला ठाऊक नाहीं जोशीबुवा-माझी स्वतःची दोनतीन हजाराची लायब्ररी आहे! मी कविता केल्या खूप-पण त्या छापून वाचकांना त्रास नाहीं

दिला–केवळ मी माझ्या मनाच्या समाधानाकरितां करायचा आणि फाडून टाकायचा! त्यांतल्या कांहीं कांहीं ओळी अजून आठवतात मला--" रावसाहेब आपल्या आठवणींतल्या कवितेचे चरण गुणगुणू लागले.

"मर्द मराठा असे सांग रे। मर्दुमकी तव कुठे?--कुठे हा निनाद भंवती उठे!—

आणि आमच्या लक्ष्मीबाई टिळकांच्या ख्रिस्तायनांत माझाहि भाग आहे थोडा—

दिसे वरती, निळें अंबर। रजताऽभ्राची तया झालर!॥

फुले चांदवा असा सुंदर। विश्वेश्वर आगमनाऽ॥

किंवा

मातृहृदयाचें मापन। मातेविना करी कोण?

अतिरेजनाऽकाय सांगून। ये उमगून मायमाया!॥"

रावसाहेब म्हणत असलेल्या काव्यचरणांपेक्षाहि रावसाहेब ज्या तल्लीन वृत्तीनें ते काव्यचरण म्हणत होते, त्याची मोहिनी माझ्या मनावर जास्त पडली-- त्यांतच मला खरें काव्य वाटत होतें. रावसाहेबांचें काव्यगायन आपो-आपच थांबलें. आणि ते कांहीं तरी तंद्रीतच वर छताकडे पाहूं लागले.

तेव्हां मी हळूच विचारलें, "रावसाहेब, वय काय तुमचें?"

"अहो, अडुसष्टावें वर्ष लागलें आम्हांला–आहेत कोठें आमच्या जोडीचीं फारशीं माणसें? पेन्शन घेऊन अकरा वर्षें झालीं मला! अहो, पण आमची कशाला विनाकारण मुलाखत घेत आहांत तुम्ही? असं काय आहे आमच्या आयुष्यांत? मला चार मुलगे आहेत आणि एक मुलगी आहे-- चार मुलगे मिळवते आहेत-- एक मुलगी--तिचंहि लग्न झालेलं आहे--ती आपल्या मुलांबाळांसुद्धा आपल्या घरीं आहे; जावई डॉक्टर असतात माझे विकाराबादला! हीं माझीं औरस मुलं-- आणि आणखी एक मुलगी आहे मला-- मी संभाळली आहे ती-- झालीं आज आठ–दहा वर्षें--त्या मुलाचे आईवडील वारले--नातेवाईक कुणीच नाहीं–आता माझीच मुलगी ती--माझे

भाऊ मात्र अमेरिकेंत वगैरे होते--आतां भाऊ-- कोणी राहिला नाहीं--कॅनन जोशी ऐकून माहीत असतील तुम्हांला !-- एक डॉक्टर होते--एक प्रोफेसर होते, पण गेले बिचारे सगळे ! अहो, मला कांहीं कमी का होतं ? पांचशें साठ रुपये पगार होता मला मी पेन्शन घेतलं तेव्हां--पण आमच्या भावांनी चीन-जपानमधून ५०।६० रुपयांचं कापड मला घेऊन पाठवलं होतं-- यांतली गंमत नाहीं कळायची तुम्हांला-- तें कापड अजून आहे-- पण भाऊ निघून गेले ! रावसाहेबांचें पूर्वायुष्य त्यांच्यां डोळयासमोर नाचूं लागलें होतं.

"हें आमचें आयुष्य–याची का मुलाखत होणार आहे? तेव्हां मी सांगतों तुम्हाला–आमच्या मुलाखतीचा नाद सोडा तुम्ही यशवंतराव!" रावसाहेब अगदीं अक्षरशः माझ्यापुढें हात जोडून म्हणाले.

"पण रावसाहेब," मी गंभीरपणानें म्हटलें, "माझी माहिती अशी आहे कीं, आपण पोस्टखात्यांत २५ रुपयांवर नोकरीला लागलांत--आणि नंतर आपण साडेपांचशें रुपयांपर्यंत बढती मिळविलीत- शिवाय मोटार अला-उन्स--राहायला बंगला –"

" अहो मग यशवंतराव, याकरितां पोस्ट खात्याची मुलाखत घ्यायला हवी तुम्ही ! पोस्टखात्यानें आतांपर्यंत माझ्यासारख्या किती तरी लोकांना पंचवीस रुपयांवरून पांचशें-आठशें, हजार-बाराशें–अशीं प्रमोशनं दिली आहेत ! त्याचं असं आहे यशवंतराव, मोठ्या पगाराच्यां जागा थोड्या अस–तात–त्यामुळं कांहीं लोकांनाच अशीं प्रमोशनं मिळतात ! हां–आतां खरं सांगतो यशवंतराव तुम्हांला–एक मात्र माझ्या बाबतींत आहे सांगण्यासारखें इतकी नोकरी केली--तरुण होतो तेव्हां नोकरींत मित्रासारखा वागलों सगळयांशीं; पुढें वयानें आणि अधिकारानें मोठा होत गेलों-तसा मोठ्या कुटुंबांतील 'दादा' असावा ना, तसा वागलो सगळयाशीं आणि सगळे माझ्याशींहि तसेंच वागले. खरी नात्याचीं माणसें सोडलीं, तरीं ऋणानुबंधानें-अनेक मुलं-मुलीं-भाऊ बहिणी आहेत मला ! " एखाद्या भगवद्भक्तानें पंढरीच्या विठूच्या कीर्तनाला उभें रहावे, त्याप्रमाणें रावसाहेब जवळजवळ आपल्या आयुष्याच्या कीर्तनालाच उभे राहिल्यासारखे मला वाटले. तो म्हातारा गडी आपल्या आयुष्यांतल्या पूर्वस्मृतींत रंगला होता. आणि आपल्या आयुष्यातलें काय

बोलावें-किती बोलावें—पण अनेक आठवणींनीं त्यांच्या मनाच्या आंगणांत गर्दी केल्यामुळें त्या आठवणींतच ते तल्लीन झाले वाटतें—आणि बोलायचें आपोआप थांबले !

" पण रावसाहेब, मराठी भाषेविषयीं अितका जिव्हाळा तुम्हांला कसा उत्पन्न झाला ! " रावसाहेबांना पुन्हां बोलते कण्याकरितां मी कांहीं तरी प्रश्न टाकला.

" असं विचारा, मी सांगतो तुम्हांला ! पण त्या विठ्ठलराव घाटयावर विश्वास ठेवूं नका ! अहो, माझ्या विषयाच्या आपलेपणापायीं--खूप आकाशांत भराऱ्या मारल्याप्रमाणं--'रावसाहेब' ते तुम्हांला खूप मोठ्ठा करून दाखवितील पण मी सांगतों तुम्हाला--"

"—पण मला विठ्ठलराव घाट्यांनी सगळं सांगितलं आहे—आणि मला तें पटलं आहे ! " मी म्हटलें.

"--मग मराठीबद्दल मला इतका आपलेपणा कां वाटायला लागला हें सांगितलं नाहीं त्यांनी तुम्हाला ? हं,हं, आतां आलें लक्षांत-- विठ्ठलराव घाट्यांचं नांव पुढें करून सर्व माहिती माझ्याकडून काढीत आहांत तुम्ही ! पण असं खोटं मला नाहीं आवडत-- मी सांगतों तुम्हांला--त्याचं असं झालं -- पोस्टखात्याच्या माझ्या नोकरीनिमित्त मला कराची, लाहोर, बसरा इकडे खूप दिवस काढावे लागले -- आणि तिथें मराठी बोलण्याचे प्रसंग अत्यंत कमी--घरींच काय बोलूं तेवढें--कसं चुकल्या चुकल्या सारखं वाटायचं पाहा--आपल्या देशांत राहून मायबोलीचें महत्व कळत नाहीं अहो, मायबोली म्हणजे ऑक्सीजनसारखी आहे !— सिमल्याची गंमत सांगतों तुम्हाला--एकदां सिमल्याला गेलों होतों एकटाच--आणि तिथें दोनचार दिवसांत मराठी बोलायला सांपडलं नाहीं अजिबात ! मला कांहीं चैन पडेना -- अखेर जिथें उतरलों होतो तिथं विचारलं, " इथं, मराठी बोलायला कुठे सांपडेल हो ? "-- आणि कळलं कीं इथं घाणेकर म्हणून एक गृहस्थ आहेत-- बरं, त्यांची माझी ओळख ना पाळख--घाणेकरांचा पत्ता विचारून घेतला -- आणि दुपारचं जेवण झाल्याबरोबर -- लगेच बाहेर पडलों -- माराठी बोलायला म्हणून --. आलों घाणेकरांच्या बंगल्यांत — ते झोंपले होते -- मी कांहीं तरी आवेगानेंच

दार ठोठावलें – घाणेकरांची झोंपमोड झाली -- ते झोंपमोडीमुळें किंचित रोषानेंच माझ्यासमोर येऊन उभे राहिले आणि त्यांनी मला विचारलें, "काय पाहिजे तुम्हांला ?" मीहि आवेगानें म्हटलें " मला दुसरं कांहीं नको आहे. मला मराठी बोलायला पाहिजे -- आज चार दिवस झाले. मराठी बोलयला सांपडलं नाहीं कुठें -- इथं बोलतां येईल असं कळलं म्हणून धांवत आलों" आणि काय सांगू जोशीबुवा तुम्हांला -- कदाचीत् खोटं वाटेल तुम्हांला – आम्ही एकमेकांना कडकडून मिठी मारली ! मायबोलीबद्दलचा जिव्हाळा असा विलक्षण असतो ! कोणत्याहि गोष्टीचा उपास पडला -- म्हणजे तिचें खरें महत्व कळतें !

रावसाहेब बोलायचे मध्यें एकदमच थांबले -- आणि लगचे थोड्या वेळांत पुनः आपोआप चालू झाले. "अहो, हैद्राबादला आमच्या पोस्टल यूनियनचें वार्षिक संमेलन आम्ही खूप जोरांत केलं – आणि त्याचंच यश भोवलं मला – लगेच आलं हैद्राबादचं साहित्यसंमेलन – तेथल्या लोकांनी – म्हणजे तुम्हां साहित्यिकांनी लगेच मलाच धरलं वेटीला – मग काय, झालं आमचं यंत्र सुरू – ' ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ' लाअीनमध्यें दिवस गेलेले आमचे - हैद्राबादचे काशिनाथराव वैद्य वकील – वामनराव नाईक – श्रीधरपंत नाईक- झाला रामरगाडा सुरू ! आणि पुन्हां हैद्राबाद तें ! अध्यक्षांचं भाषण अगोदर सरकारांत हजर करायला पाहिजे – आणि इकडे अध्यक्ष डॉ. केतकर आणि त्या निमित्तानेंच आपले तात्यासाहेब केळकर – दत्तोपंत पोतदार – नानासाहेब चापेकर – वामनराव जोशी यांचें माझें संघटन वाढलें ! मुंबईचे न. र. फाटक संमेलनाला यायला तयार नव्हते – मी जाऊन भेटलों त्यांना – त्यांची आमची पहिलीच भेट ती. पण मी भेटलों – पहिल्याच भेटींत – त्यांच्यावर रागावलों – संतापलों – त्यांना सांगितलं, " असले लाड नाहीं चालायचे – परिषदेचे चिटणीस तुम्ही – मराठी भाषा तुमची आहे ! " आले अखेर फाटकहि हैद्राबादेला. डॉ. केतकरांच्या भाषणांत थोडी खाडाखोड करावी लागली ! तिकडे निजाम सरकार – इकडे डॉ. केतकर – आणि ' बफर स्टेट ' सारखी आमची मध्यें कुचंबणा ! पण सगळं संमेलन यशस्वी झालं – पण काय सांगावं ? – काव्यगायनाच्या वेळीं नेमका एक कवि अचानक उठला –

आणि त्यानें अफझुलखानाच्या वधाचा पोवाडा म्हटला ! निजामाच्या राज्यांत आणि अफझुलखानाचा वध ! खूप भोंवला पुढें आम्हांला – पण लगेच मी पेन्शन घेतलं – आणि सुटलों त्यांतून !" रावसाहेब गेलेल्या दिवसांना आठवून खूर हंसत होते !

"मग पेन्शन घेतल्यानंतर आपण पुण्यालाच आलांत काय ?"

"विठ्ठलराव घाट्यांनी तें सांगितलं नाहीं वाटतं तुम्हांला ! नाहीं तर हें सर्व सांगितल्याशिवाय राहायचे नाहीत ते – पण तुम्ही विठ्ठलराव घाटे यांच्याकडे गेलाच नसाल ! त्याचं असं झालं – मला नॅचरोपाथीचा पहिल्यापासून खूप नाद -- आणि त्याचा मी खूप अभ्यासहि केलेला आहे - खूप रोगी बरे केले आहेत मी – गुजराथी – पारशी; तेव्हां मी सुरतेला असतांना मी अशा कांहीं महत्त्वाच्या केसेस बऱ्या केल्या होत्या--आणि तिथनं बदली झाली, तेव्हां मी सुरतेच्या कांहीं लोकांना वचन दिलं होतं की पेन्शन घेतल्यानतंर सुरतेला येऊन राहीन म्हणून--शब्दांत बांधला गेलों होतों, मग काय करणार ?"

मी विचारलें, "मग काय केलेंत ?"

"– गेलों सुरतेला. थोडं पेन्शन सरकाराला विकलं–त्याचे पंधरा-सोळा हजार रुपये आले–आता फक्त १३० रुपये पेन्शन मिळतं मला. आणि ते पंधरा-सोळा हजार रुपये–नॅचरोपाथी वगैरे नादांत सर्व गेले ! नॅचरोपाथी-फार चांगला गुण येतो हं–पण आपणाला माहीत असेलच, "बर्फी" नॅचरोपाथींत येत नाही. आणि 'बर्फी' मला खूप आवडते–आणि आता गंमत पाहा–विठ्ठलराव घाटे बर्फीवरून या म्हाताऱ्याची चेष्टा करतात ! विठ्ठलराव घाटे यांची आणि माझी ओळख देवदत्त टिळकामुळें-विठ्ठलरावांची "तो पहा महात्मा आला" ही कविता वाचली आहेत तुम्ही ? – फार छान – !"

रावसाहेब पुनः मध्यें एक–दोन मिनिटें थांबले. नदीच्या पात्रांत उभें राहून–आपणाला नदीचें पाणी प्यायचें असलें तर ज्याप्रमाणें आपण पहिल्यादा दोनहि हातांनी पाण्याचे वरचे थर बाजूला करतों आणि मग मधल्या पाण्यानें चूळ भरतों–त्याप्रमाणें गेलेला कालप्रवाह रावसाहेबांनी मनांतल्या

मनांत थोडा हलवला. आणि म्हटलें, "हं, सुरतेचं सांगायचं राहिलं. तिथं महाराष्ट्र मंडळ' मी स्थापन केलं–आणि पहिल्यांदा तेथें गणेशोत्सवाची, वर्गणी जमेना. मी बाहेर पडलों. तेथे एक कर्नल प्रार्थना समाजिस्ट होते–ते म्हणाले, "आम्ही कशी वर्गणी द्यायची–आम्ही मूर्तिपूजा–" पण मी लगेचं म्हटलें '–अहो, पण मी ख्रिश्चन असून पांच रुपये वर्गणी दिली आहे–' झालं; दिली त्यांनीहि–हे उत्सव, खरे सामाजिक संघटनेकरितां असतात–अरे, आम्हांला तुम्ही विनाकारण ख्रिश्चन म्हणून वेगळे काढतां–जसे आपणा हिंदूंत बौद्ध आहेत, जैन आहेत पण ते बौद्ध–जैन असले तरी ते हिंदू पहिल्यांदा–आणि नंतर ख्रिस्ती–अरे, आमच्या घरीं या तुम्ही–तुमच्या घरांत वावरल्यासारखं वाटेल तुम्हांला–घरीं आम्ही धोतरच नेसतों–अहो तात्यासाहेब केळकरांनी सुद्धा आमच्या सोंवळेपणाबद्दल उल्लेख केला आहे, असें ऐकलं आहे मी–आमच्याच वयाचे ते–अहो, आपले नाना राजवाडे–त्यांच्या पत्नीचें सोवळेंओवळें फार कडक–पण नंतर आमच्या इथें त्यांची ये जा सुरूं होतांच मग नाहीं टिकलं त्यांतल कांहीं!– अहो, त्यांच्या आमच्यांत फरकच नव्हता कांहीं!– हं– सुरतेचा गणेशोत्सव – तिथं दत्तोपंत पोतदारांचीं व्याख्यानं मी करविलीं–काय वक्तृत्व आहे दत्तोपंतांचें! अहो जोशबुवा–तुम्ही आमच्यासारख्यांच्या मुलाखती घेऊन वेळ फुकट घालवतां–ते दत्तोपंतांकडे जाऊन बसत जा–आणि ते बोलतील तें लिहून घ्या–मराठी वाङ्मयाचें कल्याण होईल तुमच्या हातून!– पुढें धनंजयराव गाडगिळांनी आम्हांला गोत्यांत आणलं–आणि सुरत सोडून–मुंबईला–महाराष्ट्र–संघटनाकरितां मुंबईला आलों· आणि मग मराठी भाषेबद्दल गळ घालून–धनंजयरावांनी आम्हांला पुण्याला आणलं"–आणि इथे रावसाहेब चवताळले!

"तुम्ही साहित्यिक फार लुच्चे–गप्पा मारणार–अहो, कांहीं साहित्यिकांकडे अजून तीन तीन वर्षांच्या परिषदेच्या वर्गण्या आहेत–मी म्हणतों मला काय करायचं आहे–काम तुमचं आहे–मराठी भाषेचा संसार तुमचा आहे–तो तुमचा साहित्यिकांचा संसार मी म्हातारा जुळवून देतों आहे–आलों तेव्हां २५० वर्गणीदार होते–आज हजाराजवळ जवळ आहेत! अहो, जस वाङ्मय जें कांहीं सुटलं आहे त्याबद्दल आमची–तात्यासाहेबांची आणि कित्येकांची

खटपट–तुम्हां लोकांना ठाऊक नाहीं–असं पत्र-व्यवहारांत सतावलं होतं सरकारला–फुकट नाहीं सुटलीं कांहीं जप्त पुस्तकं!"

आतापर्यंत मेलेल्या साहित्यिकांच्या स्मारकाकरितां अनेक फंड निघाले आणि नंतर त्यांचें काय झालें तें पुष्कळांना कळलें नाहीं. कै. माधवराव पटवर्धन–हे खरे भाग्यवान ठरले–कै. माधवराव पटवर्धनांचें टोलेजंग स्मारक आज उभें राहिलें–अनेकांचे श्रम त्याला कारण आहेत हें मान्य–पण त्या स्मारकामागे रावसाहेब र. लु. जोशी नसेत तर ?–आणि आघाडीवर विठ्ठलराव घाटे नसेत तर ?–

"–जोशीबुवा या डिसेंबरांत मात्र आपण आतां साहित्यपरिषद सोडणार! खूप त्रास होतो आतां–बायका मुली फार चिडतात माझ्यावर–मी ही साहित्याची रिकामी उठाठेव करतों म्हणून–पण दरवर्षी मला त्यांची परवानगी काढावी लागते–मुलीचें आजच पत्र आलें आहे तें पाहा–पण मी त्यांना सांगतों, "मी जगावं अशी तुमची इच्छा असेल तर मला हें काम करूं द्या–मला समाधान आहे त्यांत–नाहीं तर मी फार दिवस जगणार नाहीं–आतां या डिसेंबर अखेर सोडीन म्हणतों–पाहूं काय होतें तें!"

–मराठी भाषेकरिता–कष्टणारा हा म्हातारा–दीर्घायु होवो!

रावसाहेबांशीं बोलतांना खूप गंमत येते. मी नांव घेत नाही कुणाचें–पण एखाद्या प्रसंगानें एखाद्याचें नांव निघालें की त्या प्रसंगाच्या अनुरोधानें त्याच्याबद्दल एकदम–'चावट' 'लुच्चे' वगैरे शद्ब येत–आणि गंमत ही कीं त्याच माणसाचें नांव दुसऱ्या प्रसंगांत आलें आणि तेथें त्याचा संदर्भ जर चांगला असला, तर लगेच रावसाहेब म्हणत–"त्याच्यासारखा चांगला माणूस नाहीं!" बोलण्याच्या ओघांत "मी खरं सांगतों तुम्हाला" "विचारा वाटेल त्याला" "खोटं नाहीं सांगत मी" "लोक मला भोळा समजतात" असे–झुळूझुळू वाहाणाऱ्या प्रवाहांत मधून मधून दगडगोटे पडलेले असावेत तसे–वारंवार भेटतात. या हिशोबी माणसालाहि मासिक खर्चाला पैसे त्यांच्या पत्नीकडून मिळतात–आणि त्याचाहि त्यांना हिशोब द्यावा लागतो म्हणे–काय जुलूम आहे! या प्रकाराला मी नवरा–बायकोचें प्रेम म्हणायला तयार नाहीं.

"माया!"

—आल्या गेल्याचे संदेश—जीविताचे संदेश—मी मानीत नाहीं! तो संदेशाचा मला गंभीर विनोद वाटतो. पण "संदेशाची" चीड असलेल्या मीनें रावसाहेबांना विचारलें, रावसाहेब, आपल्या जीविताचा संदेश काय?"

"कॉकर अीव्हल वाय गुड!"

रावसाहेब र. लु. जोशी—साहित्यिकांना ते परिचित आहेत—वर्गणी मागायला आले म्हणजे ते जरा त्रासदायक वाटत असतील—पण अेरव्ही? पण मराठी भाषा बोलणाऱ्या कित्येकांना त्यांचा आज परिचयहि नसेल किंवा त्यांचें नांवहि कदाचित् माहीत नसेल—पायाच्या दगडांचें नेहमी असेंच असतें! रावसाहेबांची निष्ठा—कार्याची तळमळ—आणि कोणत्याहि कार्यांत अंतःकरण ओतण्याचा त्यांचा निसर्गसिद्ध स्वभाव—आणि या म्हातारपणीं—आणि वागणुकींतला प्रेमळपणा—मला रावसाहेब र. लु. जोशी भेटले की, कै. गडकऱ्यांच्या भावबंधन नाटकांतील प्रेमळ धुंडीराज भेटल्यासारखें वाटतें!

रावसाहेब र. लु. जोशी यांचें आज साहित्य परिषदेंतहि कित्येकांबरोबर पटत नाहीं—कारण रावसाहेबांच्या बरोबर काम करायला कोणीच टिकत नाही! रावसाहेबांनी आपलें उर्वरित आयुष्य परिषदेला वाहिलें असलें—तरी सर्व लोकांना तें कसें शक्य आहे आणि अिष्ट आहे? त्यामुळें रावसाहेबांविषयीं संपूर्ण आदर असूनहि कित्येक मंडळी आज रावसाहेबांवर मनांतून नाराज आहेत—आणि रावसाहेबसुद्धां!

रावसाहेब र. लु. लेखक—नव्हे, कवी—होते असें त्यांच्याच तोंडून कळलें मला—ठीक आहे! पण मराठी वाङ्मयाची बैठक नीट व्हायला अशींच माणसें पाहिजेत. रावसाहेबांसारखीं साधीं—प्रेमळ—सामान्य—पण मोठीं! कारण मराठीचे अघाडीचे वाङ्मयवीर—सध्यां फारच अवखळ झाले आहेत—त्यांना सांभाळतां सांभाळतां नाकींनव आले आहेत—अेकमेकांच्या अध्यक्षपणाच्या वर्णी लावण्याकरितां—अेकमेकांच्या गलिच्छ आणि हीन लिखाणांची तरफदारी करयण्याकरितां—आपआपले स्वतंत्र फड माजवीत बसले आहेत—आणि त्यामुळें 'मराठींतील हीं मोठीं माणसें नसतीं तर बरें' असें म्हणण्याची पाळी येते—आणि लेखक किंवा कवि नसलेला रावसाहेब—मराठी वाङ्मयाकरितां उन्हातान्हाचा वणवण करीत हिंडतांना पाहिला की मराठी वाङ्मयाला आतां असे म्हातारे पाहिजेत—असें म्हणावेंसें वाटतें!

दीडपानी नाटकमाला

# संगीत मूकनायक

**राम गणेश गडकरी**

लेखकः—**दीडशहाणा**

रूढीच्या शिळाछापांत छापिलें.

( मनुस्मृतीच्या अॅक्टान्वयें या नाटकासंबंधीं सर्व हक्क हिंदुसमाजासाठीं कायमचे राखून ठेविले आहेत. )

---

## प्रस्तावना

नाटक हें संसाराचें चित्र आहे.

—**नाटककर्ता**

---

## भरतवाक्य

**लेखक**— हे सर्वसाक्षिन् भगवान्! सर्वमान्य 'संगीत मूकनायक' नाटकाची कोणत्या तरी अर्थानें कुचेष्टा करण्यासाठींच हें नाटक लिहिलेलें आहे असा कोणाचा भलताच गैरसमज मात्र तुझा प्राण गेला तरी होऊं ऊंदे नकोस!

**आकाशवाणी**—आमेन! आमेन!! आमेन!!!

---

# अंक पहिला

## प्रवेश पहिला

[ **स्थळ**–विक्रांताच्या घरांतील माजघर. **पात्रें**–ठमाबाई, उमाबाई, भीमाबाई, चिमाबाई वगैरे बायका व आवडी, बगडी वगैरे परकऱ्या पोरी, बाळंतपदर घेतलेली व पिवळीफिक्कट अशी विक्रांताची आई, मध्यंतरी टांगलेला पाळणा; पाळण्यांत बारा दिवसांचा विक्रांत ]

**सर्व बायका**–

**पद**–[ **चाल**–हजारों वर्षे चालत आलेलीच. ].

**गोविंद घ्या कुणी । गोपाळ घ्या कुणी ।**
**गोविंद घ्या कुणी । गोपाळ घ्या कुणी ॥**

[ ‘ नाहीं मी बोलत नाथा ’ हा चरण जितके वेळां म्हणण्याचा साधारणपणें प्रघात आहे तितके वेळां हेंच एकसारखें, प्रेक्षकांस कंटाळा येईपर्यंत घोळून म्हणतात. ]

**ठमाबाई**–( उमाबाईच्या कानाशीं कुजबुजतात. ) उमाबाई, बख्खळ पोरें बघितली, पण असलें चिन्ह नव्हतें बघितलें बाई कधीं ! चांगलें बारा दिवसांचें पोर–पण रडतसुद्धां नाहीं अजून ! आज बारसें ना ?

**उमाबाई**– ( तसेंच करून ) नसेंल रडत मेलें. रडेल उद्यां चार दिवसांनीं ! जीवासारखा जीव–काय रडल्यावांचून राहील ?

**चिमाबाई**–( कीं ज्यांनीं हा संवाद आगंतुकपणानें ऐकलेला आहे, त्याहि तसेंच करून ) अहो, कुठलें रडतें आहे तें ? उमाबाईना आपलें कांहींतरी संपादून घ्यायला हवें ! म्हणें रडेल ! रडायला जीव आहे कुठें त्या पोरांत ? अन् म्हणें रडेल ! बरें रडेल तें ! रडेल म्हणें रडेल !

**भीमाबाई**–( विक्रांताचे आईस ) नांव काय ठेवायचें म्हणालांत ?

**विक्रांताची आई**– विक्रांत !

**ठमाबाई**–हें असलें कसलें बाई नांव !

**विक्रांताची आई**–तिकडून सांगायचें झालें आहे ना !

[ तें नांव ठेवतात. पडदा पडतो.

## प्रवेश दुसरा

[ **स्थळ**–सरकारी मराठी शाळा. **पात्रें**– हेडमास्तर, विक्रांताचा बाप ; हातांत एक लहानशी कोरी पाटी घेऊन व डोक्याला पांढरी कानटोपी घालून उभा असलेला विक्रांत, उमर वर्षे ५. ]

**विक्रांताचा बाप**–आपल्या चरणावर घातला आहे, आतां जरा लक्ष

**हेडमास्तर**–बिगारींत बसवा नेऊन त्याला !

**विक्रांताचा बाप**-बरें. [ विक्रांतासह जातो. पडदा पडतो.

## प्रवेश तिसरा

[ **स्थळ**–विक्रांताच्या घरांतील माजघर, संध्येची सामुग्री घेऊन बसलेला व सोंवळयाचीं लंगोटी नेसलेला विक्रांत-उमर वर्षे ७॥. ]

**विक्रांत**-(हातवारे करीत मनांतल्या मनांत संध्येंतील शब्द पुटपुटतो)

( कांहीं वेळ गेल्यावर )

**विक्रांताची आई**– ( स्वयंपाकघरांतून ) अरे विकू, पान वाढलें रे !

**विक्रांत**– ( घाईघाईनें दोन आचमनें टाकून पळत जातो ; वाटेंत चिरगुटावर पाय पडतो; तो घाबरून इकडे तिकडे पाहतो व तसाच स्वयंपाकघराकडे जातो. ) [ पडदा पडतो.

## प्रवेश चौथा.

[ **स्थळ**–रस्ता. **पात्रें**–पाटीदप्तरें घेऊन शाळेंतून घरीं जात असलेला विक्रांत, प्रतोद वगैरे मुलें. ]

( विक्रांत उमर वर्षे १२ विक्रांत अजागळासारखा चालत आहे. मध्येंच प्रतोदला त्याचा धक्का लागतो व प्रतोदची दौत पडते. )

**प्रतोद**–विकऱ्या, लेका दौत सांडलीस, नाहीं ?

**विक्रांत**– ( केविलवाण्या नजरेनें प्रतोदाकडे पाहतो. )

**प्रतोद**–(कांहीं न छापण्याजोगे[ अप ] शब्द हांसडून) डोळे फुटले होते का ? (विक्रांताच्या दोन तीन थोतरींत ठेवून देतो. )

**विक्रांत**–( मोठ्यानें रडूं लागतो.)

**प्रतोद**–( होलिकासम्मेलन कमिटीच्या सभासदांना न रुचणारे शब्द वापरून ) रड लेका आणखी एक तडाखा घेऊन ठेव तिसऱ्या प्रहरच्या फराळासाठीं अन् मग हवा तसा रड ! ( थप्पड मारावयास जातो. )

**विक्रांत**–( सूं. वाऱ्या ठोकतो. )

**प्रतोद**–हट् लेका भागुबाई !

[ पडदा पडतो.

## प्रवेश पांचवा

**स्थळ**–विक्रांताच्या घराची ओटी. **पात्रें**–विक्रांत, विक्रांताची बहीण रोहिणी, तिचा नवरा शरच्चंद्र, शेजारची वेत्रिका, विक्रांताला दाखवायसाठी आणलेली सरोजिनी, सरोजिनीच्या गळयांत तिच्या आईची गळसरी, कानांत प्रमद्वरेच्या मोठाल्या बुगड्या, डोळयांत फारच काजळ. ]

**वेत्रिका**–अग सरे, अशी गुडघ्यांत मान काय घालतेस ? अंमळ वर बघ तरी ! तो बघ–समोर होता कोनाडा–त्याच्याकडे बघ.

**रोहिणी**–अरे विकू, तूं तरी असा इकडे तिकडे काय बघतोस ? सरी–कडे पाहा एकदां ! आज ती तुला दाखवायला आणली आहे.

**शरच्चंद्र**–हं, विक्रांत, सांग लवकर, पसंत आहे ना तुला ही मुलगी ?

( एकदम माजघरांतून विक्रांताचा बाप येतो. )

**विक्रांताचा बाप**–अग रोहिणी, हा काय पोरखेळ मांडला आहे नसता ? लग्नाआधीं मुलानें मुलगी बघितल्याचें बघितलें आहे का अजून कुणी ? शरोबा, असलें भलतेंच केलें तर जनरीत सुटेल ना ?

**शरच्चंद्र**–नाहीं, म्हटलें आपलें अलीकडच्या रीतीप्रमाणें मुलानें मुलगी बघून पसंत केली म्हणजे जरा–

**विक्रांताचा बाप**–अहो, म्हणजे जरा काय ? लग्नाच्या गोष्टी पोरासोरीं का ठरवायच्या आहेत ? अहो, मी त्याचा बाप ना ? प्रत्यक्ष मी पसंत केली ना मुलगी–मग याचा बाप पसंत करील मुलगी ! अन् ए हणगोबा, तुला तरी असा जेठा मारून बसायला लाज नाहीं रे वाटली ? ऊठ.

[ सर्व जाऊं लागतात. आधीं विक्रांताचा चेहरा व मग पडदा पडतो ]

### प्रवेश सहावा

[ **स्थळ**– लग्नमंडप. **पात्रें**–अशावेळीं साधारणपणें लागण्याइतकी. ]

**भिक्षुक**– तदेव लग्नं सुदिनं तदेव ताराबलं चंद्रबलं तदेव !...शुभलग्न सावधान !

[ मंडळी अंदाजानें अक्षता उधळतात, भिक्षुक अंतरपाट काढून घेतात शरचंद्र विक्रांताची मानगूट वांकवितो. प्रमद्वरा सरोजिनीला उचलते. सरोजिनी विक्रांताच्या डोक्यावर माळ टाकिते. ]

**बरेचण** –(आवेशानें व कोल्हेकुईनें) अरे, वाजवा रे (पडदा पडतो.

### अंक पहिला समाप्त

---

# अंक दुसरा

### प्रवेश पहिला

[**स्थळ**–सरकारी मराठी शाळा. **पात्रें**—दिपोटी, जरा बाजूस हेड–मास्तर, त्यांच्या मागें उत्कंठित असा विक्रांताचा बाप. मुलांची परीक्षा चालली आहे, विक्रांत दिपोटीच्या पुढें उभा आहे.]

**दिपोटी**– वांदिवाशची लढाई कधी झाली ?

**विक्रांत**– (बुचकळ्यांत पडतो.)

**दिपोटी**– काळीचा वसूल करण्याची अकबराची रीत काय होती?

**विक्रांत**– (काळा पडतो.)

**दिपोटी**– छट्टू कधीं मेला ?

**विक्रांत**– (त्याला मेल्यापरीस मेल्यासारखें होतें.)

**दिपोटी**-- पेशवाई बुडाविल्याचें खापर कोणाच्या माथीं फुटतें ?
**विक्रांत**- ( डोकें खाजवितो. )
**दिपोटी**-- पिवळा समुद्र कोठें आहे ?
**विक्रांत**-- (त्या समुद्रांत बुडाल्याप्रमाणें गुदमरतो.)
**दिपोटी**-- पाणलोट कशाला म्हणतात ?
**विक्रांत**-(डोळ्यांतून घळघळां पाण्याचे लोट वाहूं लागतात.)
**दिपोटी**-- ( कांहीं लिहीत ) आपल्या जागेवर जाऊन बसा.
**विक्रांत**-- (मटकन् खालीं बसतो.)
**विक्रांताचा बाप**-- ( हेडमास्तरांस एकीकडे ) काय झालें ?
**हेडमास्तर**-- ( हळूंच ) नापास !
**विक्रांताचा बाप**-- हत् दळभद्र्या ! [पडदा पडतो.

## प्रवेश दुसरा

[**स्थळ**--मामलेदार कचेरी. **पात्रें**-गादीवर ऐसपैस हातपाय पसरून पडलेले अजम रावसाहेब मामलेदार. हात जोडून उभा असलेला विक्रांताचा बाप; जवळच हातपाय गळून गेले आहेत ज्याचे, असा विक्रांत-उमर वर्षें २० ]

**विक्रांताचा बाप**—परीक्षा वगैरे कांहीं नाहीं साहेब; पण—

**मामलेदार**-मग इथें काय बळी द्यायाचा आहे ? जा, पोसवत नसला तर पांजरपोळांत नेऊन घाला !

**विक्रांताचा बाप**—रावसाहेबांनीं थोडी दया केली तर होण्यासारखें आहे ! कुठें उमेदवारींत चिकटवून दिला—

**मामलेदार**—कशानें चिकटवून देऊं ? गोंदानें का सरसानें ? अरे, तुम्हां लोकांना नोकरी म्हणजे का परड्यांतली भाजीबिजी वाटते कीं काय !

**विक्रांताचा बाप**—रावसाहेबांची आम्हांस मोठी आशा आहे; बापूसाहेबांनीं हें पत्र दिलें आहे आपल्याजवळ द्यायला ! (एक पत्र देतो.)

**मामलेदार**—(पत्र वाचतांच त्यांचा चेहरा निवळत जातो.)

**विक्रांताचा बाप**—(आशेनें त्यांच्याकडे पाहातो; त्यांच्या चेहऱ्याशीं याच्या चेहऱ्याचें उमत जमत जातें.)

**मामलेदार**—अरे, मग हें आधीं कां नाहीं दाखविलेंस पत्र? ठीक आहे. उद्यांपासून बारनिशीकडे लावतों याला.

**विक्रांताचा बाप**—(आनंदानें मामलेदारांचे पाय धरतो.) [पडदा पडतो.

## प्रवेश तिसरा

[**स्थळ**-विक्रांताचें घर. **पात्रें**-विक्रांत-उमर वर्षें ४०. कचेरींतील काम घरीं करण्यासाठीं आणलेलें पाहात बसला आहे. त्याच्या बायकोला वेळोवेळीं मिळालेला संततिविषयक आशीर्वाद संख्येच्या दृष्टीनें सफळ झालेला आहे. त्या आठ पोरांची मधून मधून आवकजावक.]

**विक्रांत**—(पुढें पडलेल्या कागदांकडे पाहात आहे.)

**पोर नं. ३**–बाबा, मला भूगोलपत्रक आणायचें आहे!

**पोर नं. २**– मला एक कचकडयाची फणी पाहिजे.

**पोर नं. १**– माझीं धोतरें फाटलीं आहेत.

**पोर नं. १ ते ८**—(आलटून पालटून राष्ट्रीय सभेच्या एका वर्षाच्या ठरावाइतक्या मागण्या पुढें करितात.)

**विक्रांत**-( सरकारप्रमाणें तटस्थ असतो.)

**सरोजिनी**-(स्वराज्याच्या मागणीपेक्षांहि जरा जोराच्या निकडीनें) आज तांदूळ नाहींत, संध्याकाळला.

**विक्रांत**-(पार्लमेंटपेक्षांहि शांतवृत्तीनें मूग गिळून बसतो.)

[पडदा पडतो]

## प्रवेश चवथा

[**स्थळ**-कचेरी. **पात्रें**-अजम रावसाहेब मामलेदार आणि विक्रांत.]

**मामलेदार**-इतकीं वर्षे काम करीत आहां तरी ही अशी चूक अजून होतेच आहे तुमच्या हातून. काय म्हणावें तुम्हांला ?

**विक्रांत**-(मुंडी खालीं घालतो.)

**मामलेदार**- अहो, ही चूक म्हणजे काय समजतां तुम्ही? हिचा परिणाम काय होतो माहीत आहे का ?

**विक्रांत**—(भेदरतो)

**मामलेदार**-फार फार मोटी गंभीर चूक आहे ही !

**विक्रांत**-(सर्द होतो. )

**मामलेदार**-केवढा दंड होतो अशा गाढवपणानें ठाऊक आहे ?

**विक्रांत**-(सर्दी वाढते.)

**मामलेदार**-एक महिन्याचा पगार दंड होतो खाड्दिशी !

**विक्रांत**-(सर्दीची जोराची वाट.)

**मामलेदार**-शिवाय, खटलासुद्धां करतां येतो अशानें,

**विक्रांत**-(गोठूं लागतो.)

**मामलेदार**-अहो, आहांत कुठें ? वर्ष दीड वर्षाची ठेप व्हायची ना एकादे वेळीं !

**विक्रांत**-(आइस्क्रीम होतो.)

**मामलेदार**-आतां आम्हीच आहों म्हणून बरें आहे.

**विक्रांत**-बर्फाचें पुन्हां रक्तमांस होऊं लागतें.)

**मामलेदार**-जा, पुन्हां काळजीनें लिहून आणा तें सगळें !

**विक्रांत**-(पहिल्यासारखा शाबूत.)

**मामलेदार**-(कागदांचें बिंडोळें टाकतात, विक्रांत तें उचलूं लागतो.)

[पडदा पडतो.]

## अंक दुसरा समाप्त

# अंक तिसरा

## प्रवेश पहिला

(**स्थळ** कचेरी. **पात्रें**-विक्रांत उमर व य वर्षे ५० इतर कारकून कामांत)

**विक्रांत** – ( पेन्शनींत येतो. )

( विक्रांत पेन्शनचा हुकूम घेऊन जातो. पडदा पडतो.

## प्रवेश दुसरा

( **स्थळ** – विक्रांताचें घर, **पात्रें** – आजारी पडलेला विक्रांत – उमर वर्षे ५५ भोंवताली आप्तइष्ट मंडळी, वैद्य. )

**आप्त** - ( दुसऱ्यास हळूंच ) आतां आशा दिसत नाहीं, कांहीं सांगावयाचें आहे का विचारावें आतां !

**२ आप्त** - विचारतों बरें मीच. ( उठूं लागतो. )

**वैद्य** - ( अगदीं हळू पण जरा दटावून ) अहो, आतां काय विचारतां ? वाचा बंद पडलीसुद्धां !

**३ आप्त** – ( ह्याच्या नाकाशीं धरलेलें सूत काढून अर्थपूर्ण नजरेनें इतरांकडे पाहतो, सुस्कारा टाकतो व जरा डावीकडे मान चढवून च्यूण करतो. बायकांत एकदम रडारड, पुरुष मंडळी त्या मुड्यापेक्षांहि गंभीर. )

( पडदा पडतो.

## प्रवेश तिसरा

(**स्थळ** - मसणवटी. **पात्रें** - ताटी वर करून उचलून सरणावर घातलेला विक्रांत, इतर मंडळी सरण पेटवितात. )

**मंडळी नं. १** - चला झालें ! संपला त्यांचा आपला ऋणानुबंध !

**मंडळी नं. २** - एक चांगला मनुष्य गेला ! कोणाच्या अध्यांत ना मध्यांत ! कधीं खटखट नाहीं कीं कधीं टकटक नाहीं ! उभ्या जन्मांत याच्या हातून चारचौघांनीं नांवें ठेवण्यासारखें कांहीं झालें नाहीं तेवढ्या आठ मुलांखेरीज. ( चित्ता धडकते. तिच्या जाळानें पेटून पडदा जळतो. )

## खेळ खलास !

# यमुनाराणी

लेखक:—आचार्य दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर

हिमालय म्हणजे साक्षात् भव्यपणा ! सर्वत्र भव्यपणाचें प्रदर्शन करून भव्यतेची भव्यता कमी करणें हाच जणूं त्याचा व्यवसाय आहे. तरी सुद्धां अशा हिमालयांत एक स्थळ असें आहे की, ज्याची ऊर्जस्विता हिमालयांत वास करणाऱ्यांच्या सुद्धां डोळयांत भरते. तें स्थळ म्हणजे यमराजाच्या भगिनीचें उगमस्थान होय. उंचीवरून बर्फ वितळून मोठा धबधबा खालीं पडत आहे. आसमंतात् गगनचुंबी नव्हे, तर गगनभेदी जरठ महावृक्ष आडवे पडून कुजत आहेत; उत्तुंग पहाड यमदूतांप्रमाणें रक्षण करण्यास उभे आहेत घटकेंत पाणी थिजून त्याचें बर्फ होतें आणि घटकेत बर्फ वितळून त्याचें बर्फाइतकेंच थंड पाणी होतें. अशा ठिकाणीं भुईतून विलक्षण रीतीनें उकळणारें पाणी उसळून वर येत असतें. बाष्पयंत्रांतून क्रुद्ध झालेली वाफ बाहेर पडत असतांना व्हावा तसा शब्द भुईतून निघतो आणि झऱ्यांतून पुरुषभर उंच उडणारे मोठमोठे तुषार अशा थंडीतसुद्धा माणसाला भाजून काढतात ! अशा चमत्कृतिजनक ठिकाणीं असित ऋषीनें यमुनेचें मूळ शोधून काढिलें. या स्थळीं प्रवाहांत स्नान करणें अशक्यप्राय आहे. गार पाण्यानें आंघोळ करावी तर सदैवच गार होऊन जाणार आणि ऊन पाण्यांत आंघोळ करावी तर तेथेंच बटाट्याप्रमाणें उकडलें जाण्याचा संभव ! एवढ्याचसाठीं तेथें मिश्र पाण्याची कुंडे तयार केली आहेत. एका झऱ्यावर एक गुंफा आहे. तींत लाकडांच्या फळया टाकून झोपतां येतें. मात्र रात्रभर मधून मधून कूस बदलेली पाहिजे. कारण, वरची थंडी व खालची उष्णता दोनहि असह्य !

दोघी बहिणींत गंगेपेक्षां यमुना मोठी आहे, प्रौढ व गंभीर आहे. कृष्णभगिनी द्रौपदीप्रमाणें ती सांवळी, तशीच मानिनी आहे. गंगा जणूं काय बिचारी मुग्ध शकुंतलाच ! पण देवाधिदेव महादेवांनी तिचा स्वीकार केला म्हणून यमुनेनें आपले वडीलपण सोडून गंगेलाच ज्येष्ठत्व दिलें. या दोघी

बहिणी एकमेकींना भेटावयास आतुर झालल्या असतात. हिमालयात तर एके स्थळीं त्या फार जवळ येतात. पण मत्सरी दंडालपर्वत विघ्नसंतोष्यासारखा मध्येंच आडवा येऊन पडल्यामुळें त्यांचें तेथें मीलन होत नाहीं. एक सहृदय ऋषि यमुनाकांठीं राहत असे आणि प्रत्यहीं गंगास्नानास जात असे; पण जेवीत होता पुनः यमुनेच्याच घरीं येऊन! तो म्हातारा झाला (ऋषिसुद्धां शेवटीं म्हातारे होतात!) तेव्हां त्याच्या थकलेल्या पायांची कींव करून गंगेनें आपला प्रतिनिधि म्हणून एक लहानसा झरा यमुनाकांठीं पाठवून दिला. आजहि हा चिमुकला धवल प्रवाह या ऋषीचें स्मरण करीत वाहत आहे.

डेहराडूनजवळ आपणाला पुनः आशा वाटते कीं, या दोन नद्या एकमेकीस मिळतील. पण नाहीं. आपल्या शैत्यपावनत्वानें अखिल अंतर्वेदीचा प्रदेश पुनीत करण्याचें कर्तव्य पार पडण्यापूर्वी त्यांना एकमेकींना भेटून रिकामपणच्या गुजगोष्टी करण्याचें सुचावेंच कसें? गंगा ही उत्तरकाशी, टेहरी, श्रीनगर, हरद्वार, कनोज, ब्रह्मावर्त, कानपूर इत्यादि जुन्या व इतिहासप्रसिद्ध स्थळांना स्तन्यदान करीत धांवत असेल, तर यमुना कुरुक्षेत्राला व पानिपतच्या हिंसक भूप्रदेशाला न्याहाळीत भारत वर्षाच्या राजधानीजवळ येऊन पोंचते. यमुनेच्या पाण्यांत साम्राज्याची शक्ति असली पाहिजे. तिच्या स्मरणसंग्रहालयांत पांडवांपासून मोंगल साम्राज्यापर्यंतचा आणि बंडाच्या काळापासून ते स्वामी श्रद्धानंदजीच्या हत्येपर्यंतचा सारा इतिहास भरलेला आहे. दिल्लीपासून आग्र्यापर्यंत बाबरचे वंशजच आपल्याबरोबर वार्तालाप करूं इच्छितात असें वाटतें. दोन्ही नगरांचे किल्ले साम्राज्याच्या रक्षणासाठी नव्हे, तर यमुनेची शोभा पाहाण्यासाठींच बांधिले असावे असें भासतें. मोंगल साम्राज्याचे नगारे आतां शांत झाले आहेत, पण मथुरा–वृंदावनांतील मुरली अद्यापि वाजत आहे! मथुरा–वृन्दावनाची शोभा कांही वेगळीच आहे. हा प्रदेश जितका रमणीय तितकाच समृद्ध आहे. हरियाणी प्रदेशांतिल गाई आपल्या गोड, सकस दुधाविषियी हिंदुस्थानांत विख्यात आहेत. यशोदामाता किंवा गोपराज नंद यानें हें स्थळ पसंत केलें होते, ही गोष्ट जणूं काय येथली भूमि विसरूंच शकत नाहीं. मथुरा–वृन्दावन म्हणजे बालकृष्णाची क्रीडाभूमि, वीरकृष्णाची विक्रमभूमि. एक द्वारकावास सोडून दिला तर श्रीकृष्णाच्या जीवनाशीं

जास्तींत जास्त कालिंदीनेंच सहकार केला आहे. ज्या यमुनेनें कालियामर्दन पाहिलें त्याच यमुनेनें कंसाचा शिरच्छेद बघितला. ज्या यमुनेनें हस्तिनापुराच्या राजसभेंत श्रीकृष्णाची शिष्टाई ऐकिली त्याच यमुनेनें युद्धकुशल श्रीकृष्णाची योगमूर्ति कुरुक्षेत्रावर संचार करीत असतां पाहिली. ज्या यमुनेनें बृन्दावनाच्या प्रणयरासरीशीं आपला कलंक मिळविला. त्याच यमुनेनें कुरुक्षेत्रावर रोमहर्षण गितावाणीला पडसाद दिला. यमराजाच्या भगिनीचें बंधुत्व श्रीकृष्णालाच शोभेंत.

भारतवर्षांतील क्षत्रिय कुलांचा संहार अनेक वेळां जिनें पाहिला त्या यमुनेला पारिजातकाच्या फुलाप्रमाणें सुकुमार अशा ताजबीबीचा मृत्यु कितीसा मर्मभेदक वाटणार ! तरीसुद्धां प्रेमसम्राट् शहाजहांच्या थिजलेल्या अश्रूंना प्रतिबिंबित करण्याचें कार्य तिनें स्वीकारलें आहे.

भारतकाळीं विख्यात झालेल्या वैदिक नदी चर्मण्वतीचा करभार घेऊन यमुना पुढें चालूं लागते तोंच मध्ययुगीन इतिहासाचें ओझरतें दर्शन देत चिमुकली सिंधू नदी येऊन पुढें उभी राहते.

येथून यमुना उतावीळ झाली आहे. कितीतरी दिवस झाले, गंगाताईचें दर्शन नाहीं. सांठत गेलेल्या गोष्टी आतां पोटांत मावत नाहींत. विचारावयाचे प्रश्न कितीतरी सांचून राहिले आहेत. कानपूर आणि काल्पी फारशीं दूर नाहींत येथें गंगेची वार्ता कानीं पडली, या आनंदांतच खडीसाखरेचा खडा तोंडांत टाकून यमुना जी धांवत सुटली ती प्रयागराज येथें एकदम गंगेच्या गळयांत जाऊन पडली. काय दोघींचा उन्माद ! भेटल्या तरी आपण भेटलों हें त्यांना जणूं खरेंच वाटेना. भारतवर्षांतील एकूणएक साधुसंत हा प्रेमसंगम पाहण्यास गोळा झाले आहेत; पण त्या बहिणींना त्याचें भानच नाहीं ! अंगणांत अक्षय-वट उभा आहे त्याची त्यांना क्षिती नाहीं. वृद्ध अकबर, छावणी ठोकून पडला आहे त्याला विचारतो कोण ? आणि अशोकाचा शिलास्तंभ तेथें आणून उभा केलांत तरी या बहिणी थोडयाच त्याच्याकडे दृष्टिक्षेप करणार आहेत ?

प्रेमाचा प्रवाह अखंड वाहतच असतो; आणि त्याचबरोबर कविसम्राट् कालिदासाची सरस्वती अखंड स्रवत असते !

“ क्वचित्प्रभालेपिभिरिन्द्रनीलैर्मुक्तामयी यष्टिरिवानुविद्धा ।
अन्यत्र माला सितपंकजानामिन्दीवरैरुत्खचितान्तरेव ॥
क्वचित्खगानां प्रियमानसानां कादंबसंसर्गवतीव पंक्तिः ।
अन्यत्र कालागरुदत्तपत्रा भक्तिर्भुवश्चन्दनकल्पितेव ॥
क्वचित्प्रभा चान्द्रमसी तमोभिश्छायाविलीनैः शबलीकृतेव ।
अन्यत्र शुभ्रा शरदभ्रलेखा रन्ध्रेष्विवालक्ष्यनभःप्रदेशा ॥
क्वचिच्च कृष्णोरगभूषणेव भस्मांगरागा तनुरीश्वरस्य ।
पश्यानवद्यांगि विभाति गंगा भिन्नप्रवाहा यमुनातरंगैः ॥ ”

अर्थः “ हे निर्दोषतनु सीते ! या गंगेच्या प्रवाहांत यमुनेचे तरंग घुसून त्यांला खंडित करीत आहेत, तें कसें दिसतें पाहा ! कोठें असें भासतें कीं, जणूं मोत्यांच्या माळेंत ओवलेलें इंद्रनीलमणि त्यांच्या प्रभेला निस्तेज करून टाकीत आहेत. कोठें असें वाटतें कीं, जणूं श्वेतकमलांच्या हारांत नीलकमलें गुंफिलीं आहेत. कोठें मानससरोवराकडे जाणाऱ्या शुभ्र हंसाबरोबर काळे कादंब पक्षी उडत आहेतसे वाटतें, तर कोठें शुभ्र चंदनानें सारविलेल्या भूमीवर कृष्णागरूची चित्रें काढिलीं आहेत असें दिसतें कोठें असें वाटतें कीं, चंद्राच्या प्रभेबरोबर छायेंत झोंपलेल्या अंधःकाराची क्रीडा चालली आहे, आणि कोठें जणूं शरदृतूंतील शुभ्र मेघाच्या पाठीमागून आकाश थोडथोडें दिसत आहे. आणि कोठें असें दिसतें कीं जणूं काय महादेवाच्या भस्मचर्चित देहावर कृष्णसर्पाचीं आभूषणें धारण केलीं गेलीं आहेत. ”

किती सुंदर देखावा ! वर पुष्पक विमानांत मेघश्याम रामचंद्र आणि धवलशीला जानकी चौदा वर्षांच्या वियोगानंतर आयोध्येंत पोहोंचण्यास आतुर झालीं आहेत; आणि खालीं इन्दीवरश्यामा कालिन्दी व सुधाजला जान्हवी एकमेकींचा परिरंभ न मोडता नामरूपांचा त्याग करून सागरांत विलीन होण्यास धांवत आहेत ! हें दृश्य पाहून स्वर्गांतून पुष्पवृष्टी झाली असेल आणि भूतलावर कवींच्या प्रतिभासृष्टीची कारंजीं उडालीं असतील !

# प्रतिभा–साधन

**ना. सी. फडके**

प्रतिभा–साधन ? किती विचित्र कल्पना ही ? 'वदतो व्याघात' चें याहून ढळढळीत उदाहरण शोधूं गेल्यास तरी सांपडेल काय ? इतक्या विसंवादी शब्दांचा समास कोणीं केला असेल काय ? प्रतिभा–साधन ! सशाच्या शिंगाची कल्पना देखील याच्यापुढें कमी विसंगत ठरेल ! प्रतिभा साधन शक्य असेल तर मग चंद्रकिरणांपासून उष्णता उत्पन्न करण्याची कल्पना कां काढूं नये, किंवा उकळत्या ज्वालामुखीच्या शीतलतेचें वर्णन कां करूं नये ? 'प्रतिभा' म्हणजे काय एखादी सामान्य शक्ति आहे, कीं ती अभ्यासानें किंवा काबाडकष्टानें साध्य होईल !......प्रस्तुत विषयांचें नांव ऐकतांच अशा प्रकारचे उद्गार कोणाच्या तोंडून निघाले तर त्यांत आश्चर्य नाहीं. एका अर्थी प्रतिभा खरोखरच साधनांच्या पलीकडची आहे.

प्रतिभा म्हणजे काय ? प्रतिभा म्हणजे कल्पनाशक्ति म्हणतां येईल काय ? खचित नव्हे. कल्पना ही कितीही झालें तरी मनाच्या सामान्य शक्तींपैकीं एक होय. मनाला स्वैर सोडलें कीं कोणत्याहि माणसाला वाटेल तितक्या कल्पना करतां येतील. आपण नंदनवनांतल्या फळांचें सेवन करीत आहोंत, किंवा आपण एखाद्या सुवर्णमंदिरांत राहात आहोंत, किंवा जातिपुष्पांच्या शय्येवर आपण निजलों आहोंत, अशी हवी तशी कल्पना चालवितां येईल. पण या कल्पना–संचाराला प्रतिभाविलास म्हणतां येईल काय ? किंवा जी कल्पनाशक्ति प्रत्येक मनुष्यमात्राला आहे तिलाच शंभर पटीनें गुणलें कीं कलाविदग्धाची प्रतिभा होते असें तरी समजतां येईल काय ? छे ! तसेंहि नाहीं आणि असेंहि नाहीं. शामभटाच्या तट्टाणीला कितीहि शृंगार साज चढविले तरी इंद्राच्या ऐरावताचें पद तिला प्राप्त होणें शक्य नाहीं; किंवा सरबताची गोडी कितीहि पटींनीं वाढली असें समजलें तरी त्यावरून अमृताची गोडी पटणें शक्य नाहीं. अमृत तें अमृत आणि तद्वतच प्रतिभा ती प्रतिभा.

समजा, भयंकर वादळांत आपण सांपडलों आहोंत. वारा इतका सोसा-ट्याचा सुटला आहे, कीं जणुं साऱ्या सृष्टीची वावडी करावयाची त्याला लहर आली आहे. वाऱ्याच्या हातांत हालणाऱ्या खुळखुळ्यासारखी मोठ मोठ्या प्रचण्ड वृक्षांची अवस्था झाली आहे, धुळीचे लोटच्या लोट उठून दशदिशा धुंद झाल्या आहेत, पक्षी नुसत्या भयानें निश्चेष्ट होऊन घरट्यांतून गळून पडत आहेत, कृष्णमेघांची आकाशांत अशी दाटी झाली आहे कीं सूर्याला जणुं खग्रास ग्रहण लागलें आहे, आणि त्या मेघांचा असा कांहीं गंभीर खोल गडगडाट चालला आहे कीं जणुं विनाशक शक्ति सृष्टिसंहाराचा अपशकुनी इषाराच देत आहेत! अशा प्रसंगीं तो गडगडाट बंद होऊन एकाएकीं हजारों बंदुका एकदम डागल्यासारख्या 'काड् कडाड् कडाड् काड्' असा कानठळ्या बसण्यासारखा आवाज व्हावा आणि मेघमालेंतून एक दीप्तिमय तेजाचा लोळ खालीं उतरून व क्षणार्धपर्यंत साऱ्या सृष्टीवर प्रभा फांकून जमीनींत गडप व्हावा......

घरीं गेल्यावर जर आपण सांगूं लागलों, कीं आम्हीं विद्युल्लता पाहिली व ती कशी होती याची लोकांना नक्की कल्पना द्यावयाची झाली तर आपण, काय करूं? असेंच म्हणू कीं त्या सौदामिनीची कल्पना करून देणें शक्य नाहीं. यावर समजा कोणीं विचारलें, ही आपल्या घरांत रोषनाईसाठीं जी वीज आणलेली आहे तशीच ती वीज होती काय? तर आपण काय उत्तर देऊं? हेंच कीं छे, छे! ही वीज आणि ती विद्युल्लता! ही आणि ती एक नव्हे; आणि ही कितीहि पटीनीं वाढविली तरी हिला तिचें स्वरूप येणें शक्य नाहीं. तिच्यांत एक विलक्षण दिव्यत्व आहे!

दिव्यत्व! हेंच प्रतिभेचें वैशिष्ट्य होय. ज्या ज्या वस्तूला किंवा विषयाला प्रतिभेचा स्पर्श होतो त्या त्या विषयाला 'दिव्यत्वा'चा उजळा मिळतो, व त्या वस्तूचें किंवा विषयाचें अवलोकन करणाराला त्याचा प्रत्यय येऊन एक अनिर्वचनीय आनंद होतो. हा अनिर्वचनीय आनंद निर्माण करणें हेंच सर्व कलेचें उद्दिष्ट कार्य असल्यामुळें कलाचतुराच्या ठिकाणीं प्रतिभा असणें अत्यवश्य आहे. संगीत, नृत्य, चित्रलेखन याप्रमाणेंच ललितवाङ्मय हा एक कलाप्रकार आहे. अर्थात् ललितवाङ्मयलेखकाच्या अंगीं प्रतिभा असल्या-

शिवाय चालणार नाहीं. पण ही प्रतिभा म्हणजे जर कांही एक दिव्यशक्ति असेल, तर ती साध्य करून घेण्याची येथें आरंभलेली चर्चा निष्कारण नव्हे काय ? प्रतिभा ही जर नैसर्गिक देणगी असेल तर ज्यांना ती दुर्दैवानें मिळाली नाहीं त्यांनीं खेद करीत स्वस्थ बसावें, दुसरें काय ? निसर्गानें ज्यांना सौंदर्याची देणगी दिली नाही तीं माणसें नाहीं निराशेचे सुस्कारे सोडून आपला वाटा मुकांटयानें पत्करीत ?

या म्हणण्यांत पुष्कळ तथ्यांश आहे. पण दोन गोष्टी आपण विसरतां कामा नये.

पहिली गोष्ट ही, कीं प्रतिभा ही जरी ज्याला लाभायची त्याला जन्मतःच लाभणारी शक्ति असली तरी तिचेंहि संस्करण म्हणून कांहीं तरी आहेच. मधुर आवाजाची देणगी जन्मतः मिळाली तरी त्या आवाजावरहि सतत उद्योगाचा व पद्धतशीर अध्ययनाचा संस्कार झाल्याविना अलौकिक गायक तयार होत नाहीं. नुसत्या कष्टाच्या योगानें कलावंत निर्माण होत नाहीं हें प्रतिपादण्याच्या भरांत उद्योगाचें व मेहनतीचें महत्व आजिबात विसरण्याची चूक आपल्या हातून होतां कामा नये. कोळशावर कितीही संस्कार केले तरी त्याचा हिरा होणार नाहीं, परंतु मी खाणींतून निघाल्याबरोबर सरळ लोकांच्यों अंगावर अलंकार म्हणून जाऊन बसेन असें हिरा मानूं लागला तर तें कितीस बरोबर ठरेल ? तद्वत् प्रतिभा जन्मसिद्ध खरी; पण तिचेंहि तेज फांकायला तिला परिश्रमपूर्वक पैलू पाडण्याचें काम झालेंच पाहिजे. इतकेंच काय, याबद्दल आधिक खोल विचार करूं लागल्यास आपल्या निदर्शनास असेंहि येईल कीं, वास्तविक प्रतिभेचें पूर्ण उत्कट स्वरूप प्रगट व्हावयास आपण सामान्यतः समजतों त्यापेक्षां किती तरी पटीनी अधिक परिश्रमांची कानस तिच्यावर घांसलीं जावी लागते. स्फूर्ति स्फूर्ति म्हणून जिला आपण म्हणतों तिच्यांत दहा टक्के निसर्गदत्त देणगीचे, तर नव्वद टक्के निढळाच्या घामाचें असतात असें एका ग्रंथकारानें म्हटलें आहे. हें जर खरें असेल, तर प्रतिभेचें संस्करण या अर्थी प्रतिभा-साधन हा विचार करण्यासारखा विषय ठरत नाहीं काय ?

याखेरीज दुसराहि एक विचार कांहीं कमी महत्वाचा नाहीं. प्रतिभेवाचून कलावस्तूंत जिवंतपणा येणार नाहीं, आणि ही प्रतिभा निसर्गदत्त

देणगी आहे, या दोन्हीहि गोष्टी कबूल. पण याचा अर्थ ज्यांच्यावर निसर्गाचा प्रसाद झाला नाहीं त्यांनीं कलेची उपासना करूंच नये असा थोडाच होतो? हजारो तंतकारांत एकच प्रतिभाशाली तंतकार होऊन जातो. पण प्रतिभेचा दिव्यांश वगळल्यास जी कांहीं कलेची मांडणूक करणें शक्य आहे ती त्यांतल्या त्यांत अलौकिकपणें करणारे इतर दहा पांच नामदार तंतकार असतातच कीं नाहीं? आणि प्रतिभासंपन्नाच्या हातून जें स्वरलालित्य सहज खेळतां खेळतां निघेल त्याची वेडी वांकडी नक्कल कां होईना, पण या दहा पांचांच्या हातून अभ्यासाचें व उद्योगाचें फळ म्हणून तरी निघेलच कीं नाहीं? तद्वत् प्रतिभासंपन्न लेखक सहज लीलेनें जें वाङ्मयसौंदर्य निर्माण करील त्याची थोडी फार छटा तरी सामान्य लेखकाच्या लेखनांत परिश्रमानंतर दिसणें शक्य आहे असें कां मानूं नये?

हेंहि मान्य करावयाचें नसलें तरीहि आणखी एक गोष्ट लक्षांत बाळगिली पाहिजे. ती ही कीं प्रतिभासंपन्न माणसाला जे साधेल ते इतरांना साधणार नाहीं हें खरें असलें तरी तो जी कलाकृति निर्माण करील तिच्यांतील सौंदर्याचें आकलन करण्याची व तो आनंद जाणतेपणानें उपभोगण्याची महत्वाकांक्षा तर इतरांनीं बाळगायला प्रत्यवाय नाहीं? आणि ही महत्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठीं त्या त्या कलेच्या अंगोपांगाचा अभ्यासच माणसानें करावयास पाहिजे सुंदर गायन कंठांतून काढणें तर कठीण आहेच, आणि हजारों श्रोत्यांचीं अंतःकरणें आपल्या हातीं घेऊन त्याच्यासकट नाद ब्रह्माच्या हिंदोळ्यावर उन्मत झोकें घेण्यास गायक प्रतिभाविलासावांचून होत नाहीं हें तर खचितच; पण अशा गायकाला वाहवा देण्याइतका मार्मिकपणा अंगीं यावयासहि दीर्घ साधना करावी लागते आणि या अर्थी इतर कलाप्रमाणें ललितवाङ्मयाच्या क्षेत्रांतहि प्रतिभा-साधन म्हणून चर्चेचा विषय संभावतोच कीं नाहीं! सरस्वतीच्या खास गाभाऱ्यांत बसून तिच्या मस्तकावर दिव्य गंधाचीं फुलें वाहण्याचा मान प्रतिभा संपन्न सारस्वतांकरितां राखून ठेवला असेल; पण हे प्रतिभासंपन्न सारस्वत पूजा कशी बांधतात तें पाहून त्यांतील आनंदाचें सेवन करावयाला निदान सरस्वतिमंदिराच्या सभामंडपांत तर उभे रहायला मिळाले पाहिजे आणि तें मिळायला अंगीं काय कमी शुचित्व आणावें लागतें? किंबहुना गाभाऱ्यांत घुसायची गर्दी करावी. तेव्हां कुठें सरस्वति मंदिराचे रक्षक निदान

सभा मंडपांत उभे राहूं देतील ! स्वतः आ करून गायलें असलें तरच मार्मिक श्रोता होतां येतें. स्वतः हातीं कुंचला घेऊन छायाप्रकाशांची जादू करून पाहिली असली तरच प्रतिभावान् चित्रकाराच्या कृतीचा खरा आनंद घेतां येतो. तद्वतच स्वतः लिहिण्याचे परिश्रम केलें असले तरच ललितलेखनांतील सौंदर्यस्थळें दिसतात आणि प्रतिभेच्या विलासानें ठिकठिकाणीं उसळलेला रस अनुभवितां येतो. "नवनवोन्मेषशालिनी" असें प्रतिभेचें लक्षण केलेलें आढळतें पण क्षणाक्षणाल नवीनच तेजःपुंज सौंदर्य दाखविणाऱ्या, प्रतिभेच्या त्या मनोहर विलासाचे कौतुक करणारा कोणी तरी पाहिजेच कीं कलाचतुर जगाच्या स्तुतिनिंदेची पर्वा करित नाही हें खरें; पण मोत्याच्या चाऱ्यावर हंस जगतो याप्रमाणें रसिकानें केलेल्या कौतुकावरचे तो आपल्या धुंदींत असतो व माझ्या कृतीचें कोणी कौतुक केलें नाहीं तरी मला फिकीर नाहीं अशी दर्पोक्ति काढणारा भवभूतिदेखील " काळ अनंत आहे आणि पृथ्वी विपुल आहे' तेव्हां केव्हां तरी आणि कोठें तरी माझे कौतुक झाल्यावांचून राहणार नाहीं. अशी अपेक्षाच वास्तविक बोलून दाखवीत आहे.

सारांश, कलाचतुराच्या खालोखाल रसिकाचें महत्व आहे; आणि ज्यांना निसर्गानें प्रतिभेची देणगी दिली नाही. त्यांनीं निदान अंगीं रसिकता आणण्यासाठीं जरूर ते परिश्रम करावयास काय हरकत आहे ? "दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् !" या कर्णाच्या तेजस्वी उद्गारांची थोडीशी फिरवाफिरव करून असें कां म्हणूं नये, की प्रतिभाशक्ति दैवायत्तं असली तरी ललितवाङ्मयांतील रससेवन करण्याचा पराक्रम प्रत्येकाच्या आटोक्यांतला आहे, आणि या दृष्टिनें ललितवाङ्मयाची थोरवी कां मानावयाची, त्या वाङ्मयाचें उद्दिष्ट कार्य काय, त्या कार्याची सिद्धता प्रतिभेवांचून कां होत नहीं प्रतिभेचें व्यापार कसे चालतात, प्रतिभेला उद्योगाची जोड कां व कशी देतां येईल, ललितलेखनांचें सामान्य नियम कोणते, इत्यादि प्रश्नांची चर्चा मनोरंजक व बोधपर होण्यासारखी नाहीं काय ?

# भाव–पुष्प

डॉ. शं. जा. पुरवार

तुझ्याशिवाय कुणाला वाहूं ही पुष्पाञ्जलि ?
हृदयाच्या मरुभूमींत तूंच तिचं बीं रुजविलंस.
अविश्रांत परिश्रम घेऊन तूंच तिचा वाफा अविरत भरलास
न कण्टाळतां तूंच अङ्कुर जोपासलास.
आणि आतां – आशा उजळल्यावर नि स्वप्नं सजीवल्याबर
तुझ्याशिवाय कुणाला वाहूं पुष्पाञ्जलि ?

\+ + + +

अङ्कुर पालवत असतां तूं हंसलास.
लता मोहरत असतां तूं आनन्दलास.
मोहर बहरत असतां तूं नाचलास.
आणि आतां –
तुझ्या दर्शनाच्या हर्षातिरेकानं बेहोष बनलेलं फूल, तुला मकरन्दाश्रूंचा अभिषेक करीत असतां, जीवन-सौरभाचा धूप पेटवून तुला ओवाळीत असतां ––
तुझ्या मङ्गल चरणांवाचून कुणाला वाहूं ही पुष्पाञ्जलि ?

# १ पुढारी कसे असावे.

**गोपाळ गणेश आगरकर (१८५६-१८९५)**

निबंधकार, सामाजिक सुधारणेचे आधुनिक काळांतील पहिले पुरस्कर्ते, बुद्धिवादी तत्त्वनिष्ठ व क्रांतिकारक लेखक, केसरी व सुधारक पत्रांचे संपादक. अतिशय प्रतिकूल परिस्थितींत यांनीं विद्यार्जन केलें. टिळक आणि चिपळूणकर यांच्याबरोबर न्यू. इंग्लिश स्कूलच्या स्थापनेंत यांनीं भाग घेतला. मराठी निबंधकारांत आगरकरांचें स्वतंत्र स्थान आहे. त्यांची विचारसरणी तर्कशुद्ध सडेतोड व पोक्त असून भाषाशैली ठसकेबाज व आवेशपूर्ण असून कल्पनेची भरारीहि जागोजाग आढळते. या गुणांमुळें त्यांच्या निबंधांत रुक्षपणा मुळींच वाटत नाहीं.

त्यांचे ग्रंथ – (१) डोंगरीच्या तुरुंगांतील आमचे १०१ दिवस.
(२) विकारविलसित नाटक ( हॅम्लेटचें रूपांतर )
(३) वाक्यमीमांसा ( व्याकरण विषयक निबंध )
(४) केसरीतील निवडक निबंध भाग १ व २.
(५) विविध विषय संग्रह ( निबंध )
(६) निबंध संग्रह ( सुधारकांतील निवडक लेख भाग १ ते ३)

" पुढारी कसे असावे ? " हा उतारा ' सुधारकांतील निवडक लेखांतून ' घेतला आहे.

लो. टिळक प्रो. जिन्सीवाले इत्यादि पुढारी सनातनी विचारसरणीच्या जनतेचें योग्य तऱ्हेनें मार्गदर्शन करीत नाहीत, त्यांची दिशाभूल करितात. तेव्हां पुढारी असावे तरी कसे असावे यासंबंधींचें विवेचन या निबंधांत आगरकरांनीं केलें आहे. सध्यांच्या काळींहि या निबंधांतील विचार आपलें मार्गदर्शन करूं शकतील.

## २ मध्यम पदलोपी समास

### अच्युत बळवंत कोल्हटकर (१८७९--१९३१)

मराठींतील चटकदार लेखनशैलीचे जनक, लोकप्रिय वर्तमानपत्रकार आणि चतुरस्त्र वाङ्मयसेवक. हे जन्मजात वृत्तपत्रकार होते असें म्हणावें लागतें. संदेशादि बारा दैनिकें, चाबुकस्वारादि दहा साप्ताहिकें आणि तीन मासिकें यांनीं संपादित केलीं. या व्यतिरिक्त नारिंगी निशाण ताई तेलीण इत्यादि दहा नाटकें, सात कादंबऱ्या आणि इतर चरित्रात्मक सात ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत.

यांचें लिखाण सुलभ, लालित्यपूर्ण आणि विरोध व उपहासानें भरलेलें आहे. बुद्धिपेक्षां भावनेला त्यांत अधिक आवाहन आहे.

'संदेश'पत्रांत वत्सला वहिनीचीं पत्रें प्रसिद्ध होत. हीं पत्रें अच्युतरावांनीं टोपण नावानें लिहिलीं आहेत. या पत्रांत तत्कालीन सामाजिक व राजकीय प्रश्नांचा परामर्श घेतला आहे. वत्सला वहिनीची गणना तत्कालीन मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रियांमध्यें होण्यासारखी आहे वत्सला वहिनीचा कल जहाल मताकडे आहे, तरी देखील आपल्या नेमस्त विचाराच्या पतीची मर्यादा सांभाळून, फार मार्मिकपणें नेमस्त पक्षांवर टीका केली आहे. या पत्रांतून निर्माण झालेलें घरगुती वातावरण, लेखनशैलींतील सहजता व स्त्रियांनाच शोभून दिसणारे उल्लेख यामुळें वत्सला वहिनी नांवाची कोणी तरी स्त्री खरोखरच असली पाहिजे असा पुष्कळांचा समज होणें साहजिक होतें.

मध्यमपदलोपी समास -- सामासिक पदांना जोडणाऱ्या मधल्या-पदाचा लोप करून जो समास केला जातो तो व्याकरणांत मध्यमपदलोपी समास या नांवानें ओळखला जातो उदा० साखरभात.

पैसाफंड-- देशी औद्योगिक कारखान्यांस प्रोत्साहन द्यावें या उद्देशानें पैसाफंड उभारून तळेगांवला कांच कारखाना काढण्यांत आला होता. या कारखान्याचे चालक अंताजी दामोदर काळे हे होते.

नेमस्त-- राजकारणांतील मवाळ पक्ष. सनदशीर चळवळीचे पुरस्कर्ते.

गरम-- जहाल राजकीय पक्षाचे.

देवधर-- गोपाळ कृष्ण देवधर (१८७१-१९३५) पुण्यांतील सेवासदन व भारत सेवक समाज या प्रमुख संस्थांचे संस्थापक व मिशनरी पद्धतीनें कार्य करणारे समाजसेवक.

पांगारकर-- लक्ष्मण रामचंद्र पांगारकर (१८७२-१९४१) मराठी भाषेंतील प्राचीन वाङ्मयाचे अभ्यासक, रसाळ लेखक व वक्ते. मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोरोपंतांचे चरित्र व काव्य विवेचन इत्यादि ग्रंथांचे लेखक.

इंदुप्रकाश-- ज्ञानप्रकाश- तत्कालीन मराठीवृत्तपत्रें, ज्ञानप्रकाश गतवर्षीपर्यंत भारत सेवक समाजातर्फे निघत असे.

गोखल्यांचं विश्रांतिगृह--त्यावेळीं मराठी वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर आढळून येणारी एक जाहिरात.

विहिरीवरचं भांडण-- अशा प्रकारच्या किरकोळ वाटणाऱ्या बातम्या तत्कालीन मराठी वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर येत.

बेटा गुलाबच्या कानगोष्टी-- या सदराखालीं संदेशामध्यें चुरचुरीत बातमीपत्रें अहवाल व सुप्रसिद्ध व्यक्तींच्या हालचाली विषयीं लेख येत.

सिल्व्हरी-- खणखणीत.

रिंग-- नादमाधुर्य.

(त्या वेळच्या सुशिक्षित लोकांना आपसांतील संभाषणांत इंग्रजी शब्द वापरणें हें विद्वत्तेचें लक्षण वाटत असें या संवयीचा उपहास करण्यासाठीं व सत्याभास निर्माण करण्यासाठीं असे शब्द या पत्रांत वापरले आहेत.)

डेमॉस्थिनीस-- (ख्रिस्तपूर्व ३८४-३२२) हा अथेन्स शहरांतील महान् मुत्सद्दी व प्रभावी वक्ता होता.

मनमोहनदास रामजी-- त्या वेळचे एक धनिक गृहस्थ.

उमळवटी आणले-- नाकीं नऊ आणले.

ॲस्क्विथ-- इंग्लंडचे पंतप्रधान.

कैझर-- पहिल्या महायुद्धाच्या वेळीं असलेला जर्मनीचा राजा.

## ३ मी कां लिहितो--

**दिवाकर कृष्ण केळकर** (जन्म १९०२)

लघुकथा लेखक आणि टीकाकार. लघुकथेला भावनाविष्काराची आवश्यकता किती असते तें यांनीं आपल्या लघुकथांनीं पटवून दिलें आहे. समाधि व इतर गोष्टी व 'रूपगार्विता व इतर गोष्टी' हे दोन लघुकथा संग्रह, 'किशोरीचें हृदय' व 'विद्या व वारुणी' या कांदबऱ्या आणि 'तोड ही माळ' हें नाटक त्यांनीं लिहिलें आहे.

औरंगाबाद नभोवाणी केंद्रावरून "मी कां लिहितो" या विषयावर अनेकांचीं भाषणें झालीं. या व्याख्यान मालेंतील दिवाकर कृष्ण केळकरांचें व्याख्यान येथें उ धृत केलें आहे.

काव्याचा हेतु वर्णन करितांना मम्मट या संस्कृत साहित्यशास्त्रज्ञानें काव्य हें कीर्तिसाठीं, पैशासाठीं, व्यवहारज्ञानासाठीं, अशुभनिवारणासाठीं, आनंदप्राप्तिसाठीं आणि उपदेशासाठीं निर्माण केलें जातें असें म्हटलें आहे, या विवेचनांत लेखकापुढें वरील काव्य हेतु आहेत असें वाटतें.

बर्नार्ड शॉ—सुप्रसिद्ध इंग्रजी नाटककार व टीका लेखक यानें अनेक नाटकें लिहिलीं आहेत.

'अविदितगतयामा' सीतेशीं संभाषण करीत असतांना रामचंद्राला आपल्या गतायुष्याची आवठण होते, (आपल्या जीवनांतील अनेक प्रसंगांचा चित्रपट समोर असल्यामुळें रामाला अनेक जुन्या गोष्टींचें स्मरण होतें) 'रात्र संपली पण आपली बोलणीं संपलीं नाहींत' अशी आठवण राम सीतेला सांगत आहे असें भवभूतीनें आपल्या उत्तर रामचरित्र या नाटकांत वर्णन केलें आहे.

———

## ४ एका नूतन अमूल्य ग्रंथावरील अभिप्राय

### पु. ल. देशपांडे

यांची लेखनशैली स्वतंत्र आहे. त्यांच्या विनोदाची धार कितीहि तीक्ष्ण असली तरी प्रतिपक्षालाहि त्यांचें लिखाण हंसविल्यावाचून राहणार नाहीं. 'खोगीरभरती' या ग्रंथांतून हा उतारा घेतला आहे.

इये ... नगरीं–ज्ञानेश्वरीच्या बाराव्या आध्यायांतील **इये मराठीचिये नगरीं ब्रह्मविद्येचा सुकाळु करीं** या ओंवीस अनुलक्षून लेखकानें हें वर्णन केलें आहे.

इसाप—इसाप हा सुप्रसिद्ध नीतिकथा लेखक होऊन गेला. तो गुलाम होता. त्याच्या कथांचें आजकालचे लेखक अनुकरण करतात. हें याठिकाणीं लेखकानें आपल्या वैशिष्टयपूर्ण शैलीनें सांगितलें आहे.

डिकन्स व थॅकरे —१९ व्या शतकांतील सुप्रसिद्ध इंग्रजी कादंबरीकार.

सोमर शेट मोघम— 'सॉमरसेट मॉम' या नांवांतील स्पेलिंगमुळें (Somerset Maugham) लेखकानें छान कोटी केली आहे.

टु बी ऑर नॉट टु बी – शेक्सपियरच्या हॅम्लेट नाटकांतील हॅम्लटच्या तोंडी घातलेलें प्रसिद्ध स्वागत भाषण. जगावें कां मरावें हा पेंचप्रसंग त्याच्या-पुढें आहे.

शृंगापत्तींत सांपडणें—कचाट्यांत सांपडणें' इकडे आड तिकडे विहीर अशी स्थिति होणें.

गलीवरचा प्रवास – स्विफ्ट या इंग्रजी लेखकानें लिहिलेल्या प्रवास वर्णनपर ग्रंथाच्या नांवावर लेखकानें कोटी केली आहे.

शिंदबादच्या सफरी —-अरेबियन नाइट्स मधील सिंदबादच्या सफरीचें एक मराठी पुस्तक प्रसिद्ध झालें आहे त्या पुस्तकाच्या नांवावर लेखकानें, कोटी केली आहे.

अपौरुषेय — कुठल्याहि व्यक्तीनें न लिहिलेलें. पुरुषाचें नसलेलें म्हणजे पर्यायानें स्त्रियांचें.

ट्रॅव्हल लाईट — दुसऱ्या महायुद्धाच्या वेळीं प्रवासामध्यें कमी सामान बरोबर घेण्याचा प्रचार रेलवे कंपन्यांनी केला. या घटनेची लेखकानें चेष्टा केली आहे.

इबिड — एकदां एखाद्या ग्रंथाचा उल्लेख येऊन गेला असतां पुन्हां त्याच ग्रंथाचा उल्लेख आल्यास 'इबिड' असा इंग्रजी शद्ब लिहिण्याची पद्धत आहे. परंतु Ibid हें कोणा तरी लेखकाचें नांव आहे अशा समजुतीनें मराठी वृत्तपत्रांनीं बऱ्याच वेळां विनोद निर्माण केला.

भगवंताचें अधिष्ठान—**सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परंतु तेथ भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ।** या रामदासांच्या उक्तिला अनुलक्षून लेखकानें हें विधान केलें आहे.

युनिटि — ... ॲक्शन – स्थळ काळ व प्रसंग यांची एकता अथवा एकसूत्रीपणा नाटकांत असावा असें अरिस्टॉटल या प्रसिद्ध शास्त्रज्ञाचें मत होतें.

हिं. हॉ. — हिंदु हॉटेल. मु. हॉ. – मुसलमानाचें हॉटेल.

वोखुटा — वाईट, त्रास.

---

## ५ माझें निशाभ्रमण –

**प्रा. भगवन्त देशमुख** – (जन्म १९२२)

गुलबर्गा कॉलेज मधील मराठीचे प्राध्यापक. मराठवाड्यांतील लघुनिबन्ध लेखक आणि टीकाकार. यांचें लेखन वेळोंवेळीं नियतकालिकांतून प्रसिद्ध झालें आहे.

या निशा – ... संयमी – भगवद्गीतेच्या दुसऱ्या अध्यायांत स्थित-प्रज्ञाचीं लक्षणें सांगतांना सर्व प्राणिमात्र ज्यावेळीं झोंपतात त्यावेळीं योगी जागतो असें म्हटलें आहे.

अभिसारिका — आपण होऊन प्रियकराकडे जाणारी स्त्री

नवोढा — नव विवाहित स्त्री.

बाणभट्ट — संस्कृत मधील ' कादंबरी ' या सुप्रसिद्ध ग्रंथाचा लेखक.

मृगशीर्ष — ( हरिणाचें डोकें ) एका नक्षत्राचें नांव.

लुब्धक — व्याध नांवाचें नक्षत्र.

आंकडे बाज — आकड्यांवर सट्टे खेळणारे.

माझ्या सखे — ... आहेत -

काढ सखे गळयांतील । तुझे चांदण्याचे हात
क्षितीजाच्या पलीकडे । उभे दिवसाचे दूत

कुसुमाग्रजांच्या " स्वप्नाची परिसमाप्ति " या कवितेतील ओळींची. वरील वाक्य आठवण करून देतें.

---

## ६ स्वामीकार्याचें बक्षीस

श्री...शंभो नोपरि-शिवाजीचा पुत्र संभाजी याची ही मुद्रा आकाशाप्रमाणें (सूर्यप्रकाशाप्रमाणें) शोभते. ज्याच्या सेवकांची आज्ञा (हुकूम अंमल) कुणावर चालणार नाहीं !

म॥ - मशार निल्हे - उपरिनिर्दिष्ट, ज्याचा उल्लेख पूर्वी आला आहे.
पदाति नायक- पायदळाचा मुख्य.

सु॥ सुहूर सन. हा अरबी सन मराठ्यांच्या काळीं रूढ होता. या सनाची संख्या, संख्या वाचक शब्दांनी दाखवितांत.आंकड्यांनी दाखवित नाहींत

सीत-सहा. समानीन-- ऐंशी ८०

अलफ - हजार,

सीत समानीन अलफ सन १०८६

फिरंगा -युरोपियन

कस्त -कष्ट

छ-मुसलमानी तारिखे साठीं 'छ हें अक्षर वापरतात.

प ||- पैकीं

मर्यादेयं विजयते — लेखन संपल्यावर अधिक मजकूर घालतां येऊं नये यासाठीं ' मर्यादेयं विजयते ' असे लिहिण्याची पद्धत होती.

---

## ७ १३व्या १४व्या शतकांतील महाराष्ट्र

**डॉ. ना. गो. नांदापूरकर** ( जन्म १९०१ )
एम्. ए. पी. एच. डी.

वाग्विलास, मराठीची कहाणी हीं त्यांचीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांनीं लिहिलेलें बरेंच वाङ्मय अद्यापि अप्रकाशित आहे. यामध्यें सरिता व आगंळची राणी हीं खंडकाव्यें आणि पी. एच्. डी. पदवीसाठीं मान्य झालेला मोरोपंत आणि मुक्तेश्वरांच्या महाभारतांवरील प्रबंध हीं प्रमुख होत.

त्यांच्या प्रमादपूर्ण व संस्कृत प्रचुर भाषेची गोडी कांहीं वेगळीच आहे. मराठी भाषेचा इतिहास त्यांनी कहाणी रूपानें सांगितला आहे. या कहाण्यांतून हा भाग निवडला आहे,

षट्कर्में -- अध्ययन, अध्यापन, यजन, याजन दान आणि प्रतिग्रह हीं ब्राह्मणाचीं सहा कर्तव्यें आहेत.

स्वधर्मे निधनं श्रेयः- हें भगवद्गीतेंतील सुप्रसिद्ध वाक्य आहे. (परधर्मो भयावहः) आपला धर्म आचरीत असतांना मरण आलें तरी तें श्रेयस्कर आहे.

हेमाडपंतः-- हेमाद्रिपंडित. हा देवगिरीच्या यादवांचा प्रधान होता. यानें मोडी लीपि प्रचारांत आणली व स्थापत्यशास्त्रांत (बांधकामांत) नवीन पद्धति रूढ केली. आपल्याकडे पुष्कळ देवळांचें बांधकाम 'हेमाडपंती' आहे.

---

## ८ वहाणा

**प्रा० सौ. कुसुमावती देशपांडे** मुक्त छंदाचे पुरस्कर्ते श्री. आ. ग. देशपांडे (कवि अनिल) यांच्या पत्नी नागपूर येथील इंग्रजीच्या प्राध्यापिका.

कवयित्री, प्रसिद्ध लघुकथा लेखिका आणि वाङ्मयीन टीकाकार. दीपकळी, दीपदान व मोळी हे त्यांचे लघुकथासंग्रह प्रसिद्ध आहेत. मोळी या कथासंग्रहांतून ही कथा निवडली आहे. नागपूरकडील ग्रामीण भाषामधून मधून वापरल्यानें प्रादेशिक पार्श्वभूमि साधली आहे. भाषा घरगुती व वर्णन जिव्हाळ्याचें आहे.

---

## ९ अब्दुर्रशीद

**रघुनाथ मुरलीधर जोशी** एम्. ए. (जन्म १९०४) राजहंस या मासिकाचे पहिले संपादक. यांनीं अंजिठ्याचीं लेणीं या पुस्तकाचें भाषांतर आणि सनपुरीच्या बखरीचें संपादन करून ती प्रसिद्ध केली आहे. सामाजिक ऐतिहासिक व संशोधनपर निबंध यांनीं लिहिले आहेत. तसेंच लघुनिबंध, व्यक्तिचित्रें व टीकालेख वेगवेगळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध केले आहेत.

---

## १० नंदादीप आणि पणती

**बी. रघुनाथ** (पूर्ण नांव भगवान रघुनाथ कुलकर्णी. जन्म इ. स. १९१३.) साकी, फकीराची कांबळी आणि छागल हे कथासंग्रह, हिरवे गुलाब, बाबूदडके, उत्पात, म्हणे लढाई संपली आणि जगाला कळलं पाहिजे या कादंबऱ्या, अलकेचा प्रवासी हा लघुनिबंधसंग्रह आणि आलाप विलाप हा कवितासंग्रह हीं त्यांचीं प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें आहेत. विविध व विपुल लिखाणामध्यें मराठवाड्यांत त्यांच्या बरोबरीचा दुसरा लेखक नाहीं. तंत्राचें नावीन्य, प्रादेशिक पार्श्वभूमि आणि दलित वर्गाविषयींची सहानुभूति हे त्यांच्या वाङ्मयाचे विशेष गुण आहेत.

साकी या कथासंग्रहांतून नंदादीप आणि पणती ही रूपक कथा घेतली आहे.

---

## ११ रावसाहेब र. लु. जोशी

**यशवंत गोपाळ जोशी** (जन्म–१९०१) सुप्रसिद्ध लघुकथा लेखक साधी सरळ भाषा, घरगुती कौटुंबिक वातावरण जिव्हाळा व जुन्या गोष्टींचा अभिमान या गोष्टी यांच्या लघुकथांत प्रामुख्यानें दिसून येतात. या खेरीज नाटकें कादंबऱ्या अनौपचारिक मुलाखती हें पुस्तक व माझा मुलगा हा बोलपट त्यांनीं लिहिला आहे. पुनर्भेट भाग १ ते ७ या कथा संग्रहांत त्यांचें कथालेखन समाविष्ट झालें आहे. त्यांची य. गो. जोशी प्रकाशन संस्था अनेक उत्कृष्ट ग्रंथांची निर्मिती करीत आहे. त्यांच्या "अनापचौरिक मुलाखती" मधून रा. सा. र. लु. जोश्यांचें हें व्यक्तिचित्र घेतलें आहे. र. लु.

जोशी हैद्राबादकरांच्या परिचयाचे असल्यामुळें त्यांच्या व्यक्तिमत्वाचें लेखकाचे केलेलें कौशल्यपूर्ण चित्रण विशेष परिणामकारक वाटते.

साहित्य परिषद–महाराष्ट्र साहित्य परिषद. प्रसिद्धीची फिकीर न करितां या संस्थेच्या उन्नतिसाठीं रा. सा. र. लु. जोश्यांनीं बरींच वर्षें काम केलें.

विठ्ठलराव घाटे–शिक्षण तज्ञ कांहीं म्हातारे व एक म्हातारी या पुस्तकाचें लेखक रा. सा. र. लु. जोश्यांचे मित्र.

लक्ष्मीबाई टिळक–सुप्रसिद्ध कवि रे. ना. वा. टिळक यांच्या पत्नी. त्यांनीं लिहिलेलीं स्मृतिचित्रें या ग्रंथांस मराठी वाङ्मयात विशेष स्थान आहे.

ख्रिस्ताच्या चरित्रावर [ पुराणाच्या धर्तीवर ] लिहिलेला ख्रिस्तायन हा ग्रंथ आहे.

---

## १२ संगीत मूकनायक

**राम गणेश गडकरी** (१८८५–१९१९)

सुप्रसिद्ध कवि, नाटककार व विनोदी लेखक. गोविंदाग्रज या नांवानें त्यांचा " वाग्वैजयंती ,, हा काव्यसंग्रह त्यांनीं प्रसिद्ध केला. प्रेमसंन्यास, पुण्य प्रभाव, भावबंधन, एकच प्याला व राजसंन्यास ही त्यांचीं नाटकें प्रसिद्ध आहेत. ' संपूर्ण बाळकराम, या विनोदी लेखसंग्रहांतून ' मूकनायक , उद्धृत केलें आहे.

कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या मूकनायक नाटकाचें व या मूक नायकाचें नांवापुरतेंच साम्य आहे.

---

## १३ यमुना–राणी

**आचार्य दत्तात्रय कृष्ण कालेलकर** (जन्म १८८५)

काका कालेलकर यांचे बहुभाषापटुत्व प्रशंसनीय आहे. कर्नाटकांत जन्म, मराठीचा अभ्यास पण पाहिल्या प्रतीचें गुजराथी लेखक म्हणून त्यांची विशेष प्रसिद्धि आहे. हिंदींमध्येंहि त्यांनीं प्राविण्य संपादन केलें आहे. इतक्या भाषा सारख्या प्रभावी पद्धतीनें लिहिणारा लेखक क्वचितच आढळतो.

भारतांत डोंगर पर्वताच्या बरोबरीनें नद्याहि आहेत आणि त्यांच्याशीं भारतीय संस्कृतींतील अनेक कल्पना व विचार संलग्न आहेत. त्यांची आठवण करून देणारी नदीवर्णनें कालेलकरांनीं पुण्याच्या लोकशिक्षणासाठीं लिहिलीं

त्यांच्या या लोकमाता या वर्णनसंग्रहांतून हें यमुनेचें वर्णन घेतलें आहे. कालेलकरांची लेखन पद्धति अगदीं निराळी असून ओघाओघांत जुना इतिहास व लोकरीती सांगण्याची त्यांची पद्धत अनुकरणीय आहे.

अंतर्वेदीचा — गंगा व यमुना या दोन नद्यांचा मधील प्रदेशाचें प्राचीन नांव परंतु लाक्षणिक अर्थानें संगम पावणाऱ्या दोन नद्यांमधील प्रदेश.

अक्षय वट— प्रयाग येथें त्रिवेणीसंगमावर अकबर बादशाहानें बांधलेला किल्ला आहे. या किल्ल्याच्या भुयारांत एका प्रचंड जुनाट वृक्षाचें नुस्तें खोडच उभें असून त्याच्या शाखा बोधिगमेंत आहेत अशी समजूत आहे.

छावणी— संगमावर अकबरानें बांधलेला किल्ला

अशोकाचा शिलास्तंभ— याच किल्ल्यांत एकेठिकाणीं बौद्धधर्मी सम्राट अशोक याचा एक शिलास्तंभ आहे. यावर अशोकाची धर्मलीपि कोरलेली आहे. समुद्रगुप्ताचा राजकवि हरिशेण यानें लिहिलेले कित्येक श्लोकहि या स्तंभावर कोरलेले आहेत.

## १४ प्रतिभा-साधन

---

### प्रा. नारायण सीताराम फडके [जन्म १८९४]

सुप्रसिद्ध कादंबरीकार, वक्ते, लघुकथालेखक आणि टीकाकार यांच्या इतकें विपुल व विविध लिखाण करणारे मराठी लेखकांत फार कमी सांपडतील. त्यांची भाषा ओधवती डौलदार व परिणामकारक असतें प्रतिभासाधनासारखा क्लिष्ट वाटणारा विषयहि त्यांनीं इतक्या सफाईदार शैलीनें चर्चिला आहे की यांची एखादी कादंबरीच आपण वाचीत आहों असा भास होणें साहजिक आहे.

---

## १५ भावपुष्प

### डॉ. शंकरलाल जानकीलाल पुरवार

हे औरंगाबादचे राहणारे आहेत. त्यांची मातृभाषा हिंदी असूनहि मराठी भाषेवर त्यांचें अतोनात प्रेम आहे. हें मुलाफुलांचे कवि म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी दोन नाटकेंहि लिहिलीं आहेत. विराट मानव हें त्यांचें खण्डकाव्य आणि भावपुष्पांजली हा गद्यकाव्याचा संग्रह प्रसिद्ध आहे.

---

प्रकाशक :—

पुरोहित आणि मंडळी

सुलतान बाजार

हैद्राबाद दक्षिण.

★

मूल्य—दीड रुपाया

★

मुद्रक:—

जयहिंद प्रेस

नारायणगुडा, हैद्राबाद, द.

प्रथमावृत्ति

१९५१